महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**विभागीय माहिती कार्यालय, नाशिक**

**मिडिया सेंटर, बी. डी. भालेकर मैदान, महाकवी कालिदास कलामंदिर समोर, नाशिक ४२२००१**

दूरध्वनी क्र(०२५३) २५९०९५६, २५९०४१२, २५९०९६९ ई-मेल :dydirectornashik@ gmail.com


---

# नाशिक विभाग

## जिल्हा नाशिक

**दै.सकाळ** **दि.१८ डिसेंबर,२०२५**

सकाळ

# 'होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२५'चा आज प्रारंभ

## डोंगरे वसतिगृह मैदानावर २१ पर्यंत प्रदर्शन

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १७ : नाशिकच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील वर्षातील सर्वांत मोठा आणि बहुप्रतिक्षित उपक्रम असलेल्या नरेडको नाशिक आयोजित 'होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२५'चे गुरुवारी (ता.१८) सायंकाळी ५.३० वाजता उद्घाटन होणार आहे. डोंगरे वसतिगृह मैदानावर आकर्षक डोम्स, प्रशस्त स्टॉल्स आणि नामांकित बांधकाम व्यावसायिकांच्या उपस्थितीमुळे प्रदर्शनाला उत्सवाचे स्वरूप आले आहे.

सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त मनीषा खत्री, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, नाशिक महानगर विकास प्राधिकरण आयुक्त जलद शर्मा, बीएसएनएलचे महाप्रबंधक सारंग मांडवीकर या मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. १८ ते २१ डिसेंबर या

NAREDCO NASHIK HOMETHON PROPERTY EXPO 2025

चार दिवसांत हे प्रदर्शन सकाळी १० वाजेपासून नाशिककरांसाठी खुले राहणार आहे. घर खरेदी, प्लॉट गुंतवणूक, व्यावसायिक मालमत्ता तसेच रिअल इस्टेटमधील नव्या ट्रेंड्सची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी मिळणार असल्याचे होमेथॉनचे मुख्य समन्वयक जयेश ठक्कर यांनी सांगितले.

४.९९ टक्के गृहकर्ज दरासारखी विशेष ऑफर, तसेच ऑन-द-स्पॉट बुकिंग करणाऱ्या ग्राहकांसाठी चांदीचे नाणे भेट हे या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. घर व प्लॉटमधील गुंतवणूक दीर्घकालीन आणि सुरक्षित परतावा देणारी ठरत असल्याने या क्षेत्राकडे गुंतवणूकदारांचा ओढा वाढत असल्याची माहिती नरेडकोच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष सुनील गवादे यांनी दिली. होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२५ हे नाशिककरांसाठी घर खरेदीची सुवर्णसंधी, गुंतवणुकीचा विश्वासार्ह मंच आणि पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


Nashik, Main
18/12/2025 Page No. 5

सकाळ

# सदनिका वापराचा मुद्दा हायकोर्टात मांडणार

## ॲड. अंजली दिघोळे : हस्तक्षेप याचिकेवर उद्या सुनावणी

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १७ : क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांना फसवणूक प्रकरणी झालेल्या शिक्षेची तत्काळ अंमलबजावणी व्हावी, यासाठी या प्रकरणातील तक्रारदार माजी मंत्री दिवंगत तुकाराम दिघोळे यांच्या कन्या ॲड. अंजली दिघोळे-राठोड यांनी उच्च न्यायालय हस्तेक्षप याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर शुक्रवारी (ता. १९) सुनावणी होणार आहे. मंत्री कोकाटे यांनी फसवणूक करीत लाटलेल्या सदनिकांच्या वापराविषयी आपण मुद्दा उपस्थित करणार असल्याचे ॲड. अंजली राठोड यांनी म्हटले आहे.**



**नाशिक :** मंत्री माणिकराव कोकाटे यांचे विसेमळ्यातील हाच तो फ्लॅट.

फेब्रुवारीत हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. सत्र न्यायालयाने ती फेटाळून लावली होती. कनिष्ठ न्यायालयाने मंत्री कोकाटे यांना शिक्षा सुनावल्यानंतर त्यांना तत्काळ अटक करण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यांना सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज करण्यास कालावधी मिळाला होता. याचसंदर्भात ॲड. दिघोळे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर येत्या शुक्रवारी (ता. १९) सुनावणी आहे.

जिल्हा व सत्र न्यायालयाने मंत्री कोकाटे यांची शिक्षा कायम ठेवली आहे. परंतु निकालपत्रात मंत्री कोकाटे यांनी शासनाची फसवणूक करीत ज्या सदनिका घेतल्या आणि त्यांचा वापर केला. त्या सदनिका त्यांना वापरण्यास परवानगी दिली आहे. यासिंदर्भात ॲड. अंजली दिघोळे-राठोड येत्या शुक्रवारी होणाऱ्या उच्च न्यायालयातील हस्तक्षेप याचिकेवेळी हा मुद्दा उपस्थित करणार आहेत.



“ मूळ तक्रारदार दिवंगत तुकाराम दिघोळे यांची वारसदार म्हणून हस्तक्षेप याचिका दाखल केली. मंत्री कोकाटे स्वतः वकील असताना त्यांनीही कायद्याचा दुरुपयोग करीत सदनिका लाटल्या. त्याचा घरगुती व व्यावसायिक वापर केला. याप्रकरणी हस्तक्षेप याचिका उच्च न्यायालयातही असून, दोन दिवसांत त्यावर सुनावणी आहे. त्या वेळी या निकालाची प्रत सादर करणार आहोत.
**- ॲड. अंजली दिघोळे-राठोड**, याचिकाकर्त्या

“ मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती मिळविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. त्यावर शुक्रवारी (ता. १९) सुनावणी आहे. ते सध्या वैद्यकीय कारणास्तव रुग्णालयात दाखल आहेत.
**- ॲड. मनोज पिंगळे**, मंत्री कोकाटे यांचे वकील

Nashik Main
18/12/2025 Page No. 8

सकाळ

# लासलगाव ग्रामीण रुग्णालयात गोंधळ

## महिलेसह चार जणांवर सरकारी कामात अडथळ्याचा गुन्हा

**सकाळ वृत्तसेवा**

लासलगाव, ता. १७ : येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असताना वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून धमकावल्याप्रकरणी विंचूर येथील एका महिलेसह चार जणांविरुद्ध लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



लासलगाव : ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळकृष्ण अहिरे यांच्याशी वाद घालताना महिला.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळकृष्ण अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही घटना २४ नोव्हेंबरला सायंकाळी साडेतीनच्या सुमारास तसेच २७ नोव्हेंबरला दुपारी एक ते दोनच्या दरम्यान घडली. उपचार सुरू असताना कविता कुमावत यांनी 'माझ्या मुलाला इंजेक्शन का लावत नाही, सलाइन का सोडत नाही' असे म्हणत मोठ्याने आरडाओरडा केला. तसेच इतरांना बोलावून गोंधळ घालत वैद्यकीय अधिकाऱ्यांना धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यानंतर महेश विश्वनाथ साळुंके (रा. लासलगाव), एक मोमीन (पूर्ण नाव उपलब्ध नाही, रा. विंचूर) व शहेजाद रफिक पठाण ऊर्फ सोनू (रा. लासलगाव) हे तिघे रुग्णालयात आले. चौघांनी मिळून डॉक्टर व कर्मचाऱ्यांना अर्वाच्य शिवीगाळ करून धमकावले. कर्मचारी व डॉक्टरांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला असतानाही गोंधळ सुरूच ठेवल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

फिर्यादीनुसार, संशयित सोनू पठाण यापूर्वीही रुग्णालयात येऊन रुग्णांना चुकीची माहिती देणे व कर्मचाऱ्यांशी वाद घालण्याचे प्रकार करत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील नियमित शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाला. या प्रकरणी चारही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, सहायक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे व हवालदार एस. आर. कदम तपास करीत आहेत.

> लासलगाव ग्रामीण रुग्णालयातील एक्स-रे व मशिन बंद असल्याबाबत मिळालेल्या तक्रारींची खातरजमा करूनच बातमी प्रसिद्ध केली. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांची बाजूही समजून घेतली. रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, हीच माझी भूमिका आहे. लोकहितासाठी मांडलेली बाब चुकीच्या अर्थाने घेतली गेली असल्यास त्याबाबत खुलासा करण्यास मी सदैव तयार आहे. प्रशासनाने याची वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य समोर आणावे.
>
> **- महेश साळुंके,**
> प्रतितक्रारदार, लासलगाव

Nashik, District-Today
18/12/2025 Page No. 1

सकाळ

# रब्बी हंगामात पीकविम्याबाबत शेतकरी उदासीन

## सकाळ EXCLUSIVE — ट्रिगर बदलाचा परिणाम : पावणेचार लाख शेतकऱ्यांची पाठ

■ रोशन भामरे : सकाळ वृत्तसेवा

**तळवाडे दिगर ता. १७ : प्रधानमंत्री पीकविमा योजनेत रब्बी हंगामात पीकविमा योजनेकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्याचे समोर आले आहे. यंदा २०२५-२६ रब्बी हंगामासाठी जिल्ह्यातील १४ तालुक्यांतून जेमतेम ५० हजार ७८८ शेतकऱ्यांनी पीकविमा संरक्षित केला असून, गेल्या वर्षी रब्बी हंगामात जिल्ह्यातून चार लाख ३६ हजार ५३१ शेतकऱ्यांनी विमा उतरविला होता. गतवर्षीच्या तुलनेत तीन लाख ७६ हजार ७४३ शेतकऱ्यांनी रब्बी पीकविम्याकडे पाठ फिरवली आहे.**

रब्बी हंगामातील कांदा, गहू, हरभरा या पिकांसाठी १५ डिसेंबर ही अंतिम मुदत संपूनही विम्याचे पैसे शेतकऱ्यांना उशिरा मिळणे, अल्प मोबदला मिळत असल्याने विमा उतरविण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये उदासीनता आहे.

कृषी विभागाकडून जनजागृती करून शेतकऱ्यांना पीक विमा उतरविण्यासाठी प्रवृत्त केले जाते. मात्र अवकाळी पाऊस, गारपिटीने नुकसान होऊनही कंपन्यांकडून भरपाई मिळत नाही. यामुळेच शेतकरी रब्बी हंगामातील पीक विम्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे पुढे येते आहे.

> शासनाकडून गेले दोन-तीन वर्षे एक रुपयात पीकविमा योजना सुरू होती. तेव्हा नुकसान झाल्यास कंपनीच्या नंबर वर संपर्क साधला असता तक्रार नोंद व्हायची. आता नुकसान होऊनही शेतकऱ्यांना तक्रार करता येत नाही. हिस्सा भरून विमा काढूनही अवकाळी, गारपीट होऊन नवीन नियम बदलामुळे शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा लाभ होत नाही.
>
> **-ज्ञानेश्वर अहिरे,** शेतकरी

### नाशिकवर अन्याय

■ **कांदा पिकाचा पीकविमा भरताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतकरी हिस्सा हेक्टरी ९०० रुपये भरावा लागला. तर शेजारील धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कांदा पिकासाठी प्रतिहेक्टरी फक्त २२५ रुपये हप्ता भरावा लागत होता. मग नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाच एवढा हिस्सा का ?**

### उदासीनतेची कारणे

- एक रुपयात पीकविमा योजना बंद
- ट्रिगर बदलामुळे भरपाई मिळत नाही
- शेतकरी हिस्सा भरून संकटकाळी अडवणूक

कंपनीला तक्रार करूनही पंचनामा न होणे



> शेतकऱ्यांना रुपयात पीकविमा मिळत होता. आता शेतकऱ्यांना प्रीमियम भरून पीकविमा काढावा लागत होता. नियमात बदल होऊन विमा कापणी प्रयोगावर आधारित झाल्यामुळे विमा करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी झाली.
>
> **- महेश वेठेकर,**
> कृषी उपसंचालक, नाशिक



### रब्बी विमा उतरवलेले

| शेतकरी | २०२४ | २०२५ |
|---|---|---|
| बागलाण | ५१०७८ | ८५५६ |
| चांदवड | ३१५२३ | ८१७० |
| देवळा | ३३२६० | ४५८५ |
| दिंडोरी | ६१८४ | ७१२ |
| इगतपुरी | ३१५८ | १०२६ |
| कळवण | २४०४ | ६६८ |
| मालेगाव | ६०७७५ | ७२२५ |
| नांदगाव | ४१४६० | १३५७१ |
| नाशिक | ७१२१ | ४९३ |
| निफाड | ३५१३३ | ४९११ |
| सिन्नर | ७३११८ | ३८८७ |
| सुरगाणा | ५४१ | १८५ |
| त्र्यंबकेश्वर | ६६१ | ९१ |
| येवला | ७२४११ | ५६१८ |

सकाळ

# राजापूरसह चाळीस गावांची पाणीयोजना कासवगतीने

## १८८ कोटींची योजना; १०० कोटींचा खर्च; मुदतवाढ दिलेली मुदतही संपली

■ सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

**येवला, ता. १७ : जलजीवन मिशनअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येत असलेली राजापूरसह ४० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सध्या दिरंगाईच्या गर्तेत अडकली आहे. योजनेसाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढवून दिलेली मुदतही आता संपुष्टात आली असून, कामाची गती अत्यंत कासवगतीने सुरू आहे. परिणामी ४१ गावे आणि १० वाड्या-वस्त्यांमधील नागरिकांना २०२८ पर्यंत तरी नळाचे शुद्ध पाणी मिळेल का, असा सवाल जलहक्क संघर्ष समितीचे संयोजक भागवतराव सोनवणे यांनी उपस्थित केला आहे.**

ब्रिटिशकालीन टंचाईग्रस्त आणि त्यामुळे टँकरवर अवलंबून असलेल्या येवला तालुक्याच्या उत्तर-पूर्व भागाला टँकरमुक्त करण्याच्या उद्देशाने ही योजना मंजूर करण्यात आली. मात्र वाढीव मुदत संपत असतानाही सुमारे १०० कोटी रुपयांचा खर्च होऊनही कामाची भौतिक प्रगती केवळ ६६ टक्के झाली आहे. योजनेत एकूण ४२ गावांचा समावेश असून, त्यापैकी १२ गावांत जलकुंभाचे काम अद्याप सुरूही झालेले नाही, तर उर्वरित ३० गावांत जलकुंभांची कामे अपूर्णावस्थेत आहेत.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मुदतवाढ देऊनही ठेकेदाराने काम पूर्ण न केल्याने ४१ गावे व १० वाड्या-वस्त्यांतील ७१ हजार ४०८ नागरिक आजही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करीत आहेत. १७४ कोटी रुपयांच्या मूळ करारनाम्याच्या तुलनेत आर्थिक प्रगती केवळ ५७.८१ टक्के, तर भौतिक प्रगती ६६.७८ टक्के इतकीच असल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ठेकेदारास आकारलेला सुमारे चार कोटी रुपयांचा विलंब दंड आकारणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात २० महिन्यांत कामाच्या गतीत कोणतीही सुधारणा झालेली नाही.

मुख्य मशिनरीचा अभाव, जलकुंभांच्या कामांना झालेला विलंब आणि एकूणच कामाची मंद गती पाहता, २०२८ पर्यंत अपेक्षित ९६ हजार ९४२ लोकसंख्येसाठी हा प्रकल्प वेळेत कार्यान्वित होईल का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. दरम्यान, प्रकल्पात अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. नांदूरमध्यमेश्वर धरणातून २.६८ दशलक्ष घनमीटर पाणी आरक्षणास शासनाची मंजुरी असली तरी त्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका (क्र. १०३२३, सन २०२२) प्रलंबित आहे. पेट्रोल पाइपलाइन, एक्स्प्रेस वेखालील क्रॉसिंग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रोड क्रॉसिंग परवानग्यांअभावी काम रखडले आहे.





राजापूर : योजनेच्या मुख्य जलकुंभाचे आतापर्यंत झालेले काम

### दंड असूनही प्रगती नाही

- ठेकेदारावर दंडात्मक कारवाई
- दंड सुरू : १ फेब्रुवारी २०२४
- प्रतिदिन दंड : ६५ हजार रुपये
- २० महिन्यांतही कामाची गती शून्य

### जलशुद्धीकरण केंद्र अर्धवट

- क्षमता : ८.५० दशलक्ष लिटर
- बांधकाम : ७० टक्के पूर्ण
- केंद्र अद्याप कार्यान्वित नाही

> प्रतिदिन ६५ हजार रुपये दंडही निष्प्रभ ठरत असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तत्काळ हस्तक्षेप करून ठेकेदारावर कडक कारवाई करावी व काम पूर्ण करून घ्यावे. अन्यथा तालुक्यातील ७१ हजार नागरिकांना आणखी चार वर्षे पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल.
> **-भागवतराव सोनवणे,**
> संयोजक, जलहक्क संघर्ष समिती, येवला

### मुख्य अडचणी

- ३०० एचपी पंप बसविणे अपूर्ण.
- अशुद्ध व शुद्ध पाण्यासाठी आवश्यक पंप अद्याप प्राप्त नाहीत.
- पाणीउपसा व वितरण सुरू करणे अशक्य.

### काम सुरू न झालेली गावे :

- आडसुरेगाव, आहेरवाडी, लहित, बोकटे, कोळम (बुद्रुक), कोळम (खुर्द), वाईबोथी.

### जलकुंभ कामांचा मोठा विलंब

- एकूण जलकुंभ : ४२
- प्रगतीत : ३०

### अडथळ्यांची शर्यत

- पाणी आरक्षण अडथळा
- नांदूरमध्यमेश्वर : २.६८ दशलक्ष घनमीटर
- उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित
- पेट्रोल पाइपलाइन क्रॉसिंग
- भारत पेट्रोलियमकडे मंजुरी प्रलंबित

**गंभीर प्रश्न**

- ४१ गावे व १० वस्त्यांना नळपाणी कधी?
- ७१ हजार ४०८ नागरिकांची तहान कधी भागणार?
- २०२८ पर्यंत योजना पूर्ण होणार का?

**एक्स्प्रेस वेखालील क्रॉसिंग**
८०० मिलिमीटर ऊर्ध्ववाहिनीसाठी परवानगी नाही

**रोड क्रॉसिंग अडथळा**
सार्वजनिक बांधकाम विभागाची मंजुरी अप्राप्त

**मागणी**

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तत्काळ हस्तक्षेप करावा.
- ठेकेदारावर कडक कारवाई करावी.
- पाणीपुरवठा योजनेला गती द्यावी.

सकाळ

# जागतिक विक्रमासाठी सिन्नरच्या दोघींची धाव

## दिल्ली-मुंबई अंतर १५ दिवसांत पूर्ण करण्याचे लक्ष्य

■ सकाळ वृत्तसेवा

सिन्नर, ता. १७ : येथील मातोश्री निर्मला गोपाल कुलकर्णी विद्यालयातील दोन विद्यार्थिनी दिल्ली ते मुंबई हे एक हजार ५०० किलोमीटरचे अंतर धावत आहेत. हे अंतर धावून पूर्ण करणाऱ्या त्या जगातील सर्वांत कमी वयाच्या मुली ठरणार आहेत. सध्या सहा दिवसांत ६०० अंतर त्यांनी धावून पूर्ण केले आहे.

तेजस्विनी पुरुषोत्तम सोळुंके (वय १३) व तन्वी विश्वास रसाळ (१६) अशी या मुलींची नावे आहेत. यापूर्वी याच शाळेचे शिक्षक अभिजित भालेराव यांनी काश्मीर ते कन्याकुमारी हे तीन हजार ८९० किलोमीटर अंतर २७ दिवसांत धावून विश्वविक्रम केला आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली तेजस्विनी व तन्वी या दोघींनी दोन महिन्यांपासून सराव सुरू केला होता. खासदार राजाभाऊ वाजे यांची दिल्ली येथे भेट घेत लाल किल्ल्यापासून ११ डिसेंबरला मध्यरात्रीपासून त्यांनी धावण्यास सुरुवात केली आहे. बुधवारी (ता. १७) या दोघी मध्य प्रदेशात पोहोचल्या. त्यांनी आतापर्यंत ६३० किलोमीटर अंतर पार केले आहे.

**दिवसाला १४ तास धाव**

दिवसाला १४ तास धावून प्रतितास १० किलोमीटर अंतर पार करण्याचा प्रयत्न त्या करत आहेत. रात्री आराम व पहाटे पाचपासून धावण्याला सुरुवात केली जाते. कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त अंतर धावून जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुंबई येथील गेट वे ऑफ इंडियाला विक्रमाचा समारोप होणार आहे.



दिल्ली ते मुंबई जागतिक विक्रमासाठी धावताना तेजस्विनी सोळुंके, तन्वी रसाळ.

### ...तर आणखी एक विश्वविक्रम सिन्नरच्या नावावर

■ आतापर्यंत दिल्ली ते मुंबईदरम्यान इतक्या कमी वयाच्या एकाही मुलीने हे अंतर धावून पूर्ण केलेले नाही. त्यामुळे तेजस्विनी व तन्वी यांनी हे यश संपादन केल्यास दिल्ली ते मुंबई सर्वांत कमी वयाच्या मुली म्हणून धावण्याच्या विक्रमाची जागतिक गीनिज बुकात व नॅशनल वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणार आहे.

Nashik, District-Today
18/12/2025 Page No. 3

सकाळ

# ऑफलाइन पीकपाहणीचे आदेश

## ई-पीकपाहणीसाठी वंचितांना अखेरची संधी

■ भाऊसाहेब गोसावी :
सकाळ वृत्तसेवा

चांदवड, ता. १७ : खरीप हंगाम २०२५ मध्ये सर्व्हरच्या तांत्रिक अडचणी, ॲपमधील समस्या किंवा इतर अपरिहार्य कारणांमुळे ज्या शेतकऱ्यांना आपली ई-पीकपाहणी वेळेत पूर्ण करता आली नाही, अशांसाठी राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. वंचित शेतकऱ्यांनी आता ऑफलाइन पद्धतीने पीकपाहणी करून त्याची नोंद सातबारा उताऱ्यावर (गाव नमुना १२) करण्याचे आदेश जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमिअभिलेख यांनी दिले आहेत.

महसूल व वन विभागाने १४ डिसेंबरला शासन निर्णय निर्गमित केला असून, त्यानुसार आता गावपातळीवर ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. चांदवड तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांची पीकपेरा नोंद अद्याप झालेली नाही, त्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांची ई-पीकपाहणी राहिली आहे, अशा शेतकऱ्यांनी १७ ते ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत संबंधित तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) यांच्याकडे विहित नमुन्यात लेखी अर्ज सादर करायचे आहेत.

तलाठी या अर्जांची स्वतंत्र नोंदवहीत नोंद घेऊन शेतकऱ्यांना त्याची पोहोच देतील. ८ ते १२ जानेवारी २०२६ या काळात अंतिम अहवाल सादर केला जाईल.

### वेळापत्रक असे

■ अर्ज करण्याची मुदत :
**१७ ते २४ डिसेंबर २०२५**

■ प्रत्यक्ष स्थळ पाहणी :
**२५ डिसेंबर २०२५ ते ७ जानेवारी २०२६**

■ अहवाल सादर करणे :
**८ ते १२ जानेवारी २०२६**

सकाळ

# 'परिक्रमा'तील १६.५ किमी मनपा विकसित करणार

**नाशिक, ता. १७ :** राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने (एमएसआयडीसी) सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ६० किलोमीटर लांबीचा सिंहस्थ परिक्रमामार्ग मंजूर केला आहे. एकूण मार्गापैकी १६.५ किलोमीटर लांबीचा रिंग रोड महापालिकेच्या डीपी रोडचा भाग आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने विकसित करण्यास हरकत नसल्याचा प्रस्ताव महासभने मंजूर केला आहे. त्यामुळे भूसंपादनासह बांधकामविषयक कामेदेखील एमएसआयडीसी करणार आहे. एकूण परिक्रमा मार्गापैकी १६.५ किलोमीटर लांबीचा रस्ता महापालिकेच्या प्रस्तावित डीपी रोडवर असल्याने रस्ते विकास महामंडळाला महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. भूसंपादनाचा खर्च महापालिका करणार नाही, रस्ता वापरासाठी टोल लावण्यात आल्यास टोलवसुलीद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही हिस्सा महापालिकेला मिळावा, असे प्रस्तावात नमूद आहे.

Nashik, Main
18/12/2025 Page No. 2

सकाळ

# लासलगावहून मका निघाला परदेशी

## व्हिएतनामसाठी कंटेनरने पंधरा हजार टन मका रवाना; भाव १९५० पर्यंत

■ सकाळ वृत्तसेवा

लासलगाव, ता. १७ : लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमधून मक्याच्या मोठ्या अवस्थेमुळे दोन दिवसांत कंटेनरने मका व्हिएतनामसाठी रवाना करण्यात आला आहे. या हंगामात सलग पाच ते सहा महिने समाधानकारक पाऊस झाला तसेच उत्पादन खर्च तुलनेने कमी असल्यामुळे शेतकऱ्यांचा कल मोठ्या प्रमाणात मक्याकडे वळला. चांगले उत्पादन झाल्याने लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत मक्याची प्रचंड आवक झाली असून, बाजारात सध्या उत्साहाचे वातावरण आहे.



**लासलगाव** : येथील बाजार समितीमधून कंटेनरमध्ये मका भरणे सुरू असताना.

या हंगामात मक्याची आवक वाढल्याने लासलगाव बाजार समितीत किमान एक हजार ७०० रुपये, तर कमाल एक हजार ९५० रुपये प्रतिक्विंटल असे दर मिळाले. विशेष म्हणजे भारतासह बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार, नेपाळ व व्हिएतनाम या सहकारी देशांकडून मक्याला मोठी मागणी आहे.

स्थानिक व्यापाऱ्यांच्या माध्यमातून या हंगामात केवळ व्हिएतनामसाठी सुमारे १५ हजार टन मका जहाजाद्वारे पाठविण्यात आला आहे. कंटेनरद्वारे मका मुंबईला पाठवला जात आहे. तेथून जहाजाने व्हिएतनामकडे निर्यात केली जाणार आहे. व्यापाऱ्यांच्या मते, देशांतर्गत उत्पादनाचा दर्जा चांगला असल्याने परदेशी बाजारात भारतीय मक्याला विशेष मागणी वाढत आहे.

### आधार देणारे पीक

सोयाबीनच्या तुलनेत मक्याच्या लागवडीचा खर्च २५ ते ३० टक्क्यांनी कमी येतो. शिवाय मक्याची काढणी झाल्यानंतर त्याच शेतात रब्बी हंगामात कांद्याची लागवड करता येत असल्याने दुहेरी फायदा होतो. त्यामुळे भविष्यातही मक्याच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढण्याची शक्यता आहे. एकूणच उत्पादन खर्च कमी, बाजारातील मागणी स्थिर आणि निर्यातीची संधी यामुळे या हंगामात मका शेतकऱ्यांसाठी 'नफा देणारे पीक' ठरत आहे.

" या हंगामात दर्जेदार उत्पादन व स्थिर दरामुळे भारतीय मक्याला परदेशी बाजारात चांगली मागणी निर्माण झाली आहे. लासलगाव बाजार समितीतून व्हिएतनामसह इतर देशांसाठी होत असलेली मका निर्यात ही शेतकरी व व्यापारी दोघांसाठीही दिलासादायक बाब आहे. उत्पादन खर्च कमी, दर्जा उत्तम आणि वेळेवर बाजारपेठ उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत आहे. भविष्यात शासनाने निर्यात प्रक्रिया अधिक सुलभ करून वाहतूक, साठवणूक व लॉजिस्टिक सुविधा मजबूत केल्यास मका निर्यातीत आणखी वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य येईल.

**- सागर थोरात,**
मका निर्यातदार, लासलगाव बाजार समिती

Nashik, Main
18/12/2025 Page No. 5

सकाळ

# घरकुलांसाठी पोलिस बंदोबस्तात जागा

## जिल्हाधिकारी प्रसाद : जिल्हा परिषदेत विभागप्रमुखांची समन्वय बैठक

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १७ : शासकीय योजनेतून घरकुल बांधण्यासाठी लाभार्थ्याकडे जागा नसल्यास त्याला जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी व तहसीलदारांची आहे. जमिनीचा आदेश पारित झाल्यानंतरही सातबारा किंवा ८ (अ) उतारा व जागेचा ताबा मिळाला नाही, तर पोलिस बंदोबस्तात कारवाई करा, असे निर्देश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले.



**नाशिक** : अधिकाऱ्यांच्या समन्वय बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद. शेजारी मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (ता. १७) जिल्हा परिषदेत आढावा बैठक झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी पवार, उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे यांसह विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी प्रसाद यांनी 'सर्वांसाठी घरे' या योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ज्या घरांचे लक्ष्य मंजूर झालेले नाही, अशा सर्व घरांची माहिती घेऊन त्यांचे वर्गीकरण करण्याचे आदेश दिले. जमीन अनुदानासाठी आठवड्यात प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. बांधकामापेक्षा अधिक वाळू उपलब्ध असेल, तर ती शेजारच्या गावातील घरांच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी वाळू उत्खनन व वाहतुकीचे नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या. श्री. पवार यांनी 'सर्वांसाठी घरे' या मोहिमेंतर्गत आतापर्यंत झालेल्या कामाची माहिती दिली.

Nashik, Main
18/12/2025 Page No. 3

दै.आपलं महानगर दि.१८ डिसेंबर,२०२५

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# 'कायद्याच्या बालेकिल्ल्या'त १०५ खून

## ११ महिन्यांत नाशिक शहरात विक्रमी ४६ अन् जिल्ह्यात ५९ हत्या

आपलं महानगर वृत्तसेवा

**नाशिक ।** शहरात जानेवारी ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत नाशिक शहरात रेकॉर्डब्रेक ४६ खून झाले असून, जिल्ह्यात ५९ खून झाले आहेत. जिल्ह्यातील ५९ पैकी ५७ खूनाच्या घटना उघडकीस आल्या आहेत.

नाशिक शहर पोलीस आयुक्तपदी संदीप कर्णिक यांची नोव्हेंबर २०२३ मध्ये नियुक्ती झाली. त्यांच्या कार्यकाळात नोव्हेंबर २०२३ ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत शहरात ८६ हून अधिक खूनाच्या घटना घडल्या आहेत. हे खून प्रेमप्रकरण, वैयक्तिक वाद व कौटुंबिक वाद, वर्चस्व व दहशतीसाठी, बेरोजगारी व नशेखोरी, सूडाची भावना व क्षुल्लक कारणातून झाले आहेत. नाशिक शहरात यंदा अंमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या तरुणाईसह सोशल मीडियावरील 'रील्स'वरून गुन्हेगारीकडे आकर्षित होणाऱ्यांमुळे सर्वाधिक खून झाले आहेत.



उपनगरमध्ये दोन सख्ख्या भावांचा खून झाला. राजकीय वादातून नांदूरनाका परिसरात एका युवकाचा खून करण्यात आला. सप्टेंबरमध्ये सर्वाधिक ७ खून झाले. विशेष म्हणजे, शहरात दोनवेळा एकाच दिवशी दोन खुनाच्या घटना घडल्या आहेत.

| या कारणातून झालेले खून | |
|---|---|
| कारणे | खून |
| किरकोळ वादातून | १३ |
| पूर्ववैमनस्य | ११ |
| कौटुंबिक वाद | १० |
| मुलाकडून आईचा खून | २ |
| दारूसाठी पैसे न देणे | ३ |
| गुन्हेगारी टोळीतील वाद | १ |
| आपआपसातील वाद | २ |
| आर्थिक वाद | २ |
| अनैतिक संबंध | १ |
| मालमत्ता वाद | १ |
| पैसे मागण्यातून | १ |

| नाशिक शहरातील खुनाची आकडेवारी | |
|---|---|
| वर्ष | खून |
| २०२५ | ४६ (१७ डिसेंबरपर्यंत) |
| २०२४ | ३८ |
| २०२३ | २७ |
| २०२२ | ३० |
| २०२१ | २९ |
| २०२० | २५ |
| २०१९ | २४ |
| २०१८ | ३५ |
| २०१७ | ४१ |

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# तपोवनाचा आक्रोश : विकास की विनाश ?



निरपेक्ष, निःस्वार्थपणे सतत फक्त देत राहणं याचं जिवंत उदाहरण म्हणजे झाडे. त्याउलट माणूस मात्र सतत मागतच राहतो. जी गोष्ट सहज मिळते तिची किंमत माणूस कधी करत नाही. हवामानातील बदलातून निसर्ग सतत सांगतो आहे "मला सांभाळाल, तरच तुम्ही टिकाल." पण माणसाचा विकासाचा दुराग्रह हे सत्य मान्य करायला तयार नाही. घनदाट जंगलात तपाचे महत्व आहे. पूर्वी साधू-संत तपश्चर्येसाठी जंगलात जात; त्या वनालाच तपोवन म्हणतात. जंगल हे साधू महंतांच्या उपासनेचे मुख्य ठिकाण होते. घनदाट झाडी म्हणजे जैवविविधतेने नटलेला निसर्ग. अनेक पक्ष्यांचं घर म्हणजे झाडं. ती तोडणं म्हणजे त्यांच्या आयुष्यावर कुरघोडी आणि ह्याच विनाश शेवटी माणसालाच भोगावा लागणार आहे.

**निसर्गाचं रक्षण म्हणजे स्वतःचं रक्षण**

नाशिकच्या तपोवन परिसरात प्रस्तावित असलेली मोठ्या प्रमाणातील वृक्षतोड ही आज केवळ स्थानिक मुद्दा उरलेली नाही; तर ती पर्यावरण, आरोग्य, हवामान आणि भविष्याचा एक बहुआयामी प्रश्न बनला आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशकात येणार असलेल्या संतमहंतांसाठी प्रशासन साधू-ग्राम तयार करणार आहे. ज्या जागेवर हे साधू-ग्राम तयार करणार आहे. त्याठिकाणच्या हजारो प्रस्थापित झाडांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्ष महाराष्ट्राला नवा नाही, पण तपोवनातील हा वाद जणू निसर्गाच्या तोंडून उसळलेला एक मूक हंबरडा आहे.

**प्राणवायूची झुल झडताना...**

आजचे नाशिकचे "हिरव नंदनवन" म्हणजेच तपोवनचा परिसर. झाडे विकासाच्या नावाखाली तोडण्याचा प्रस्ताव आहे. झाडे ही केवळ हिरवळ नाही, ती हवा, पाणी, माती इत्यादि आपल्या श्वासाशी जोडलेली एक जिवंत परिसंस्था आहे. त्या तुटल्या की निसर्गाच्याच शिरा कापल्या जातात आणि त्याचा परिणाम मानवी जीवनावर होणारच.

सध्या होणारे वातावरणातील बदल ज्यात तापमानवाढ, अनियमित पाऊस, वादळे आणि दुष्काळ हे आपल्याला विचार करायला भाग पाडते आहे. होणारी जंगलतोड हे या संकटांचे प्रमुख मूळ. आपल्या नाशिकमध्ये जैवविविधतेचे संतुलन राखण्यासाठी असलेली झाडे व पर्यावरण जपणे ही आपली जबाबदारी असून त्यात भारतीय जातीच्या वृक्षांची भरपूर लागवड करणेही तितकेच गरजेचे आहे अन्यथा नाशिकचा हवामान समतोल कोलमडणे ही केवळ शक्यता नाही तर ती एक अपरिहार्य वास्तवता ठरेल.

हवा गरम होईल, शहर अधिक तापेल, आणि हीट आयलंड इफेक्ट'ने उष्णतेची भट्टी अधिक धगधगेल. आज ज्या छायेखाली पादचारी श्वास घेतात, उद्या तिथे प्रखर उन्हाचा तडाका बसू शकतो. नाशिक शहर आधीच प्रदूषणाच्या उंबरठ्यावर आहे; अशात तपोवनातील झाडे नाहीशी झाली तर शहराला मिळणारा नैसर्गिक हवा-शुद्धीकरणाचे कवचच नाहीसे होईल. म्हणतात ना "जंगलाचा नाश म्हणजे श्वासाचा नाश." तपोवनच्या संदर्भात हा वाक्प्रचार अक्षरशः खरा ठरतो की काय अशी परिस्थिती आहे.

झाडे ही निसर्गाची सुरक्षा कवच. माती धरणे, भूमिगत पाणी टिकवणे, पावसाचे पाणी संतुलितपणे जमिनीत शोषणे ही सर्व कामे झाडे निःशब्दपणे करीत असतात. वृक्षतोड झाली की पूरप्रमाण वाढते, भूस्खलनाचा धोका निर्माण होतो, जमीन कोरडी पडते, दुष्काळ चावा घेऊ लागतो. नाशिक आधीच वारंवार पूरग्रस्त राहिले आहे. गंगेच्या काठावरील तपोवनातील हिरवाई कमी झाली तर भविष्यातील पूर अधिक आक्रमक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. "निसर्गाचा कोप जेव्हा उसळतो, तेव्हा माणसाचे सामर्थ्य किती क्षुद्र आहे हे लक्षात येते." मोठ्या झाडाचे पुनर्रोपण (ट्रान्सप्लांट) करणे म्हणजे एखादे जुने घर तसेच्या तसे उचलून दुसऱ्या ठिकाणी बसवण्यासारखे आहे. भूतकाळात यशस्वी पुनर्रोपण केलेले किती उदाहरणे आहेत? पुनर्रोपण करण्यासाठी लागणारा वेळ, ऊर्जा व आर्थिक सहयोग हा अजून एक भाग. दुसरीकडे सर्व सामान्य नागरिक, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि कलाकार यांचे नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारले जात आहे. हे फक्त झाडांसाठीचे आंदोलन नसून नाशिकच्या भविष्यासाठीची झुंज आहे.

आज झाडे वाचवली तर उद्याचे हवामान, आरोग्य आणि भविष्य वाचेल. आज आपण शांत राहिलो, तर उद्या मुलांना दाखवण्यासारखे झाडसुद्धा उरणार नाही. "निसर्ग जपला तर तोच आपल्याला जपतो; निसर्ग नष्ट केला तर तोच आपल्याला नष्ट करतो." नाशिकचे श्वास वाचवणे आज प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

- सचिन ब्राह्मणकर,
(उद्यानविद्या तज्ज्ञ, नाशिक)

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# कुंभमेळ्यात टेलिकॉम सेवा बळकट करा : आयुक्त

**नाशिक :** नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर दूरसंचार सेवा अधिक सक्षम करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरणाने नाशिक व शेजारील जिल्ह्यांतील टेलीकॉम सेवा पुरवठादारांसोबत आढावा बैठक घेतली. या बैठकीत फायबर नेटवर्क, मोबाईल टॉवर्स व पायाभूत सुविधांबाबत येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

टेलीकॉम सेवा पुरवठादारांनी ऑप्टिकल फायबर टाकताना रस्ते, नाले, रस्ता रुंदीकरण इ. कामांमध्ये आवश्यक समन्वय व सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावर प्राधिकरणाकडून अद्ययावत डिजिटल नकाशे, साधूग्राम, घाट परिसर, पार्किंग, रिंगरोड, नाशिक महापालिका हद्द, सार्वजनिक बांधकाम विभाग व शासकीय मुख्य इमारती यांची माहिती टेलीकॉम कंपन्यांना देण्यात येईल, तसेच एकाच पातळीवर समन्वय साधून कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. ऑप्टिकल फायबर चोरी, मोबाईल टॉवरमधील इलेक्ट्रॉनिक साहित्य चोरी व फायबर तुटण्याच्या घटनांबाबत पोलीस विभागाकडून सहकार्य मिळावे, यावरही चर्चा झाली. या संदर्भात टेलीकॉम कंपन्यांच्या अडचणींसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल, असे पोलीस विभागाने स्पष्ट केले. विद्युत पुरवठ्याच्या वाढत्या गरजांबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून युद्धपातळीवर सहकार्य केले जाईल, असेही बैठकीत सांगण्यात आले.

पायाभूत सुविधांचे मजबुतीकरण करताना सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी केले. सिंहस्थ काळातील अमृतपर्व व पर्वणीदरम्यान होणाऱ्या प्रचंड गर्दीचा मोबाईल नेटवर्कवर येणारा ताण लक्षात घेता, तात्पुरत्या मोबाईल नेटवर्क जाळ्याची उभारणी, त्यासाठी आवश्यक परवानग्या व जागा निश्चिती यावरही सविस्तर चर्चा झाली. कुंभमेळा परिसरातील पायाभूत कामे सुरू करण्यापूर्वी किमान एक महिना आधी टेलीकॉम कंपन्यांना माहिती देण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले, जेणेकरून चालू ऑप्टिकल फायबर सेवा बाधित होणार नाहीत, अशीही सूचना देण्यात आल्या.

Nashik Edition
Dec 18, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com

# राज्यातील स्मारके घेणार मोकळा श्वास

## अतिक्रमणे रोखण्यासाठी समिती, मंत्रिमंडळाचा निर्णय

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा



- सांस्कृतिक कार्यमंत्री समितीचे अध्यक्ष
- चार निमंत्रित सदस्यांचा समितीत समावेश
- गड-किल्ले आणि राज्य संरक्षित स्मारकांचे
- अभ्यासक असावेत ही मुख्य अट

Nashik Edition
Dec 18, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com

गांवकरी
www.gavakari.net
18 Dec 2025 - Page 9

# १० डिसेंबरपूर्वीची एकही फाइल प्रलंबित नाही

## निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची स्पष्टोक्ती

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात ई-ऑफिस प्रणाली राबविण्याच्या दृष्टिकोनातून पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मात्र, काही विभागांतील ई-ऑफिसवरील फाइल प्रलंबित असल्याचे आकडेवारीवरून समोर आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. प्रलंबित सर्व प्रकरणे तत्काळ निकाली काढण्याचे निर्देश संबंधित विभागप्रमुखांना दिले होते.

दरम्यान, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत यांच्याकडे १० डिसेंबरपूर्वीची एकही फाइल प्रलंबित नाही. त्यामुळे ६० दिवसांपासून प्रलंबित असण्याचे कोणतेही कारण नाही, असे स्पष्टीकरण राजपूत यांनी दिले आहे. विविध विभागांच्या संबंधित सुमारे ३२० फाइल जिल्हाधिकारी कार्यालयात ई-ऑफिसवर प्रलंबित आहेत.
यात सात दिवसांपासून ७२, १५ दिवसांपासून २४, ३० दिवसांपर्यंतच्या १२१, तर ६० दिवसांच्या आतील १८ फाइल आहेत. सर्वाधिक ८५ फाइल या ६० दिवसांहून अधिक काळ प्रलंबित असल्याचे आढळले. गौणखनिज विभागाच्यादेखील १४० फाइल ई-ऑफिसवर प्रलंबित असल्याचे समोर आले. तथापि, वरील प्रलंबित प्रकरणांपैकी बहुतांशी प्रकरणांमध्ये कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तथापि, संबंधित कर्मचाऱ्यांनी ई-ऑफिस प्रणालीतून त्या फायली क्लोज केल्या नसल्यामुळे त्या ई-ऑफिस प्रणालीत प्रलंबित दिसत आहेत.
मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर या विभागाने कार्यवाही पूर्ण झालेली प्रकरणे तत्काळ प्रणालीमधून क्लोज करून काढण्यास सुरुवात केल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### फाइल्स प्रलंबितची कारणे

- तांत्रिक अडचणी, सर्व्हरचा वेग कमी असणे किंवा इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये अडथळा येणे.
- प्रशिक्षणाचा अभाव : कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणाली हाताळण्याचे पूर्ण तांत्रिक ज्ञान नसणे.
- डिजिटल स्वाक्षरी समस्या : डिजिटल सिग्नेचर टोकन एक्स्पायर होणे किंवा ते सिस्टिमला कनेक्ट न होणे.
- कार्यभाराचे अधिक्य : एकाच अधिकाऱ्याकडे अनेक विभागांच्या फाइल्स जमा होणे.
- निर्णय प्रक्रियेतील विलंब : फाइलवर योग्य टिप्पणी करण्यास लागणारा वेळ.
- जुनी उपकरणे : संगणक जुने असल्यानेही अनेक वेळा ऑनलाइन कामकाजाला अडथळा निर्माण होत आहे.



**१० डिसेंबरपूर्वीची एकही फाइल प्रलंबित नाही. त्यामुळे ६० दिवसांच्या वर फाइल प्रलंबित असण्याचे कारण नाही. तसेच कोणतीही फाइल कोणत्याही कारणाकरिता प्रलंबित राहत नाही. सर्व फाइलवर वेळेत नियमानुसार कार्यवाही करण्यात येते. तसेच १६ तारखेच्या बैठकीत माझ्या कामकाजाबाबतीत कोणतीही चर्चा अथवा निर्देश झालेले नाहीत.**

- रोहितकुमार राजपूत,
निवासी उपजिल्हाधिकारी
नाशिक

गांवकरी
www.gavakari.net
18 Dec 2025 - Page 8

# आपले सरकार पोर्टलवर केवळ २२ तक्रारी प्रलंबित

## जिल्ह्यातील तक्रारींच्या निवारणात ९९ टक्के यश

**नाशिक : प्रतिनिधी**

**केंद्र व राज्य शासनाच्या पीजी पोर्टल आणि सीपीजीआर-एमएस या तक्रार निवारण प्रणालीद्वारे नाशिक जिल्ह्यात दाखल झालेल्या तक्रारींच्या निवारणात प्रशासनाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आकडेवारीनुसार, जिल्ह्यातील एकूण १,५५९ पैकी १,५३७ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. केवळ २२ तक्रारी प्रलंबित आहेत.**

पीजी पोर्टलवर नाशिक जिल्ह्यात विविध विभागांमार्फत एकूण १,४८० तक्रारी दाखल झाल्या. यापैकी १,४६६ तक्रारी निकाली काढण्यात आल्या. फक्त १४ तक्रारी प्रलंबित आहेत. त्यामुळे पीजी पोर्टलवरील तक्रार निवारणाचा दर ९९ टक्के आहे.

या तक्रारींत सामान्य प्रशासन विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, प्राथमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक, वित्त विभाग, आरोग्य विभाग, कृषी विभाग, महिला व बालविकास विभाग, पशुसंवर्धन विभाग, समाजकल्याण विभाग, पाणी व स्वच्छता विभाग, लघुपाटबंधारे विभाग, माध्यमिक शिक्षण विभाग, बांधकाम विभाग-१, २, ३, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभाग, मनरेगा, गटविकास अधिकारी, पं. स. मालेगाव आदी विभागांचा समावेश आहे.

राज्यातील सामान्य नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण व्हावे, यासाठी आपले सरकार तक्रार निवारण पोर्टल राज्य सरकारने सुरू केले; परंतु या पोर्टलवरील तक्रारींचे निवारण करण्यात जिल्हा परिषद आघाडीवर असल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील केवळ २२ तक्रारी प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील तब्बल ३१२ तक्रारी प्रलंबित होत्या. या तक्रारी प्रलंबित असल्याने ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी जिल्हा परिषद प्रशासनावर नाराजी व्यक्त करत तक्रारी सोडविण्यासाठी गेल्या वर्षी ९ सप्टेंबर २०२४ ला अल्टिमेटम दिला होता. त्याचा सकारात्मक परिणाम दिसला आहे. दि. १८ डिसेंबर २०२५ पर्यंत १ टक्का इतक्या तक्रारी प्रलंबित असून, लवकरच झीरो पेंडन्सी करण्याकडे कल आहे, असे नाशिक जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सांगितले.

आपले सरकार तक्रार निवारण पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारींचे वेळेत निराकरण करणे संबंधित शासकीय कार्यालयाची जबाबदारी असते.

### ८०८ तक्रारी निकाली

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील तक्रारी पाहिल्यास सर्वाधिक तक्रारी ग्रामपंचायत विभागाच्या आहेत. त्या ८१५ होत्या. त्यांपैकी ८०८ तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून, केवळ सात तक्रारी शिल्लक आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या सातपैकी तीन तक्रारींचे निराकरण केले आहे. चार शिल्लक आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या ६८ पैकी ६६ तक्रारींचे निवारण केले असून, केवळ दोन तक्रारी शिल्लक आहेत.

**विभागांच्या तक्रारी आल्यानंतर तात्काळ त्याचे निवारण करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी दिले आहेत. यामुळे झीरो पेंडन्सी करण्यावर आमचा भर आहे.**

**- महेश पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक**

| राज्य तक्रार निवारण प्रणाली |
| --- |
| एकूण प्राप्त तक्रारी : १४८० |
| निकाली काढलेल्या : १४६६ |
| प्रलंबित : १४ निवारण टक्केवारी : ९९% |
| **केंद्र शासन तक्रार निवारण प्रणाली** |
| एकूण प्राप्त तक्रारी : ७९ |
| निकाली काढलेल्या : ७१ |
| प्रलंबित : ८ निवारण टक्केवारी : ९०% (साधारण) |
| **एकत्रित पीजी पोर्टल, सीपीजीआर एमएस** |
| एकूण तक्रारी : १५५९ |
| निकाली काढलेल्या : १५३७ |
| प्रलंबित : २२ |
| एकूण निवारण दर : सुमारे ९९% |

LOKMAT TIMES
Thursday, 18.12.2025

# From new ghats to healthcare, Kumbh planning in full swing

***Lokmat Times*** **spoke to Kumbh Mela Commissioner Shekhar Singh for current status**

AKASH KHANDKE
LOKMAT NEWS NETWORK, NASHIK

Simhastha Kumbh Mela, the grand religious event that attracts crores of devotees, is just a few months away. Considering the magnitude of this event, numerous arrangements, facilities and infrastructure need to be in place to cater to lakhs of devotees who will be visiting Nashik and Trimbakeshwar. Many believe the administration will fail to complete works on time and even if it does, the structures will be substandard. But concerned officials are confident that with the advanced technology at their disposal, everything will be ready before Kumbh. Against the backdrop of these contrasting opinions, *Lokmat Times* spoke to Kumbh Mela Commissioner Shekhar Singh to get the real insights into ongoing works.



File photo

**LOKMAT TIMES**
**Kumbh Update**

**New ghats in Nashik and Trimbak**

The Kumbh Mela Commissioner stressed the need for new ghats to distribute devotees during Shahi Snan. He said new ghats, around six kilometres in length, are being built in Nashik. Similarly, Trimbak too will have new ghats.

**Trimbakeshwar Lift Irrigation Scheme**

"We are working on lifting water from Beze Dam and filling Ahilya Kund and Ganga Sagar Kund, where devotees can take holy dips. This move is aimed at diverting the crowd from Kushavart to other kunds. A large water tank is being built in Trimbak for storing water pumped from Beze Dam. Apart from filling these Kunds, it will be used for other water supply projects in Trimbak," Shekhar Singh said.

**Ring road project**

Shekhar Singh said, "We are very optimistic about the ring road projects. There are a few hurdles in the process, but the road will be ready before Kumbh Mela. We are working on it."

**Sewage Treatment Plants (STP) and sewerage systems**

Sewerage systems will be developed under the AMRUT-2 scheme and municipal bonds. Throwing light on STPs, he said, "Work on upgradation and setting up new STPs is underway. The new project is based on the Public-Private Partnership (PPP) model. Payment to the contractor will be done in instalments, depending on output parameters, meaning how efficiently new STPs filter water. This arrangement will compel contractors to maintain high standards in work and build efficient STPs in order to receive full payment."

## Healthcare infrastructure and facilities

The administration is working extensively to build robust healthcare facilities for Kumbh. According to Shekhar Singh, the health centre near Tapovan will be upgraded and the number of beds in Indira Gandhi hospital will be raised from 60 to 100. He further added, "Every ghat will have two Intensive Care Unit (ICU) beds for emergency cases. Both Outpatient Department (OPD) and Inpatient Department (IPD) will be available at Sadhugram. There will be 60 to 70 fully equipped ambulances in Nashik and 40 to 50 in Trimbak, out of which, a few will be purchased and others will be rented. Devotees will be able to call an ambulance at any location by dialing the emergency helpline - 108." Apart from these arrangements, he stated, we have trained manpower and ample stock of medicines.

## Quality control

The Kumbh Mela Commissioner underscored during the conversation the importance of maintaining high quality while developing infrastructure projects. "We have a three-tier structure to ensure that every work is of high standard. Firstly, the contractor is responsible for delivering quality work. Secondly, our engineers are inspecting ongoing works and thirdly, we have appointed third party companies to check the quality of infrastructure projects," he stated, further adding that a few important projects will be inspected by teams from IITs as well. "We aim to complete all projects by March 2027," Singh said.

# Sants to ensure dignified Simhastha Kumbh Mela

## Nashik to host National Conference in April; heads of akhadas to attend

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, DEC 17

A national-level conference of sants will be held in Nashik in April, under the aegis of the Akhil Bharatiya Sant Samiti, in the presence of all Shankaracharyas, top spiritual leaders, heads of akhadas, and sants from across the country. The decision was taken during the two-day National *Chintan* meet at the Swaminarayan Temple in Tapovan. Around 2,000 to 2,500 representatives are expected to attend the conference.

The meeting also resolved to launch a nationwide awareness campaign to prevent religious conversions. Members expressed concern about attempts by certain forces in Maharashtra and elsewhere in the country to malign sants and the Kumbh Mela tradition, and strongly condemned these tendencies. The sants reiterated their commitment to ensuring a successful and dignified Nashik-Trimbakeshwar Kumbh Mela.

At the valedictory session, Jagadguru Shri Avichal Devacharya Maharaj (President), Jitendranand Saraswati (National General Secretary), Mahant Mandaleshwar Manmohandas, Mahant Mandaleshwar Janardan Swami, Madhavdas Rathi (VHP Sants' Committee Head), and Bhakticharandas Maharaj addressed the gathering. It was also decided to hold state-level meetings across India to encourage devotees' participation in the upcoming Kumbh Mela.

On the second day, chief mahants from states including Bihar, Uttar Pradesh, West Bengal, Odisha, Madhya Pradesh, Gujarat and Rajasthan reviewed issues related to the protection of Hindu temples, the prevention of religious conversions and the strengthening of organisations. Leaders of the BJP's spiritual wing, Tushar Bhosale and Kailas Mudaliyar, extended support to the conference.




Jagadguru Shri Avichal Devacharya Maharaj speaking in the presence of other dignitaries at the meeting.

### Resolutions passed

- Akhadas, sadhus, and sants from across the country will contribute to the Kumbh Mela.
- A stance of cooperation with the administration for the Kumbh Mela.
- A campaign will be launched in every state to prevent religious conversions.
- Membership of the All India Sant Samiti will be expanded.
- Emphasis will be placed on the propagation and promotion of Sanatan Dharma.

LOKMAT TIMES

# Flying squads to be appointed for civic polls

## Joint meeting of Police Commissioner, Municipal Commissioner and election staff at NMC today to finalise the operational procedures

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, DEC 17

The administration has stepped up preparations to ensure that the municipal corporation elections are conducted in a transparent, fear-free manner and within the framework of the model code of conduct (MCC). Special flying squads will be appointed across the city to strictly enforce the MCC during the election process and to prevent misuse of money, illegal campaigning and coercive tactics.

A joint meeting of the Police Commissioner, Municipal Commissioner and election staff has been scheduled at the Nashik Municipal Corporation office on Thursday,



December 18, at 4 pm to finalise the detailed operational procedures for these squads.

Police Commissioner Sandeep Karnik, Municipal Commissioner Manisha Khatri, State Excise Department Superintendent Santosh Zagade, and Municipal Election Deputy Commissioner Lakshmikant Satalkar, among others, will guide the meeting. Detailed discussions will be held on the composition of the flying squads, their powers, jurisdiction, complaint registration mechanism, criteria for immediate action, and coordination between the police machinery and the municipal election machinery.

Separate squads will be appointed in each division to curb any form of malpractice during the elections. These squads will function round the clock. They will monitor illegal banners and hoardings, unauthorised vehicle rallies, misuse of loudspeakers, distribution of cash and valuables, liquor or other inducements during campaigning. The administration has also warned that strict and immediate action will be taken against candidates, political parties or workers found violating the MCC.

### Special action plan to be prepared

- A special action plan will be prepared at this joint meeting taking into account sensitive wards in each division, experiences from previous elections, the nature of complaints received earlier and potential risks. A decision is also expected on activating a separate mechanism for the prompt redressal of complaints received from citizens.
- The administration has made it clear that the police administration and the municipal election machinery will work in close coordination to ensure that the municipal corporation elections are conducted peacefully and within the ambit of the law.

LOKMAT TIMES

# Judges' appointment at religious sites opposed

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, DEC 17

The All India Sants Committee has strongly opposed the appointment of judges to various religious trusts and institutions in Maharashtra. "We do not accept such appointments. The government must intervene. Maharashtra is the land of saints and a laboratory of Hinduism, and such decisions must be overturned," said Jagadguru Shri Avichal Devacharya Maharaj, President of the Committee, along with National Secretary Jitendranand Saraswati at a press conference. They emphasised their dedication to stopping religious conversions and called on the government to introduce strict laws to combat this. The press conference took place after the conclusion of a two-day National Sants Conference organised for the Kumbh Mela. Leaders of Akhadas from all over India participated, and Committee saints addressed the media.

लोकमत

# टीईटी परीक्षा गोंधळ : १५ दिवसांनंतरही अहवालाची प्रतीक्षा; विद्यार्थी संभ्रमात

## अहवाल तयार असतानाही विलंब

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : नाशिकमध्ये नोव्हेंबर महिन्यात झालेल्या टीईटी परीक्षेच्या गोंधळप्रकरणी नाशिकच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी पुण्यात हजेरी लावत परीक्षा विभागाकडे खुलासा सादर केला. त्यावर परीक्षा परिषद समितीची चर्चा झाल्यानंतर घटनेला तब्बल १५ दिवस उलटून गेल्यानंतरही अहवाल जाहीर न झाल्याचे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था कायम आहे.

नोव्हेंबर महिन्यात झालेल्या या परीक्षेत प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकेतील तफावतीमुळे गोंधळ उडाला होता. घटनेची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने चार सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करत सात दिवसांत अहवाल देण्याचे आदेश



दिले होते.

मात्र, पहिल्या सात दिवसांमध्ये नगरपालिकेच्या निवडणुकांचे कामकाज करावे लागल्याने अहवाल दिला गेला नव्हता. त्यानंतर अहवाल पाठविण्यात आला असून, त्यावर समितीने निर्णयही घेतला आहे. यासंदर्भात माहिती घेण्यासाठी संबंधित शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना पुण्यात बोलावण्यात आले होते. त्यानुसार चौकशी झाली असून, अहवाल जाहीर करून त्यानुसार कारवाई करण्याची तयारी परीक्षा परिषद समितीने केली होती.

## केंद्रचालकांवर फाडले खापर?

यासंदर्भात परीक्षा परिषदेच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मराठी आणि इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका सारखीच असल्याने त्यात विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे अहवालात नमूद असल्याचे समजते. म्हणजेच या प्रकाराचे पूर्ण खापर केंद्रप्रमुखांवर फोडण्यात आल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात पसरली आहे. असे असले तरी मग अहवाल का जाहीर केला जात नाही याबाबत चर्चा सुरु आहे.

मात्र घटनेला १५ दिवस झाल्यानंतरही हा अहवाल खुला न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या अहवालामध्ये नक्की काय आहे याबाबत मोठी उत्सुकता आहे.

Nashik Main
Page No. 2 Dec 18, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# 'आरटीओं'चे प्रादेशिक परिवहन संकेतस्थळ पुन्हा बंद

## आठशेहून अधिक नागरिकांचे थांबले काम

लोकमत न्यूज नेटवर्क



तांत्रिक बिघाडाची माहिती नसल्यामुळे नागरिकांना काम न होऊन परत फिरावे लागले.

**नाशिक** : प्रादेशिक परिवहन विभागाच्या परिवहन संकेतस्थळात तांत्रिक अडचण निर्माण झाली असून, मंगळवारपासून हे संकेतस्थळ बंद आहे. परिणामी, शहरातील आरटीओ कार्यालयातून वाहन परवाना, वाहन नोंदणी, दंड भरणे, चलन भरणे आणि वाहन ट्रान्सफर देण्याचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे.

मंगळवार आणि बुधवार या दोन दिवसांत वाहन परवाना देण्यासह या संकेतस्थळावरील कोणतेही काम झाले नाही. यामुळे आठशेहून अधिक अर्जदारांना रिकाम्या हाताने परतावे लागले.

आरटीओ कार्यालयाचे वाहन परिवहन संकेतस्थळ मंगळवार (दि. १६) पासून अचानक बंद पडल्याने परवाना देण्याचे काम ठप्प झाले आहे. वारंवार संकेतस्थळ बंद पडत असल्याने वाहनधारकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

गेल्या काही वर्षांपासून उपप्रादेशिक परिवहन विभागाने जास्तीत जास्त सेवा ऑनलाइन देण्यावर भर दिला आहे. त्यामुळे नागरिकांना थेट कार्यालयात यावे लागत नाही, असा परिवहन विभागाचा दावा आहे. मात्र, कार्यालयाच्या संकेतस्थळात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मंगळवारपासून नागरिकांना वाहन नोंदणी, वाहन ट्रान्सफर, दंड भरणे, चलन भरणे आणि परवाना मिळवण्याच्या कामासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला.

> वाहनावर असलेल्या चलनचे दंड भरण्यासाठी आरटीओच्या संकेतस्थळावर प्रयत्न करत होतो. मात्र, संकेतस्थळच चालत नाही. आरटीओ कार्यालयात गेल्यानंतर तिथेही संकेतस्थळ चालत नसल्याचे सांगण्यात आले.
>
> **रमेश जाधव,** वाहनचालक

> संकेतस्थळाबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या आहेत. आरटीओचे मुख्यालय असलेल्या एनआयसी या डेटा सेंटरकडून वेबसाइट मेंटेनन्सचे काम अधूनमधून केले जाते. यामुळे सर्व्हर डाउन राहात असल्याने अडचण येत आहे.
>
> **राजश्री गुंड,** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी

## तांत्रिक बिघाडामुळे 'परिवहन'ची सर्वच कामे ठप्प

१ आरटीओची वेबसाइट असलेल्या 'परिवहन'ची सेवा कधी सुरू, तर कधी तांत्रिक बिघाडामुळे बंद पडत आहे. मागील सहा महिन्यात १५ ते १६ वेळा वेबसाइट बंद पडल्याची घटना घडली आहे. अनेकदा दुपारी कामाच्या वेळीच सर्व्हर डाऊन राहात असल्याच्या तक्रारी आहेत.

२ ऑनलाइन अर्ज केल्यानंतर पेमेंट न होणे, नवीन शिकाऊ, पक्का वाहन परवाना काढणे, परवाना नूतनीकरण, डुप्लिकेट परवाना आदी कामे वेळेत होत नाहीत. आता तांत्रिक बिघाडामुळे 'परिवहन'ची सर्वच कामे ठप्प झाली आहेत.

लोकमत

# कोकाटे यांचा वैद्यकीय कारणाचा अर्ज फेटाळला

## वॉरंट बजावले : अंतिम सुनावणीला गैरहजर राहिल्याने न्यायालयाने फटकारले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना सदनिका घोटाळ्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी धरत दोन वर्षांची सक्तमजुरी व दहा हजारांचा दंड अशी शिक्षा मंगळवारी सुनावली. न्यायालयाने बुधवारी (दि.१७) त्यांना अटकेचे वॉरंटही काढले. यावेळी त्यांच्या वतीने न्यायालयाला कोकाटे यांची प्रकृती बिघडलेली असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चार दिवसांची हजर होण्यासाठी मुदत मिळावी, असा अर्ज वकिलाकडूनकरण्यात आला; मात्र न्यायालयाने त्यांना फटकारत मंगळवारी अंतिम सुनावणीप्रसंगी गैरहजर का राहिलात, असा प्रश्नही विचारला अन् अर्ज फेटाळला.

नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधीश पी.एम. बदर यांच्या न्यायालयात मंगळवारी झालेल्या अंतिम सुनावणीप्रसंगी न्यायालयाने माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना सदनिका घोटाळ्याप्रकरणी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषी धरले. फेब्रुवारीमध्ये कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली शिक्षा सत्र न्यायालयानेही कायम ठेवली. यामुळे कोकाटे यांच्याकडून या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान देण्याच्या वेगवान हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. दरम्यान, बुधवारी नाशिकच्या जिल्हा न्यायालयाने कोकाटे यांच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी केले. यावेळी त्यांच्या वतीने ॲड. मनोज पिंगळे यांनी न्यायालयात त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती देत वैद्यकिय कारणास्तव अर्ज सादर केला; मात्र न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळून लावला आणि कोकाटे बंधू यांना अटक करण्याचे वॉरंट जारी केले, अशी माहिती विशेष सरकारी वकिल डॉ. सुधीर कोतवाल यांनी दिली आहे.

### कोकाटे बंधूंवर अटकेची टांगती तलवार

कोकाटे बंधूंवर अटकेची टांगती तलवार कायम आहे. न्यायालयाने वॉरंटची प्रक्रिया पूर्ण केली असून, न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी आता पोलिसांना पूर्ण करावी लागणार आहे.कोकाटे यांना अटक होणार का? याकडे आता नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

"न्यायालयाकडून अजामीनपात्र गुन्ह्यातील वॉरंट पोलिस आयुक्तालयाला प्राप्त झाले आहे. यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**संदीप मिटके**
**सहायक पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा**

"सदनिकांचा ताबा देण्याबाबतचा विषय फौजदारी कोर्टाच्या अखत्यारितितील नाही. यामुळे त्याबाबत आदेश करता येऊ शकत नाही. यापुर्वी कनिष्ठ न्यायालयाने सदनिकांच्या ताब्याबाबत केलेले आदेश सत्र न्यायालयाने निकाल देताना रद्द केले आहेत. याबाबत योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार शासनाला आहे. चारही सदनिकांचा ताबा कोकाटे यांच्याकडे ठेवावा, असे न्यायालयाने आदेशात कोठेही नमूद केलेले नाही.

**ॲड. डॉ. सुधीर कोतवाल**
**विशेष सरकारी वकील**

न्यायालयाने कोकाटे हे रुग्णालयात भरती झाल्याबाबतचे अधिकृत लेखी पुरावे सादर करावे, असे सांगितले. तसेच मुख्य अंतिम सुनावणीच्या वेळी गैरहजर का राहिले, असाही सवाल विचारला.

लोकमत

मस्ट READ

# आता बनावट, भेसळयुक्त औषधांची मात्रा नाही चालणार

## राज्य शासनाचा अत्याधुनिक उपकरणे खरेदीचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : राज्यातील शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये वाढत चाललेल्या बनावट आणि भेसळयुक्त औषधांच्या तक्रारींवर अखेर राज्य सरकारने ठोस पाऊल उचलले आहे. औषधांची गुणवत्ता जागेवरच तपासण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून (एफडीए) 'काउंटरफिट ड्रग डिटेक्शन डिव्हाइस' ही अत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपकरणांमुळे औषध अस्सल आहे की बनावट, याचा तत्काळ निकाल मिळणार असून, भेसळ आढळल्यास तातडीने कारवाई करणे




शक्य होणार आहे.

राज्यातील रुग्णालये, औषध दुकाने आणि वितरण साखळीत बनावट औषधांचा शिरकाव झाल्याच्या तक्रारी अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. दरम्यान, आतापर्यंत संशयित औषधांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवावे लागत होते, परंतु तपासणीला अनेक दिवस लागत होते. नव्या उपकरणांमुळे ही प्रक्रिया जागेवरच पूर्ण होणार आहे. त्यामुळे रुग्णांच्या जिवाशी खेळ करणाऱ्यांवर थेट आणि तत्काळ कारवाईचा मार्ग मोकळा होणार आहे.

### औषधांची गुणवत्ता जागेवरच तपासून निकाल

या उपकरणांद्वारे औषधाची रासायनिक रचना तपासून काही मिनिटांतच औषध अस्सल की बनावट, याचा प्राथमिक अहवाल मिळणार आहे.

### वर्षभरात बनावट औषधांवर किती कारवाया?

मागील एक वर्षात एफडीएकडून राज्यभरात शंभरहून अधिक तपासण्या केल्या असून अनेक ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत. लाखो रुपयांची औषधे देखील जप्त केली आहेत.

### खासगी सोडा, सरकारीतही बनावट औषधे !

औषध बोगस असल्याचे स्पष्ट झाल्यास परवाना रद्द करून गुन्हा दाखल केला जाणार आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाकडून (एफडीए) तपासणीत खासगी रुग्णालयेच नव्हे, तर काही शासकीय रुग्णालयांमध्येही निकृष्ट औषधे आढळल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

### आठ उपसंचालक कार्यालयांना देणार उपकरणे

राज्यातील अन्न व औषध प्रशासनाच्या आठ विभागीय उपसंचालक कार्यालयांना ही उपकरणे वितरित केली जाणार असून, संपूर्ण राज्यात औषध तपासणी प्रक्रिया अधिक प्रभावी होईल.

### शेकडो नमुने आढळले बोगस

मागील काही वर्षांत एफडीएकडून घेतलेल्या तपासणीत शेकडो औषध नमुने दर्जाहीन, बनावट किंवा भेसळयुक्त असल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये वेदनाशामक, अँटिबायोटिक्स आणि जीवनावश्यक औषधांचा समावेश आहे.

### प्रयोगशाळेत तपासणीला लागायचा वेळ

आतापर्यंत संशयित औषधांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवल्यानंतर निकालासाठी १५ ते ३० दिवस लागायचे. नव्या यंत्रणेमुळे हा कालावधी काही मिनिटांवर येणार आहे.



तपोवनजवळ रस्ता खोदून ठेवत आंदोलन करताना शेतकरी. छाया : प्रशांत खरोटे

# शेतकऱ्याच्या अंगावर हायवा घालण्याचा प्रयत्न; तपोवनातील आंदोलन झाले तीव्र

## आरएमसी प्रकल्पासाठी वाहतूक : शेतकऱ्यांचा विरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : तपोवन परिसरातील रेडिमिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्लांटमुळे रात्रीचे ध्वनी व वायुप्रदूषण होत आहे. याबाबतची तक्रार करणाऱ्या शेतकऱ्याच्या अंगावर कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्या नावाने दादागिरी करत अंगावर हायवा घालत ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप स्थानिक शेतकरी रवींद्र थोरात यांनी केला आहे.

याबाबत पोलिसात कोणतीही तक्रार नोंदविण्यात आलेली नाही. ठेकेदाराला तातडीने काढून टाकावे या मागणीसाठी जेजुरकर मळा परिसरातील शेतकऱ्यांनी तपोवनाजवळील (जुना सायखेडा रोड) रस्ता खोदून ठेवत बुधवारी (दि. १७) आंदोलन केले. या ठिकाणी आलेल्या ठेकेदार कंपनीच्या अधिकाऱ्याने संबंधिताकडून तातडीने काम काढून घेतले जाईल असे सांगितले, मात्र यावर समाधान न झाल्याने व मनपाचे अधिकारी जोपर्यंत प्रश्न सोडवायला येत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी रस्ता बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. यावेळी शेतकऱ्यांनी जागा आमच्या हक्काची, नाही कोणाच्या बापाची अशा घोषणा दिल्या. यावेळी समाधान जेजूरकर, रवी थोरात, किरण थोरात, सागर पवार, पप्पू शेलार, राकेश शेलार, अरुण भास्कर उपस्थित होते.

**१००** शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

## रहिवाशांना धुळीचा त्रास

सकाळपासून ते रात्रीपर्यंत मटेरिअल घेऊन वाहणाऱ्या वाहनांमुळे परिसरात धुळीचे साम्राज्य झाले असून अनेक शेतकऱ्यांना धुळीचा त्रास होत आहे. याबाबत ठेकेदार कंपनीच्या अधिकाऱ्याला संतप्त शेतकऱ्यांनी विचारणा केली. त्यावर लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.

## महाजनांच्या नावाने धमकी

कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्या नावाने धमकी देत दादागिरी करणे अत्यंत चुकीचे आहे. संबंधित ठेकेदार पेखळे यांच्यावर कारवाई करावी अशी भाजपतर्फे मागणी करण्यात येईल असे भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांनी सांगितले.

# घरात पुन्हा गोडधोड होणार; रेशनवर पुन्हा साखर मिळणार

## वर्षभरानंतर रेशनची साखर गोड; १.२९ लाख अंत्योदय कार्डधारकांना लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** जिल्ह्यातील १,७६,४३० अंत्योदय कार्डधारकांना तब्बल वर्षभरानंतर रेशनची साखर गोड होणार आहे. यासाठी पुरवठा विभागाने सहा महिन्यांचे नियतन मंजूर केले आहे. यामध्ये डिसेंबर महिन्यापासून मे महिन्यापर्यंत दरमहा एक किलो साखर २० रुपये किलोने मिळणार आहे. यासाठी पुरवठा विभागाकडे पुरेशी साखर उपलब्ध झाली आहे.

निविदेअभावी गतवर्षापासून रेशन दुकानातून साखर वितरण बंद होते. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला डिसेंबर २०२५ ते मे २०२६ या सहा महिन्यांचे साखर नियतन मंजूर झाले असून, साखरेचे दर महिन्याला वितरण होणार आहे. मागच्यावर्षी दिवाळी, दसरा तसेच त्यापूर्वी गुढीपाडवा, होळीला आनंदाचा शिधा मिळालेला नाही. त्यातच दिवाळीलाही रेशन दुकानात साखर मिळाली नव्हती. त्यामुळे लाभार्थींमध्ये नाराजी होती. आता मात्र तिढा सुटताच साखर उपलब्ध झाली आहे.

साखरेसाठी बाजारात किलोला ४४ रुपये मोजावे लागतात. मात्र, रेशन दुकानातून २० रुपये किलोने साखर मिळणार आहे. जिल्हा पुरवठा विभागाच्या गोदामात साखर उपलब्ध झाली असून तालुकानिहाय वाटपाची प्रक्रिया होत आहे.

### दीड वर्षानंतर पुरवठा

गतवर्षी 'आनंदाचा शिधा'मध्ये साखरेचा पुरवठा झाला होता. त्यानंतर निविदा प्रक्रिया व्हायची असल्याचे सांगून अंत्योदय लाभार्थ्यांना साखरेसाठी हात झटकले होते. आता डिसेंबर महिन्यात साखर मिळत आहे.

### एका कार्डवर या दराने मिळत आहे साखर...

एका अंत्योदय रेशनकार्डधारकाला एका कार्डवर फक्त एक किलो साखर ही २० रुपये किलो दराने मिळणार आहे. त्यामुळे गहू, ज्वारी, तांदळाप्रमाणेच साखरेचे वाटप करावे, अशी अंत्योदय लाभार्थ्यांची मागणी आहे.



### या कार्डधारकांना मिळणार साखरेचा लाभ

जिल्ह्यात अंत्योदय गटातील १,७६,४३० लाभार्थींना साखरेचा २० रुपये किलोप्रमाणे लाभ मिळणार आहे. बाजारात साखर ४४ रुपये किलोप्रमाणे विकली जात आहे; मात्र या लाभार्थ्यांना प्रति कार्ड फक्त एक किलो साखर मिळत असल्याने त्यांच्यात नाराजी आहे.

"गुदामातून जिल्ह्यातील रेशन दुकानांत साखरेचे वितरण करण्यात येत आहे. मंजूर नियतनाप्रमाणे साखरेचे तालुकानिहाय वाटप करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना याच महिन्यापासून साखरेचे वाटप होत आहे

**सीमा अहिरे**, प्र.जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक.

### जिल्ह्यात अंत्योदयचे लाभार्थी किती ?

| | |
|---|---|
| बागलाण | १३११५ |
| चांदवड | ६२७५ |
| देवळा | ५०६३ |
| दिंडोरी | १३०८३ |
| मालेगाव | १६६५० |
| नाशिक | १०५५४ |
| इगतपुरी | १०७२७ |
| कळवण | ८६०९ |
| मालेगाव एक | ११२३४ |
| नांदगाव | ८७५३ |
| नाशिक एक | ८५७३ |
| निफाड | १०७६८ |
| पेठ | १०७८० |
| सिन्नर | ८०६१ |
| सुरगाणा | १५२७६ |
| त्र्यंबकेश्वर | ८८१९ |
| येवला | १००१० |



लोकमत

# पोरगं आतापासून खंबीर बनणार; शाळेत 'मनाचा डॉक्टर' नेमणार !

## परीक्षेच्या तणावामुळे विद्यार्थ्यांमध्ये येतेय नैराश्य : विशेष मार्गदर्शन सत्रे घेतली जाणार

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : राज्यातील विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण, गुणांच्या स्पर्धेमुळे निर्माण होणारा मानसिक दबाव आणि वाढते नैराश्य लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. आता राज्यातील प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेतली जाणार आहे. विशेषतः इयत्ता नववी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व समुपदेशनावर भर दिला जाणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य सुदृढ करण्यास मोठी मदत मिळणार आहे.

### प्रशिक्षण अन् समुपदेशन

विद्यार्थ्यांसाठी तणाव कसा हाताळावा, आत्मविश्वास कसा वाढवावा, परीक्षेच्या भीतीवर मात कशी करावी, यावर विशेष प्रशिक्षण सत्रे घेतली जाणार आहेत. वैयक्तिक तसेच गट समुपदेशनावर भर राहील.

**९**

**सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती धोरण ठरवणे, या धोरणाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे आणि अहवाल सादर करणे, आदी कामे करणार आहे, अशी माहिती देण्यात आली.**

### शिक्षकांसाठीही समुपदेशन प्रशिक्षण सत्र उपलब्ध

विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांसाठीही मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन कोर्स राबवण्यात येणार आहेत. त्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीची ओळख करून योग्य प्रकारे मदत करू शकतील. तसेच करिअर, परीक्षा, भविष्याची दिशा ठरवण्यासाठी नववी ते १२वीच्या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शक व समुपदेशक उपलब्ध करून दिले जाणार आहेत.



### अजाणत्या वयात विद्यार्थ्यांवर वाढतोय ताण

आजच्या स्पर्धात्मक युगात लहान वयातच विद्यार्थ्यांवर अभ्यास, परीक्षा, अपेक्षा आणि तुलना यांचा मोठा ताण येत आहे. योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने अनेक विद्यार्थी तणाव, भीती आणि नैराश्याला सामोरे जात आहेत.

> **विद्यार्थ्यांना दहावीपूर्वी समुपदेशन मिळाल्यास परीक्षेतील तणाव, भीती आणि नैराश्य कमी करता येते. शाळेतच 'मनाचा डॉक्टर' उपलब्ध असणे ही काळाची गरज आहे.**
>
> डॉ. उमेश नागापूरकर, मानसोपचार तज्ज्ञ

### पाठ्यपुस्तकांमध्ये हेल्पलाइन नंबर

१. विद्यार्थ्यांना तातडीच्या मदतीसाठी पाठ्यपुस्तकांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित हेल्पलाइन क्रमांक छापण्यात येणार आहेत.

२. त्यामुळे गरज पडल्यास विद्यार्थी थेट संपर्क साधू शकतात अन् त्यावर संबंधित तज्ज्ञांचे समुपदेशन मिळवू शकणार आहेत.

### अभ्यासाचा ताण, गुणांच्या स्पर्धेत हिरावतेय बालपण

गुण मिळवण्याच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांचे बालपण हरवत चालले आहे. खेळ, छंद आणि आनंदी जीवनापेक्षा केवळ गुणांवर लक्ष केंद्रित होत असल्याने मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. तरी पालकांनी मुलांवर अतिरिक्त दबाव टाकू नये; जेणेकरून आपल्या मुलांचे बालपणच हिरावले जाईल. त्यामुळे प्रत्येक मुलाला बालपण मनसोक्त जगू द्या, असेही मानसोपचार तज्ज्ञांनी सांगितले.

# तलाठ्याचा सही-शिक्का कशाला? १५ रुपयांतच डिजिटल सातबारा !

## अडवणूक होण्याचा विषयच नाही : शासकीय कामांसाठीही डिजिटल सातबारा धरणार ग्राह्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्यातील सर्व शेतजमिनींच्या डिजिटल सातबारा आणि आठ-अ, तसेच फेरफार नोंदींना महसूल विभागाने कायदेशीर मान्यता दिली आहे. त्यामुळे डिजिटल सातबारा तलाठ्याच्या सहीविनाही अधिकृत असेल, ७/१२, ८-अ आणि फेरफार उतारे हे सर्व शासकीय, निमशासकीय तसेच बँकिंग, कर्जप्रक्रिया, न्यायालयीन कामकाजासाठी पूर्णपणे कायदेशीर व वैध ठरतील.

महाभूमी पोर्टलवरून अवघ्या १५ रुपयांत सातबारा उतारा मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचे उतारे आणि नोंदी मिळवण्यासाठी तलाठी कार्यालयाच्या पायऱ्या चढाव्या लागणार नाहीत. हे डिजिटल उतारे तलाठ्याच्या सही-शिक्क्यांशिवायही सर्व शासकीय आणि खासगी कामांसाठी वैध मानले जाणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली. त्यामुळे तलाठी आणि इतर कर्मचारी यांचा संप असला तरी दाखले त्वरित मिळतील.

### चकरांची गरज नाही

बँकिंग, कर्ज प्रक्रिया, मालमत्ता व्यवहारासह न्यायालयीन कामकाजात या कागदपत्रांचा वापर होईल. त्यामुळे आता सातबारा काढण्यासाठी तलाठी कार्यालयात चकरा मारण्याची गरज नाही.



### कोणत्या कामांसाठी वैध ठरणार?

डिजिटल सातबरा, आठ-अ आणि फेरफार उतारा हे कागदपत्र शासकीय, निमशासकीय तसेच इतर महत्त्वाच्या कामांसाठी पूर्णपणे कायदेशीर आणि वैध ठरतील. या कागदपत्रांचा वापर शासकीय कामकाजांसाठी, जसे की जमिनीच्या हक्काची नोंदणी, महसूल विभागाचे कार्य आणि सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी होईल.

### जलद, किफायतशीर सेवा

डिजिटल सातबारा आणि इतर कागदपत्रे आता अवघ्या १५ रुपयांत मिळवता येतील. महाभूमी पोर्टलवर ऑनलाइन पेमेंट करून घरबसल्या, किंवा सेतू केंद्राद्वारे, डिजिटल सातबारा उतारा प्राप्त करू शकतात. यामुळे शेतकऱ्यांना जलद आणि किफायतशीर सेवा मिळेल.

### तलाठ्यांच्या सही-शिक्क्यांची गरज नाही...

महाराष्ट्र सरकारने डिजिटल सातबारा आणि अन्य संबंधित कागदपत्रांना कायदेशीर मान्यता दिली आहे, ज्यामुळे तलाठ्यांच्या सही आणि शिक्क्यांची आवश्यकता आता संपुष्टात आली आहे. डिजिटल स्वाक्षरी, क्यूआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांक यासारख्या सुरक्षा वैशिष्ट्यांमुळे, या कागदपत्रांचा वापर शासकीय आणि अन्य महत्त्वाच्या कार्यासाठी पूर्णपणे वैध ठरतो.

### कुठून अन् कसा डाऊनलोड करायचा?

डिजिटल सातबारा आणि इतर कागदपत्रे महाभूमी पोर्टलवर लॉगिन करून जिल्हा, तालुका, गाव व गट क्रमांक टाकल्यानंतर ७/१२ मिळेल. आवश्यक कागदपत्र निवडा, ऑनलाइन पेमेंट करा आणि डिजिटल स्वाक्षरीसह कागदपत्र डाउनलोड करा. तसेच, सेतू केंद्रावर जाऊनही हे कागदपत्र मिळवता येऊ शकतात. ऑनलाइन कुठेही काढता येईल. या डिजिटल सातबाऱ्याला सासनाची कायदेशीर मान्यता असल्याचे प्रशासनाने सांगितले.

### काय आहे डिजिटल सातबारा

डिजिटल सातबारा, आठ-अ आणि फेरफार उतारा हे महत्त्वाचे भूधारक कागदपत्रे आहेत. डिजिटल सातबारा म्हणजे जमिनीच्या मालकी हक्काची माहिती दर्शवणारे कागदपत्र, ज्यात क्यूआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांक असतो.

### कायदेशीर मान्यता

महाराष्ट्र सरकारने डिजिटल सातबारा, आठ-अ आणि फेरफार उतारा यांना कायदेशीर मान्यता दिली आहे. यामुळे, या डिजिटल कागदपत्रांचा वापर शासकीय, निमशासकीय, बँकिंग, कर्ज प्रक्रिया आणि न्यायालयीन कामकाजात पूर्णपणे वैध ठरणार आहे. महसूल विभागाने या सर्व डिजिटल नोंदींना अधिकृत कायदेशीर मान्यता दिली आहे.

> डिजिटल सातबाऱ्यामुळे शेतकऱ्यांना आणि नागरिकांना जलद आणि पारदर्शक सेवा मिळत आहे. शिवाय कामकाजात अधिक सुलभता आलेली आहे.
>
> **अमोल निकम,** अपर तहसीलदार, नाशिक.

लोकमत

# कायद्याचे रक्षण करणाऱ्या पोलिसांचेही आता घर होणार

## आशा पल्लवित : डीजी लोन योजनेला भरघोस निधीचा पुरवठा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** पोलिस कर्मचाऱ्यांचे हक्काचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी राज्य सरकारकडून त्यांना 'डीजी लोन' योजनेंतर्गत कर्जपुरवठा केला जातो. मागील दोन वर्षांपासून या योजनेला निधीची घरघर लागलेली होती. राज्य शासनाने आता मागील महिन्यात या योजनेसाठी १७६८.०८ कोटींच्या निधी मंजूर केला आहे. यामुळे पोलिसांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रलंबित गृहप्रकरणाची अर्ज आता निकाली काढण्यास मदत होईल, असा आशावाद पोलिस दलात व्यक्त होत आहे.

जनतेचे संरक्षण करताना आपल्या कुटुंबाकडे कळत-नकळत पोलिसांकडून दुर्लक्ष होते. आपले स्वतःचे हक्काचे घर व्हावे, असे प्रत्येकाला वाटते, तसे स्वप्न पोलिसदादासुद्धा बाळगून असतो. त्यांचे हे स्वप्न लवकरच साकार होणार असल्याचे संकेत मिळत आहे. शासनाने 'डीजी लोन' योजनेला निधीचा पुरवठा करत पुनरुज्जीवन दिल्याने राज्याच्या पोलिस दलात आनंदाची लहर पसरली आहे. यामुळे राज्यभरातील साडेपाच हजार पोलिसांचे गृहकर्जाचे (गृहबांधणी अग्रिम) रखडलेल्या प्रस्तावाच्या फायलींवरील धूळ झटकली जाणार आहेत. या प्रस्तावांची रक्कम १ हजार ७६८ कोटींच्या घरात आहे. ही योजना ठप्प झाल्याने पोलिसांच्या आर्थिक नियोजनावर त्याचा परिणाम होत होता.



### पोलिसांसाठीची 'डीजी लोन' योजना काय?

पोलिस अधिकारी, अंमलदारांना त्यांच्या मासिक वेतनाच्या बेसिक रकमेच्या १२५पट कर्ज देणारी ही योजना पोलिसांसाठी मोठा आधार ठरते. मात्र, या योजनेला दरम्यानच्या काळात घरघर लागली होती. आता पुन्हा या योजनेला पुनरुज्जीवन शासनाने दिले आहे.

### प्रस्तावांना मंजुरीची प्रतीक्षा

मागील तीन वर्षांत पोलिस आयुक्तालयाकडे प्राप्त झालेल्या १३५ अर्जांपैकी केवळ नऊ प्रस्ताव मंजूर करण्यात आले होते. एकूण १२६ प्रस्ताव प्रलंबित आहे. योजनेला निधीचा पुरवठा झाल्याने आता हे प्रस्तावदेखील मंजूर होतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### तब्बल दोन वर्षांनंतर...

नाशिक शहरासह जिल्ह्यातील पोलिसदादाने हक्काच्या घरासाठी 'डीजी लोन' योजनेंतर्गत अर्ज सादर केले आहेत. या योजनेला सरकारकडून तब्बल दोन वर्षांनंतर 'बूस्ट' दिला गेला आहे. यामुळे पोलिसदादांचे हक्काचे घर साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



### १,७६८ कोटींची मान्यता

शासनदरबारात पोलिसांच्या गृहकर्जाचे प्रस्ताव या योजनेंतर्गत पाठविण्यात आले असून, त्यासाठी एकूण १,७६८ कोटी रुपयांच्या निधीला सरकारच्या मान्यतेची प्रतीक्षा होती. शासनाने इतका निधी मंजूर केला आहे. ३१ डिसेंबर २०२४ सालापर्यंत १,१९३ प्राप्त अर्जांसाठी ४ हजार २५ कोटी एक लाख रुपयांची गरज होती.

### योजनेसाठी कोण पात्र...?

राज्य पोलिस दलातील कायमस्वरूपी कर्मचारी असल्यास घर बांधकाम, सदनिका खरेदी, किंवा घराच्या विस्तारासाठी कर्ज पुरवठा केला जातो. कर्जाची रक्कम मूळ वेतनाच्या १२५ पट इतकी असते. कमी व्याजदर, सुलभ परतफेड आणि काही सेवा कालावधीची अट या योजनेत असते. पोलिस मुख्यालयाकडे अर्ज केल्यानंतर तो प्रस्ताव पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात येतो व तेथून मंजुरी मिळते. पद, वेतनश्रेणी आणि सेवा कालावधी यानुसार कर्जाची रक्कम निश्चित होत असल्याने अल्प व मध्यम वेतनधारक पोलिसांनाही घर घेणे शक्य होते.

लोकमत

# आचारसंहितेच्या काही तास आधी मनपात ४० कोटींच्या निविदा मंजूर

## मालेगाव मनपा निवडणूक : प्रशासकीय कामकाजासाठी अधिकाऱ्यांची धावपळ

मनपा निवडणूक २०२५ लोकमत सुपर Vote

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** राज्य निवडणूक आयोगाने येथील महापालिकेच्या २१ प्रभागांतील ८४ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. सोमवारपासून आचारसंहिता सुरू झाली असून, या ८४ जागांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यामुळे मनपा हद्दीत आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने मनपातर्फे अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, आदर्श आचारसंहिता (दि.१५) जाहीर होण्याच्या काही तास आधी महानगरपालिकेने ४० कोटींच्या ९० कामांच्या निविदांच्या विकासकामांना मंजुरी दिली आहे.

शहरातील अंतर्गत व प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण व कॉंक्रिटीकरण, नालेसफाई व ड्रेनेज सुधारणा, जागांचे सर्वेक्षण यासह रुग्णालये व दवाखान्यांचे स्लॅब आदी कामांचा समावेश आहे. या निर्णयामुळे एकीकडे शहराच्या विकासाला चालना मिळणार आहे. सेच आधी मंजूर केलेल्या ३० कामांच्या निविदांची मुदत मंगळवारी (दि.१६) संपल्याने त्या आचारसंहितेमुळे रखडली आहेत. यात रस्ते, ड्रेनेज व नागरी सुविधा यांसारख्या विविध विभागांतील महत्त्वाच्या विकासकामांचा समावेश आहे.



### आयोगाची नजर

महापालिका हद्दीतील सर्व विकासकामांवर राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष देखरेख ठेवली जाणार आहे. यासाठी स्वतंत्र निरिक्षण यंत्रणा कार्यरत असणार आहे.

### अंमलबजावणीचे मनपासमोर आव्हान

१ आचारसंहिता लागू झाल्यानंतर नव्या कामांना मंजुरी देता येणार नसली, तरी मंजूर कामांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार व्हावी, हीच खरी कसोटी असणार आहे. केवळ कागदोपत्री मंजुरी न राहता प्रत्यक्ष कामे केव्हा सुरू होतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. ही कामे लवकरात लवकर व्हावीत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

२ **मनपाच्या २४ वर्षांच्या कारकीर्दीत प्रथमच तीन वर्षे प्रशासकीय राजवट राहीली. यातील गेल्या दोन वर्षात ७५० कोटींच्या विविध विकासकामांना प्रशासकांनी गती दिली.**

३ एकूण तीन अंदाजपत्रकांवर प्रशासकांचा प्रभाव होता. यात शहरातील पिवळी लाइट काढून एलईडी लावण्याची कामे, नवीन ३८ आरोग्य केंद्रांची कामे, उद्याने, वाडिया रुग्णालयाचे बांधकाम आदी कामांचा समावेश आहे.

लोकमत

# आता जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी आधार प्रमाणित डिजिटल सिग्नेचर; वडांगळी ग्रामपंचायतचा जिल्ह्यात पहिला प्रयोग

## बनावट दाखल्यांना कायमचा पायबंद बसणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**सिन्नर :** सिन्नरच्या पूर्व भागातील वडांगळी ग्रामपंचायतीने प्रशासनातील पारदर्शकतेचा नवा आदर्श निर्माण करत जिल्ह्यात सर्वप्रथम जन्म व मृत्यू दाखल्यांसाठी आधार प्रमाणित डिजिटल सिग्नेचर प्रणाली कार्यान्वित केली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे बनावट व डुप्लिकेट दाखल्यांना कायमचा पायबंद बसणार आहे.



वडांगळी ग्रामपंचायतकडून जिल्ह्यात सर्वप्रथम जन्म व मृत्यू दाखल्यांसाठी आधार प्रमाणित डिजिटल सिग्नेचर प्रणाली करण्यात आली.

आतापर्यंत जन्म-मृत्यू दाखले प्रिंट काढून त्यावर हस्ताक्षर सही केली जात होती. या प्रक्रियेत गैरप्रकार, छेडछाड किंवा डुप्लिकेट दाखले तयार होण्याची शक्यता होती. मात्र नव्या प्रणालीत ग्रामपंचायत अधिकाऱ्याचा आधार क्रमांक मोबाइल ओटीपीद्वारे प्रमाणीकरण करून डिजिटल सिग्नेचर लावली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक दाखला अधिकृत, सुरक्षित व तांत्रिकदृष्ट्या प्रमाणित ठरणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी सरपंच नानासाहेब खुळे, उपसरपंच हर्षदा खुळे, तसेच ग्रामपंचायत सदस्य योगेश घोटेकर, राहुल खुळे, अमोल आढंगळे, रवी माळी, गायत्री खुळे, योगिता भावसार, लता गडाख, अनिता क्षत्रिय यांनी पुढाकार घेतला. उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत अधिकारी योगेश चित्ते, केंद्रचालक राहुल खुळे आदींनी विशेष मेहनत घेतली. वडांगळी ग्रामपंचायतीच्या या नव्या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून, कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान व सुलभ होणार आहे. जन्म दाखल्यासारख्या महत्त्वाच्या दस्तऐवजांवर डिजिटल सिग्नेचर लागू केल्याने ई-गव्हर्नन्सला चालना मिळाली असून, जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतींसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा सरपंच नानासाहेब खुळे यांनी व्यक्त केली.

## छेडछाड झाल्यास त्वरित ओळखता येणार

या प्रणालीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे डुप्लिकेट किंवा बनावट दाखले तयार करणे आता अशक्यप्राय होणार आहे. डिजिटल सिग्नेचरमुळे दाखल्यावर छेडछाड झाल्यास त्वरित ओळख पटणार असून नागरिकांना मिळणाऱ्या दाखल्यांची वैधता सर्व शासकीय व प्रशासकीय स्तरांवर सहज तपासता येणार आहे, असे तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष सुदेश खुळे यांनी सांगितले.

लोकमत

# माजी शिक्षणाधिकारी नितीन उपासनी यांना पोलिस कोठडी

## शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** शासनाची ५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दि. ९ डिसेंबर रोजी येथील छावणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील संशयित जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नितीन मुरलीधर उपासनी यांना न्यायालयाने १९ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. उपासनी यांना मंगळवारी आर्थिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले होते.

येथील छावणी पोलिसात संगमेश्वरातील महात्मा ज्योतिबा फुले संस्थेविरुद्ध शासनाचे आदेश व कागदपत्राचा वापर करून शासनाची ४ ते ५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी उपनिरीक्षक भगवान खंडू कोळी यांनी संस्थेचे चेअरमन सुनील माधवराव वडगे, सचिव जिभाऊ रघुनाथ आहिरे, (रा. दोघे संगमेश्वर, मालेगाव), जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी तथा माजी वेतन अधीक्षक उदय विठ्ठलराव देवरे, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नितीन मुरलीधर उपासनी, शिक्षण अधिकारी नितीन बच्छाव आदींसह १४ ते १५ जणांविरुद्ध तक्रार दिली आहे. त्यातील संशयित उपासनी यास आर्थिक गुन्हे शाखेने मंगळवारी (दि. १६) नाशिक येथून ताब्यात घेतले आहे. त्यांना बुधवारी (दि. १७) दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (चौथे) एम. टी. खराडे यांच्यासमोर सुनावणी करण्यात आली.

यावेळी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील केवल नांदोडे यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर उपासनी यांना १९ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे. सदर गुन्हा तपासासाठी नाशिक ग्रामीणच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे पुढील तपास करीत आहेत.

Nashik Main
Page No. 2 Dec 18, 2025
Powered by: erelego.com

दै.लोकसत्ता

दि.१८ डिसेंबर,२०२५


लोकसत्ता

# नाशिकसाठी ६४०० दशलक्ष घनफूट पाणी

## शहरासह ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतील गळती कमी करण्याचे निर्देश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक पाशिक शहरासह प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांमध्ये पाण्याचा अपव्यय अर्थात नुकसानीचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या निकषानुसार हे प्रमाण १५ टक्क्यांहून कमी असायला हवे. पाण्याचे नुकसान टाळण्यासाठी पालिकेसह संबंधित संस्थांनी गळती रोखण्यासाठी मिटर बसविणे आणि आवश्यक त्या उपाय योजना करण्यास सांगण्यात आले आहे. - **आयुष प्रसाद** (जिल्हाधिकारी, नाशिक)



**नाशिक** : शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नाशिककरांची तहान भागवण्यासाठी महापालिकेच्या मागणीनुसार २०२५-२६ वर्षासाठी गंगापूर, दारणा आणि मुकणे धरणातून एकूण ६४०० दशलक्ष पाणी आरक्षणास मान्यता देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत शहराला २०० दशलक्ष घनफूट अधिक पाणी मिळणार आहे. नाशिक शहरासह ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्यात गळतीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने ठोस उपाय योजण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली पाणी आरक्षणाबाबत आढावा बैठक पार पडली. यावेळी पाटबंधारे विभागाने सादर केलेल्या पाणी आरक्षण प्रस्तावास मान्यता देण्यात आली. शहराची अंदाजित व तरंगती लोकसंख्या २२ ते २५ लाखांच्या आसपास आहे.

२०२४-२५ वर्षात शहरात दररोज सरासरी ५७१.६८ दशलक्ष लिटर प्रतिदिन म्हणजेच २०.१९ दशलक्ष घनफूट प्रतिदिन पाणी पुरवठा झाला होता. वाढती गरज लक्षात घेऊन १५ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीसाठी महापालिकेने तीन धरणांमध्ये एकूण ६४०० दशलक्ष घनफूट पाणी आरक्षित करण्याची मागणी केली. गतवर्षी महापालिकेसाठी ६२०० दशलक्ष घनफूट पाणी आरक्षित करण्यात आले होते.

यंदा प्रदीर्घ काळ पाऊस झाल्यामुळे धरणांमध्ये मुबलक जलसाठा आहे. त्यामुळे पालिकेच्या मागणीचा सकारात्मक विचार करण्यात आला. यंदाच्या प्रस्तावात गंगापूर धरणात ४६००, मुकणे धरणात दीड हजार आणि दारणा धरणात ३०० दशलक्ष घनफूट पाण्याचा समावेश असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### आर्थिक शिस्त लावण्याची गरज

- रेल्वेसह विविध संस्था, पाणी पुरवठा योजनांकडे पाणीपट्टीची मोठी थकबाकी आहे. रेल्वेसह काही संस्थांना वेळेवर देयके दिल्यास ही रक्कम लवकर मिळू शकते.
- पाटबंधारे विभागाला जिल्हा परिषदेला उपकर द्यावा लागतो. तर जिल्हा परिषदेकडे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची पाणीपट्टीची थकबाकी आहे.
- या दोन्ही विभागांची परस्परांवर थकबाकी आहे. या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करून आर्थिक शिस्त लावावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती



# उड्डाणपुलावर बस जळून खाक

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** शहरात मुंबई-आग्रा महामार्गावरील पाथर्डी फाटा परिसरात उड्डाणपुलावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसने बुधवारी सायंकाळच्या सुमारास अचानक पेट घेतला. बसमध्ये प्रवासी नसल्याने जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे उड्डाणपुलावर काही काळ वाहतूक खोळंबली होती.

राज्य परिवहन महामंडळाची नंदुरबार आगाराची बस बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास नंदुरबारहून नाशिककडे येत होती. बस आडगाव परिसरात येताच ब्रेक नादुरुस्त झाल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्याने बस थांबवून नाशिक आगाराला माहिती दिली. महामंडळाच्या वतीने दुसरी बस पाठवून प्रवाशांना नाशिकमध्ये आणले. नादुरूस्त बस महामार्गावर असलेल्या गॅरेजमध्ये दुरूस्तीसाठी रवाना झाली. ही बस उड्डाणपुलावरून पाथर्डी फाटा परिसरात आली असता चौफुलीवर बसचे टायर फुटले. काही क्षणात बसच्या मागील भागातून धूर आणि आगीचे लोळ उठू लागले. हा प्रकार पाठीमागे असलेल्या वाहनातील सचिन ठाणगे या युवकाच्या लक्षात येताच त्यांनी वेगाने वाहन पुढे नेत याबाबत बस चालकाला माहिती दिली. तोपर्यंत बसच्या मागील भागाला मोठ्या प्रमाणात आग लागली होती. बस थांबताच अग्निशमन सिलेंडरच्या सहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, सिलेंडरची मुदत संपली होती. तत्काळ अग्निशमन विभागाला माहिती देण्यात आली.

> नंदुरबार आगाराची बस बुधवारी नाशिकला प्रवासी घेऊन येत होती. ही बस भाडेतत्वावर घेतली आहे. आडगाव परिसरात बसचे ब्रेक नादुरुस्त झाले. प्रवासी अन्य बसमध्ये बसविण्यात आले. नादुरुस्त बस दुरूस्तीसाठी येत असतांना बसला अचानक आग लागली. हे कशामुळे घडले याचा तपास सुरू आहे.
>
> **– किरण भोसले**, विभागीय वाहतूक अधिकारी

अग्निशमन दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत आगीत बस जळून खाक झाली. अर्धा तास प्रयत्न केल्यावर आग विझविण्यात यश आले. बस चालक एन. ए. न्याहाळदे आणि तांत्रिक सहायक पठाण हे आग लागताच खाली उतरले होते. या सर्व प्रकाराची माहिती वाहतूक विभागाला मिळाली असता वाहतूक नियंत्रण कक्षाच्या वतीने उड्डाणपुलावरील वाहतूक थांबवून टप्प्याटप्प्याने वाहतूक वळविण्यात आली. आग नियंत्रणात आल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. आग विझविण्याचे मदतकार्य सुरू असतांना उड्डाणपुलाखालील परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. एक ते दीड किलोमीटर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व पोलिसांनी कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# एकीकडे बंदुकीचा परवाना, दुसरीकडे अल्प उत्पन्न

## मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरुद्ध वादाचे सत्र सुरूच

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकेचा लाभ घेण्याच्या प्रकरणात राज्याचे क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांची दोन वर्षाची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्याने त्यांचे मंत्रिपद धोक्यात आले आहे. सुमारे ३० वर्षांपूर्वी दिलेल्या परस्परविरोधी माहितीत मंत्री कोकाटे अडकले.

कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला शासनाकडून म्हणजे मुख्यमंत्री कोट्यातून कमी दरात सदनिका उपलब्ध केली जाते. त्यासाठी संबंधिताला आपल्या नावावर कुठेही सदनिका नसल्याचे प्रतिज्ञापत्र, वार्षिक उत्पन्न व आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी लागतात. माणिकराव आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी १९९५ मध्ये अशी कागदपत्रे सादर करून नाशिकमधील कॅनडा कॉर्नर भागात निर्माण अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून दोन सदनिका प्राप्त केल्या. या संदर्भात तक्रारी झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने चौकशी केली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नागरी जमीन (कमाल मर्यादा विनियमन) विभागाचे तत्कालीन अधिकारी विश्वनाथ पाटील यांनी ॲड. माणिकराव कोकाटे, त्यांचे बंधू विजय कोकाटे यांच्यासह एकूण चार जणांविरुद्ध बनावट दस्तावेजाव्दारे शासनाची फसवणूक केल्याबाबत तक्रार दिली होती. त्यावरून चार जणांविरुध्द सरकारवाडा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

याच गुन्ह्यात मंत्री माणिकराव आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली शिक्षा नंतर सत्र न्यायालयाने कायम ठेवली. दरम्यान, ३० वर्षांपूर्वी सदनिका मिळवण्याच्या आधी बंदुकीचा परवाना मिळवण्यासाठी केलेला प्रयत्न मंत्री कोकाटे यांच्या अंगलट आला. रोकड सुरक्षितपणे हाताळताना संरक्षणासाठी बंदुकीचा परवाना देण्याची मागणी त्यांनी केली होती. कोकाटे यांनी १९९४ मध्ये संरक्षणासाठी बंदुकीचा परवाना मिळावा म्हणून जिल्हा प्रशासनाकडे अर्ज केला होता. या अर्जात त्यांनी आपले उत्पन्न आणि व्यवसाय मोठा असल्याचे भासवले होते. अर्जात नमूद केल्यानुसार त्यांच्याकडे ४० ते ५० कामगार कामाला होते. या कामगारांना दर आठवड्याला सुमारे नऊ हजार रुपये रोख पगार द्यावा लागत होता. मोठ्या प्रमाणात रोख रक्कम हाताळत असल्याने सुरक्षेसाठी बंदूक आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले होते.

मात्र, हेच दावे त्यांच्या विरोधात गेले. अल्प उत्पन्न गटातून घर घेण्यासाठी वार्षिक उत्पन्न ३० हजार रुपयांच्या आत असणे आवश्यक होते. मात्र, जी व्यक्ती आठवड्याला नऊ हजार रुपये पगार वाटते, तिचे उत्पन्न ३० हजार कसे असू शकते, हाच कळीचा मुद्दा तत्कालीन प्रशासनाने हेरला. एका बाजूला सधन असणारे कोकाटे दुसरीकडे अल्प उत्पन्न गटातून सदनिका मिळवत होते. हा विरोधाभास कोकाटे यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यापर्यंत घेऊन गेला

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# कोकाटेंच्या अटकेचे आदेश

## शिक्षेविरोधातील याचिकेवर उच्च न्यायालयात उद्या सुनावणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक / मुंबई :** बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकेचा लाभ घेण्याच्या प्रकरणात दोन वर्षांची शिक्षा झालेले राज्याचे क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांच्याविरुद्ध जिल्हा न्यायालयाने अटकेचे आदेश (वॉरंट) दिले. कोकाटे मुंबईतील रुग्णालयात दाखल असल्याचे सांगितले जाते. कोकाटे यांनी आमदारकी आणि मंत्रीपद वाचवण्यासाठी बुधवारी उच्च न्यायालयात धाव घेतली. शिक्षा कायम ठेवण्याच्या नाशिक येथील सत्र न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली. या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी होईल.

### मुख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा - आशुतोष राठोड



वैद्यकीय कारणास्तव रुग्णालयात दाखल झाल्याचा कुठलाही पुरावा देण्यात आला नाही. आता नाशिक पोलिसांनी मंत्री कोकाटे यांना अटक करून कारागृहात रवानगी करणे ही कायदेशीर प्रक्रिया आहे. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार दोन वर्षांची शिक्षा झाल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधी लगेच अपात्र ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे न्यायप्रिय आहेत, आता तरी त्यांनी मंत्री कोकाटेंचा राजीनामा घेऊन राज्य कायद्याचे राज्य असल्याची प्रचीती द्यावी, अशी मागणी ॲड. आशुतोष राठोड यांनी केली.

वैद्यकीय कारणास्तव शरण येण्यासाठी त्यांनी चार दिवसांची मुदत मागितली होती. परंतु, न्यायालयाने ती फेटाळली. बनावट दस्तावेजाच्या आधारे अल्प उत्पन्न गटातून शासकीय कोट्यातील सदनिकेचा लाभ घेत शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी येथील कनिष्ठ न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये मंत्री कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना दोन वर्षांचा कारावास आणि प्रत्येकी ५० हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली होती. अपिलात सत्र न्यायालयाने त्यांची शिक्षा कायम ठेवल्याने त्यांची आमदारकी व मंत्रीपद धोक्यात आले आहे. बुधवारी कोकाटे यांच्यावतीने ॲड. मनोज पिंगळे यांनी कोकाटे यांना वैद्यकीय कारणास्तव शरण येण्यास चार दिवसांचा अवधी *(पान ४ वर)*

### शहांच्या भेटीला मुंडे

माणिकराव कोकाटे यांची आमदारकी रद्द झाल्यानंतर रिक्त झालेल्या मंत्रीपदावर वर्णी लागावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी दिल्ली दरबारी साकडे घातले आहे. त्यासाठी मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली असून, राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत तर्कवितर्क केला जात आहेत. पान ५

### उच्च न्यायालयात धाव

या निकालाने लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार कोकाटे यांची आमदारकी रद्दबातल ठरणार आहे. तसेच, विधिमंडळ सचिवांनी याबाबतची अधिसूचना काढल्यानंतर कोकाटे यांना मंत्रीपद आणि आमदारकी दोन्ही गमवावी लागणार आहे. त्यामुळे, कोकाटे यांच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घ्यावी, अशी विनंती उच्च न्यायालयात वकील अनिकेत निकम यांनी न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या एकलपीठाकडे केली. तर, प्रकरणाच्या मूळ तक्रारीशी संबंधित सामाजिक कार्यकर्ते शरद पाटील यांनी वकील अनुकूल सेठ यांच्यामार्फत हस्तक्षेप याचिका करून कोकाटे यांच्या मागणीला विरोध केला.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# कोकाटेंच्या अटकेचे आदेश

*(पान १ वरून)* देण्याची विनंती करण्यात केली होती. उच्च न्यायालयात आम्ही अपील दाखल करीत असल्याचे अ‍ॅड. पिंगळे यांनी नमूद केले.  कोकाटे यांचा अर्ज न्यायालयाने फेटाळला. आणि अटक वॉरंट जारी केल्याचे सरकारी वकील डॉ. सुधीर कोतवाल यांनी लोकसत्ताला सांगितले.

मंत्री कोकाटे हे मुंबईतील रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात मूळ तक्रार माजीमंत्री दिवंगत तुकाराम दिघोळे यांनी केली होती. न्यायालयाने अटक वॉरंट जारी केल्यानंतर  दिघोळे यांची कन्या अ‍ॅड. अंजली दिघोळे-राठोड आणि अ‍ॅड. आशुतोष राठोड यांनी माध्यमांशी संवाद साधला. कोकाटे हे कॅबिनेट मंत्री असून न्यायालयाने काही अवधी द्यावा, अशी विनंती त्यांच्या वकिलांनी केली होती. परंतु, न्यायालयाने कायद्यापुढे सर्व लोक समान असल्याचे नमूद केल्याचे अ‍ॅड. राठोड यांनी सांगितले.

लोकसत्ता

# नायलॉन मांजा वापरामुळे धोका

## विक्री, वापरकर्त्यांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक** : नायलॉन मांजामुळे रस्त्याने जाणाऱ्या अनेकांना गंभीर दुखापत होत आहे. तसेच पक्षी, प्राणीदेखील गंभीर जखमी होत असून काहींना आपला जीव देखील गमवावा लागला आहे. जिल्ह्यात येवला, सिन्नर, लासलगाव, बागलाण येथे नुकत्याच गंभीर स्वरूपाच्या घटना घडल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी जिल्ह्यात नायलॉन मांजा विक्री आणि वापर करणाऱ्यांवर मकोकाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी राष्ट्रवादीचे (अजित पवार) माजी खासदार समीर भुजबळ यांनी केली आहे. भुजबळ यांनी नायलॉन मांजाबाबत नाशिकचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना दिलेल्या पत्रात भूमिका मांडली आहे. सध्या नाशिक जिल्ह्यात नायलॉन मांजा (चायनीज/सिंथेटिक मांजा) यांच्या बेकायदेशीर विक्री व वापरामुळे गंभीर व अत्यंत दुर्दैवी घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. नायलॉन मांजामुळे रस्त्याने जाणाऱ्या दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले, महिला तसेच पक्षी व प्राणी यांना गंभीर दुखापती होत असून, काही ठिकाणी नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. नायलॉन मांजा हा अत्यंत धारदार, न तुटणारा व मानवी जीवनासाठी प्राणघातक असल्याने त्याच्या वापरावर व विक्रीवर शासनाने यापूर्वीच बंदी घातली आहे. मात्र, प्रत्यक्षात काही बेजबाबदार व लोभी विक्रेते तसेच साठेबाज हे शासनाच्या आदेशांना धाब्यावर बसवून गुपचूपपणे नायलॉन मांजाची विक्री करीत आहेत. परिणामी, कायद्याची भीती न बाळगता हा जीवघेणा प्रकार सुरूच असून, नागरिकांचे प्राण धोक्यात येत आहेत. नाशिक जिल्ह्यात घडलेल्या विविध अपघातांच्या घटनांचा अभ्यास करता, ही केवळ निष्काळजीपणाची बाब नसून संगनमताने चालविलेला बेकायदेशीर व्यवसाय असल्याचे स्पष्ट होते. अशा विक्रेत्यांमुळे केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत नाही, तर थेट मानवी जीविताला धोका पोहोचत असल्याचे समीर भुजबळ यांनी नमूद केले आहे.



### पाच गंभीर जखमी

नाशिक जिल्ह्यात येवला, सिन्नर, लासलगाव, बागलाण येथे १५ ते २० दिवसांत नायलॉन मांजामुळे पाच जण गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा घटना संक्रांत जवळ आल्यामुळे वाढण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) हा कायदा समाजासाठी गंभीर धोका निर्माण करणाऱ्या संघटित गुन्हेगारीविरोधात लागू करण्यात आला आहे. नायलॉन मांजाची बेकायदेशीर विक्री, साठवणूक व वितरण हे संघटित स्वरूपात चालत असल्याचे अनेक ठिकाणी आढळून आले आहे. त्यामुळे अशा विक्रेत्यांवर, पुरवठादारांवर व त्यांना संरक्षण देणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करणे आवश्यक आहे.

नाशिक जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून नायलॉन मांजाची विक्री करणारी सर्व दुकाने, गोदामे व साठवणूक केंद्रांवर छापे टाकण्यात यावेत. जप्त केलेला नायलॉन मांजा तात्काळ नष्ट करण्यात यावा. भविष्यात अशा प्रकारची विक्री पुन्हा होऊ नये, यासाठी सतत गस्त, गुप्त माहितीच्या आधारे कारवाई व नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. तसेच निष्पाप नागरिकांचे प्राण वाचविणे ही प्रशासनाची व पोलिसांची सर्वोच्च जबाबदारी आहे. नायलॉन मांजामुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी आणि दोषींना कायमचा धडा शिकविण्यासाठी कठोरात कठोर कारवाई करणे गरजेचे असल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे.

## कांदा दरात तेजी राहण्याची उत्पादकांची आशा

# बांगलादेशाने वाढवली आयात परवान्यांची मर्यादा

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

बांगलादेशाने कांदा आयात परवान्यांची संख्या आता दिवसाकाठी ५० हून २०० पर्यंत वाढविल्याने बाजारात पुढील काही महिने कांद्याचे दर टिकून राहण्याची आशा कांदा उत्पादकांमध्ये निर्माण झाली आहे.

बांगलादेशाने दीर्घकाळानंतर भारतातून कांदा आयातीची बंदी उठविताना सुरुवातीस ५० आयात परवाने दिले होते. नंतर ही मर्यादा २०० परवान्यांवर आणण्यात आली आहे. यामुळे भारतातून बांगलादेशात पाठविण्यात येणाऱ्या कांद्याच्या निर्यातीला वेग मिळण्याची आशा आहे. कांद्याची वाढती मागणी व बाजारातील तूट लक्षात घेता भारतीय कांद्याला मोठी बाजारपेठ खुली झाली आहे. यंदा खरिपातील कांद्याला जास्त पावसाचा फटका बसला असून, लेट खरिपात कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली. विशेषतः नाशिक व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये कांदा लागवडीचे प्रमाण जास्त आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, यंदा राज्यात २ लाख ६५ हजार हेक्टर क्षेत्रावर लेट खरिपाची लागवड झाली. यात नाशिक जिल्ह्यात ७० हजार हेक्टर, तर अहिल्यानगरमध्ये सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड करण्यात आली.

### सर्वाधिक निर्यात बांगलादेशात

भारताच्या एकूण कांदा निर्यातीपैकी ४० टक्क्यांहून अधिक हिस्सा बांगलादेशचा आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतातून बांगलादेशला सुमारे पावणेपाच लाख मेट्रिक टन कांद्याची निर्यात करण्यात आली होती. बाजारात स्थिरता येईपर्यंत व पुढील आदेश येईपर्यंत ही आयात प्रक्रिया सुरू राहणार असल्याचे बांगलादेशने म्हटले आहे.

# उपजिल्हा रुग्णालय स्थलांतरास विरोध?

म. टा. वृत्तसेवा, त्र्यंबकेश्वर

त्र्यंबकेश्वर येथील उपजिल्हा रूग्णालयाची इमारत पाडण्यात येणार असल्याचे आणि रुग्णालय पाच किमी अंतरावरच्या तळवाडे रस्त्यावर स्थलांतरीत होत असल्याच्या वृत्ताने शहर आणि ग्रामीण भागात खळबळ उडाली आहे.

सर्वसामान्यांना आरोग्य सुविधांसाठी आधार असलेले उपजिल्हा रुग्णालय स्थलांतरीत केल्यास विविध प्रकारच्या अडचणी निर्माण होतील. वैद्यकीय उपचार तपासणी यासाठी पाच किमी अंतरावर वेळेत पोहचणे शक्य होणार नाही. उपजिल्हा रुग्णालय केवळ उपचारांसाठीच असते असे नाही, तर विविध प्रकाराचे दाखले, शिबिर, लसीकरण, कुपोषित बालकांसाठी, गर्भवती महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीदेखील उपजिल्हा रुग्णालयात उपक्रम राबवले जातात. या सर्वांना पाच किमी अंतरावर असलेल्या तळवाडे येथे जाण्याची वेळ येणार आहे. शासनाला कॉरिडॉर करायचा असल्यास रुग्णालयाची इमारत व आवार कायम ठेवून बाजूने कॉरिडॉर अथवा दर्शनपथ करावा, अशी मागणी शहरातील आणि ग्रामीण भागातील जनतेतून होत आहे. याबाबत संघटनेने नाशिक जिल्हाधिकारी यांना पत्र दिले आहे. रुग्णालयाचे स्थलांतर करण्यात येऊ नये, म्हणून त्र्यंबकेश्वर आणि परिसरातील सुमारे २५०० नागरिकांची स्वाक्षरी असलेले पत्र ई मेलवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आले होते.

## उपचारांसाठी जावे लागणार पाच किमी

### कॉरिडॉरसाठी रुग्णांचे हाल

सिंहस्थ कुंभमेळ्याचे निमित्त करून १०५ मीटर लांबीचा दर्शनपथ नावाचा कॉरिडॉर तयार करण्यासाठी शासनाने निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. वास्तविक पाहता दर्शनासाठी निर्माण करण्यात येत असलेला दर्शनपथ कुचकामी ठरणार आहे. त्र्यंबकेश्वर मंदिरात एका दिवसात उपलब्ध वेळेत जास्तीत जास्त १६ हजार भाविक दर्शन घेऊ शकतात. सिंहस्थात लाखभर भाविक येणार असतील तर त्यांना सर्वांना दर्शन देणे शक्य होणार नाही. त्यासाठी दर्शनपथ उभारणे हा उपाय नाही. सद्यःस्थितीला असलेली दर्शनबारी पुरेशी आहे. मात्र, केवळ खर्च करण्यासाठी सर्व खटाटोप होत असल्याचे मत येथील जाणकार नागरिकांनी व्यक्त केले आहे. देवाच्या दर्शनाच्या नावाने गरजू रुग्णांना वाऱ्यावर सोडण्याचा हा प्रकार असल्याचे बोलले जात आहे.

# विकासकामांची लगीनघाई!

## गोदाकाठी तोडफोडीने जागोजागी डेब्रिस

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

पंकज चांडोले



रामकुंडालगतच्या पार्किंगच्या भागात करण्यात आलेले खोदकाम.



वस्त्रांतरगृहालगत पडलेला डेब्रिसचा ढिगारा.

नाशिकमध्ये सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या वतीने गोदाकाठच्या सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. एरवी पर्यटकांचा मुक्त वावर असणाऱ्या ठिकाणी आता विकासकामांमुळे आवश्यक असणारी तोडफोड अन् दुरुस्ती कामांमुळे डेब्रिसचे ढिगारे यामुळे रामकुंड परिसरातून विविध धार्मिक कामांसाठी येणाऱ्या भाविक-पर्यटकांना वाट काढताना 'नाकी नऊ' येत आहेत.

केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाद्वारे 'स्पेशल असिस्टंट टू स्टेटस् फॉर कॅपिटल इन्व्हेस्टमेंट' या योजनेंतर्गत ९९ कोटी १४ लाख रुपये खर्चातून रामकुंडासह परिसराचे रुपडे पालटले जाणार आहे. यासाठी दुरुस्तीकामांच्या प्रस्तावित साइट्सभोवताली हिरवी जाळी लावून तो भाग कामांसाठी आरक्षित करण्यात आला आहे. याशिवाय या साइट्सभोवताली बॅरिकेडिंग करून त्या-त्या परिसराचा प्रशासनाने ताबा घेऊन कामाला सुरुवात केली आहे. कपालेश्वर मंदिर परिसरातील चौक प्रशासनाला रामकाल पथ योजनेंतर्गत प्रशस्त करायचा असल्याने त्यादृष्टीने आराखड्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. कपालेश्वर मंदिरानजीकच्या परिसरासही हिरवी जाळी लावून स्ट्रक्चर उभारण्यात आले आहे. श्री बालाजी मंदिरासमोरील उंच पाणपोईदेखील एक ते दोन दिवसांत जमीनदोस्त केली जाणार आहे.

मटा वेध सिंहस्थाचे

शेजारील वस्त्रांतरगृहाच्या पाडकामाच्या डेब्रिसचा ढिगारा अद्याप 'जैसे थे'च आहे. हा ढिगारा हटविण्याचेही काम सुरू आहे. याशिवाय श्री नीळकंठेश्वर मंदिरातही पुरातत्त्व विभागाच्या निदर्शनाखाली दुरुस्ती सुरू आहे. साईबाबा मंदिरामागील धर्मशाळाही जमीनदोस्त करण्यात येऊन तेथेही काम सुरू आहे. या जागेसमोरील दशक्रिया विधीच्या जागेसही हिरव्या जाळीचे बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. याशिवाय ऐतिहासिक नारोशंकर मंदिराभोवतालीही विकासकामांनी वेग घेतला आहे.

### भाविक-पर्यटकांची कोंडी

गोदाघाट परिसरातील विकासकामांची लगीनघाई, डेब्रिसचे ढिगारे, स्थानिक, तसेच भिक्षेकऱ्यांच्या गर्दीमुळे भाविक-पर्यटकांची कोंडी होत आहे. एकीकडे ही विकासकामे सुरू असताना दुसरीकडे भोवताली असणारे भिक्षेकरी अन् आश्रितांसह फेरीवाल्यांच्या गराड्यामुळे परिसराला बकाल स्वरूप आले आहे. येथील विकासकामांभोवतीच गोदाकाठी आश्रय घेणारे भिक्षेकरी, निराधारांचा गराडा दिसतो. त्यामुळे कामादरम्यान कुणालाही इजा अथवा हानी झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल न उपस्थित होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या मानसिक सुरक्षेचे काय?

## समुपदेशक नेमणूक निर्णय १४ वर्षांपासून धूळखात

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

विद्यार्थ्यांवरील तणाव कमी करण्यासाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये समुपदेशक नेमण्याची घोषणा तत्कालीन शालेय शिक्षण राज्यमंत्री फौजिया खान यांनी विधान परिषदेत २०१२ मध्ये केली होती. मात्र, हा निर्णय १४ वर्षांपासून कागदावर राहिला. सरकारने विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षेबाबत घेतलेल्या निर्णयात कोठेही मानसिक त्रासाचा उल्लेख नसल्याने समुपदेशक व मानसशास्त्र तज्ज्ञांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक त्रासाला समजून घेण्यासाठीही प्रत्येक शाळेत समुपदेशकाच्या नेमणुकीची अंमलबजावणी आतापर्यंत न झाल्याने फक्त नवनवीन निर्णयांनी अंमलबजावणी ठोस होईल का, असा सवाल विचारला जात आहे.



> विद्यार्थ्यांच्या मनोविकास ज्ञानमार्गाचा आपल्या शिक्षणव्यवस्थेत विचार केला गेलेला नाही. त्यामुळे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट काय असावं आणि ते कसं दिलं जावं हे निश्चित होऊ शकलेले नाही. यामुळे अनेक चांगले निर्णय होतात; मात्र त्यांची अंमलबजावणी होत नाही.
>
> – शंतनू गुणे, समुपदेशक



> विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुरक्षेसह त्यांचे मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. शाळांमध्ये समुपदेशक असायला हवा आणि समुपदेशकाची नेमकी गरज हे शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना समजून सांगायला हवे. विद्यार्थ्यांचे मानसिक भावविश्व समजून घेत शिक्षण प्रयास झाला तर मानसिकदृष्ट्या कणखर व संवेदनशील पिढी घडविणे शक्य आहे.
>
> – डॉ. उमेश नागापूरकर, मानसोपचार तज्ज्ञ

शाळांमधील सुविधांसाठी ९ जून २००७ रोजी या समितीची स्थापना केली होती. या समितीने दिलेल्या उपायांची अंमलबजावणीत करू न शकल्याची कबुलीच तत्कालीन शालेय शिक्षण राज्यमंत्री फौजिया खान यांनी १४ वर्षांपूर्वी विधान परिषदेत दिली होती. यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील सर्व शाळांमध्ये समुपदेशक नेमण्याबाबतची चर्चा उपस्थित केली होती. यावर उत्तर देताना फौजिया खान यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी सर्व शाळांमध्ये समुपदेशक नेमण्याबाबतही लवकरच निर्णय घेतला जाईल, असे म्हटले होते. याबाबत राज्यातील सर्व शाळांमध्ये समुपदेशक नेमण्याचा निर्णयही झाला. मात्र, याचीही अंमलबजावणी कधीच होऊ शकली नाही.

### अंमलबजावणी कशी?

राज्याने विद्यार्थी सुरक्षेसाठी नव्याने जाहीर केलेल्या उपाययोजनेची अंमलबजावणी नेमकी कशी करणार तसेच याची अंमलबजावणीसाठी नेमके नियोजन काय याबाबत कधीच चर्चा होत नाही. विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुरक्षाकवच देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. डॉक्टर, वकिल, समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांसह पालकांचा या समितीत सहभाग घेऊन निर्णयाची अंमलबजावणी नेमकी कशी होणार, त्याचा पाठपुरावा कसा करणार यावर विचार व्हावा, अशी मागणी शिक्षण तज्ज्ञांनी केली आहे.

# प्रजासत्ताक दिनी एकत्रित कवायती

## शिक्षण संचालनालयामार्फत शाळांना सूचना

चित्र : एआय



**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

प्रजासत्ताक दिनाला आपापल्या शाळेत झेंडा वंदन तसेच एनसीसी व स्काउट-गाइड यांच्यामार्फत संचलन केले जाते. परंतु, येणाऱ्या प्रजासत्ताक दिनापासून शाळांनी एकत्र येऊन एकाच ठिकाणी शारीरिक कवायती करण्याचा आदेश शिक्षण संचालनालयाने जाहीर केला आहे. यासाठी एक खास व्हिडीओही शिक्षण संचालनालयाने तयार केला असून, त्यानुसार या कवायती कराव्या लागणार आहेत.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, आरोग्य आणि व्यायामाबाबत जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम आयोजित केल्याचे संचालनालयाने आपल्या आदेशात नमूद केले आहे. यासाठी १४.४० मिनिटांचा एक देशभक्तिपर गीतांचा व्हिडीओ तयार केला असून, त्यावर विद्यार्थ्यांना या कवायती कराव्या लागणार आहेत. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांना एका मोठ्या मैदानावर एकत्र करून शाळांना हा उपक्रम राबवावा लागणार आहे. तसेच या उपक्रमाच्या तयारीसाठी दर शुक्रवार, शनिवार विद्यार्थ्यांकडून शिक्षकांना सरावही करून घ्यावा लागणार आहे. गट शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, शिक्षण उपनिरीक्षक, केंद्र प्रमुख यांना आपल्या कार्यक्षेत्रातील शाळा, त्यामधील विद्यार्थी, ते कोणत्या मैदानावर एकत्र येणार, त्याची क्षमता, पार्किंगची सोय याची पडताळणी करावी लागणार आहे. तसेच २६ जानेवारीसाठीच्या कवायतीचे नियोजनही करावे लागणार आहे. येत्या २६ जानेवारीपासून दरवर्षी अशाच पद्धतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्याची सूचना शिक्षण संचालनालयाने दिली आहे. अशक्त, आरोग्य समस्या असलेल्या विद्यार्थ्यांवर या उपक्रमाची सक्ती न करण्याबाबतही शिक्षण संचालनालयामार्फत आदेश देण्यात आला आहे.

### 'राष्ट्र प्रथम' व जागतिक विक्रम

संबंधित उपक्रम 'राष्ट्र प्रथम', या संकल्पनेवर आधारित असल्याचे शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. राज्यातील १ लाखांपेक्षा अधिक शाळांमधील ७ लाखांपेक्षा अधिक शिक्षकांच्या उपस्थितीत दोन कोटींपेक्षा अधिक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार असून, याला जागतिक विक्रमाच्या स्वरूपात प्रसिद्धी देण्याची सूचना शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आली आहे.

### शहरात नियोजनाचे आव्हान

शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी एकत्र आणणे आव्हानात्मक असल्याचे काही शिक्षकांचे म्हणणे आह. यामुळे वाहतूक कोंडी तर होईलच, पण विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही उपस्थित होऊ शकतो. शहरात एकाच ठिकाणी हा उपक्रम आयोजित करणे शक्य नसल्याचेही या शिक्षकांनी सांगितले. त्यामुळे याबाबत नेमके कसे नियाजेन केले जाते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

**“ दरवर्षी शाळांमध्ये आपापल्या स्तरावर प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. परंतु, यंदापासून अधिक व्यापक स्वरूपात, सामूदायिक स्तरावर हा उपक्रम राबविला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम जागत करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.**

**- महेश पालकर**, शिक्षण संचालक (माधमिक)

# सिंहस्थास बदनाम करण्याचा डाव हाणून पाडू

## राष्ट्रीय संत संमेलनात महंतांचा इशारा

म. टा. वृत्तसेवा, पंचवटी




पंकज चांडोले

२०२७ ला नाशिक त्र्यंबकेश्वरचा सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. हा कुंभमेळा सर्व मिळून यशस्वी करायचा आहे. साधू-संत आणि सिंहस्थ कुंभमेळा उत्सवाला बदनाम करण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील काही शक्ती कार्यरत झाल्या आहेत, त्यांचा हा डाव हाणून पाडू, असा इशारा प्रमुख महंतांनी पत्रकार परिषदेत दिला.

नाशिकला सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त दोन दिवसीय राष्ट्रीय संत संमेलन झाले. त्याचा समारोप झाला. यात देशभरातील आखाड्यांचे प्रमुख सहभागी झाले होते. संमेलनानंतर समितीचे पदाधिकारी संतांनी पत्रकार परिषदेत संवाद साधला.

अखिल भारतीय संत समितीचे अध्यक्ष जगद्गुरू श्री अविचल देवाचार्य महाराज व राष्ट्रीय महामंत्री जितेंद्रानंद सरस्वती यांनी महाराष्ट्रात अनेक धार्मिक ट्रस्ट व संस्थांवर न्यायाधीशांची असलेली नियुक्ती आम्हाला मान्य नसल्याचे सांगत सरकारने यात हस्तक्षेप करावा. महाराष्ट्र ही संतांची भूमी अन् हिंदुत्वाची प्रयोगशाळा असताना असे निर्णय हाणून पाडले पाहिजे, अशी भूमिका मांडली. तसेच धर्मांतर रोखण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, सरकारनेदेखील या प्रश्नावर कडक कायदा करावा, अशी मागणी केली.

महामंत्री जितेंद्रानंद सरस्वती यांनी मागच्या काळात अनेक हिंदूविरोधी निर्णय कोर्टाने दिले. देशात २०२७ ला जनगणना होत असून, त्या अगोदरच काही शक्ती समाजात फूट पाडून 'फेक नरेटिव्ह' पसरवित आहे. आपल्या देशातील मुद्दे देशाच्याच मंचावर मांडायला हवेत. मात्र, न्याय संस्थेतील महत्त्वाची मंडळी तसेच विरोधी पक्षाचे लोक देशाबाहेर जाऊन बदनामीकारक व्यक्तव्य करीत आहेत.

जितेंद्रानंद सरस्वती यांनी सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्ताने सनातन हिंदू धर्माचे रक्षण, राष्ट्रीय एकात्मता अन् राष्ट्रहिताच्या कार्याची व्याप्ती वाढविणे ध्येय असल्याचे सांगितले.

### एप्रिलमध्ये होणार संत संमेलन

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी म्हणून एप्रिल महिन्यात पुन्हा साधू-संतांचे राष्ट्रीय संमेलन होईल. यात देशभरातील सर्व शंकराचार्य उपस्थित राहणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# ‘चेनस्नॅचर्स’ निर्ढावले...

## सोसायटीत जबरी चोरीचा धक्कादायक पॅटर्न; पोलिस यंत्रणेस आव्हान

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

**शहरातील गंभीर गुन्ह्यांना ‘वेसण’ घालणाऱ्या पोलिसांना जबरी चोरी करणाऱ्यांनी मात्र थेट आव्हान दिल्याने नाशिककरांमध्येही संताप वाढत आहे. रस्त्यावरून पायी जाणाऱ्यांची सोनसाखळी खेचून पोबारा करणाऱ्या प्रचलित ‘पॅटर्न’ऐवजी आता थेट सोसायट्यांमध्ये शिरून लिफ्टजवळ किंवा घराबाहेर महिलांच्या गळ्यातून सोनसाखळ्या ओरबाडल्या जात आहेत. शहरात एकाच दिवसात चार महिलांच्या गळ्यातून या स्वरूपात सोनसाखळी खेचण्यात आली. हे धक्कादायक प्रकार आता उघड झाले असून, पोलिसांनी एका संशयिताचा माग काढण्यास सुरुवात केली आहे.**





- सोसायट्यांमध्ये सीसीटीव्ही असल्याने संशयिताची हालचाल चित्रीत
- तांत्रिक तपासाद्वारे संशयिताचा माग काढणे सुरू
- रात्री, पहाटे किंवा सायंकाळी एकट्या फिरणाऱ्या महिला ‘लक्ष्य’
- घराबाहेर किंवा जवळच्या परिसरात सोने परिधान करून वावरणाऱ्या महिलांवर संशयितांची नजर
- महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना; जबरी चोरी करणाऱ्यांना अटकाव करण्यासाठी कठोर भूमिकेची गरज

### सप्टेंबरमध्येही दोघांना अटकाव

शेअर बाजारात बरेच पैसे अडकल्याने सुशिक्षित तरुणांनी सोनसाखळी खेचण्याचा पर्याय निवडला होता. १३ सप्टेंबर रोजी रामवाडीतील एका इमारतीत घराची बेल वाजवून पाणी मागण्याचा बहाणा केला. पाणी आणलेल्या महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून दोघेही पसार झाले होते. तेव्हाही या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याबाबत शहरात संताप व्यक्त झाला. नाशिक शहर पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत दोन्ही संशयितांना बेड्या ठोकल्या होत्या.

**प्रकार १ :** अशोका मार्ग परिसरातील शुभ अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या ६२ वर्षीय सुशीला रामदास खाडे या रविवारी (दि. १४) रात्री साडेआठ ते पावणेनऊ या वेळेत इमारतीत लिफ्टजवळ उभ्या होत्या. त्यावेळी मोपेडवरून एक अनोळखी व्यक्ती तेथे पोहोचला. त्याने मोपेडचा क्रमांक दिसू नये म्हणून ‘पार्किंग इंडिकेटर’ सुरू ठेवले. त्यानंतर खाडेंकडे जात काहीतरी विचारण्याच्या बहाण्याने थेट त्यांच्या गळ्याला हात लावत ६४ हजार रुपयांची सोनसाखळी खेचली. त्यावेळी खाडे मोठ्याने ओरडू लागताच त्याने पळ काढला. सीसीटीव्हीत ही घटना चित्रीत झाली असून, हा व्हिडीओ शहरात व्हायरल होत आहे.

**प्रकार २ :** खाडे यांची सोनसाखळी खेचल्यानंतर पुढे गेल्यावर त्याच परिसरातील कल्पतरू अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या प्रिशा उदय वासवाणी यांच्या गळ्यातील ५६ हजार रुपयांची सोनसाखळी संशयिताने खेचली. दरम्यान, खाडे आणि वासवाणी यांच्या एकत्रित फिर्यादीवरून मुंबई नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

प्रकार ३ : इंदिरानगर पोलिसांच्या हद्दीत रविवारी (दि. १४) सायंकाळी शुभांगी संतोष कासार (वय ४२) आणि राजश्री प्रशांत कुलकर्णी (अथर्व रेसिडेन्सी, प्रशांतनगर) यांच्या गळ्यातील अनुक्रमे ३८ हजार व तीस हजार रुपयांचे मंगळसूत्र खेचले. ही जबरी चोरीदेखील मोपेडवरून आलेल्या व्यक्तीनेच केली असून, इंदिरानगर पोलिसांत दोघींच्या एकत्रित फिर्यादीवरून गुन्हा नोंद झाला आहे.

# गरज भासल्यास पोलिसबळ वापरा

## 'सर्वांसाठी घरे'साठी जिल्हाधिकाऱ्यांची सूचना

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

'सर्वांसाठी घरे' या योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ज्या घरांचे लक्ष्य मंजूर झालेले नाही, अशा सर्व घरांची माहिती घेऊन त्यांचे वर्गीकरण करावे. आवश्यकता भासल्यास पोलिस बंदोबस्तात कार्यवाही करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी यंत्रणेला केली आहे.

जमीन अनुदानासाठी परिपूर्ण प्रस्ताव आठवडाभरात सादर करावा, जमिनीसाठी आदेश पारित झाल्यानंतरही सातबारा किंवा ८ (अ) आणि ताबा मिळाला नाही, तर मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, तहसीलदार यांच्यासमवेत बैठक आयोजित करावी. प्रसंगी पोलिसबळ वापरून त्यानंतर विस्तार अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्यासमवेत ताबा घेऊन आराखडा तयार करावा. जिल्ह्यात 'सर्वांसाठी घरे' या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करा, त्यासाठी कालबद्ध नियोजन करा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले. जिल्हाधिकारी प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेत बुधवारी दुपारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.




### कालबद्ध नियोजनाची ग्वाही

'सर्वांसाठी घरे' या मोहिमेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्य घरांच्या बांधकामासाठी गावातील वाळूचे घाट निश्चित करावेत. बांधकाम करण्यात येणाऱ्या घरांपेक्षा अतिरिक्त वाळू उपलब्ध असेल, तर ती शेजारील गावातील घरांच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी वाळू उत्खनन व वाहतुकीचे नियोजन करावे, याबाबतही जिल्हाधिकारी प्रसाद यांनी सविस्तर सूचना केल्या. सीईओ पवार यांनी 'सर्वांसाठी घरे' या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत झालेल्या कामाची माहिती दिली. घरांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कालबद्ध नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

# माणिकराव कोकाटेंची उच्च न्यायालयात धाव

## शिक्षेच्या निर्णयाविरोधातील अपिलावर उद्या होणार सुनावणी

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई/नाशिक



बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री कोट्यातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) सदनिका मिळवल्याबद्दल दोषी ठरून दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा झालेले क्रीडामंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते (अजित पवार गट) माणिकराव कोकाटे यांचे मंत्रिपद व आमदारकी धोक्यात आल्यानंतर त्यांनी बुधवारी तातडीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. शिक्षा कायम करण्याच्या नाशिक सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधातील आपल्या अपिलावर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती त्यांच्या वतीने करण्यात आल्यानंतर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. एन. लड्ढा यांनी उद्या, शुक्रवारी प्राथमिक सुनावणी घेण्याचे निश्चित केले.

सदनिका मिळवण्यासाठी कोकाटे यांनी वार्षिक ३० हजार रुपयांचे वार्षिक उत्पन्न असल्याचा दाखला सादर केला होता. त्याआधारेच त्यांना मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका मिळाली होती. मात्र, 'आमच्याकडे ४० ते ४५ मजूर काम करीत आहेत. त्यांना आठवड्याला नऊ हजार रुपये वेतन द्यावे लागते', असे कोकाटेंनी बंदूक परवान्यासाठी केलेल्या अर्जासोबतच्या प्रतिज्ञापत्रात म्हटल्याचे सरकारी पक्षाने दाखवल्यानंतर कोकाटे हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल नसल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील न्यायदंडाधिकारी न्यायालयाने २० फेब्रुवारीला कोकाटे व त्यांचे बंधू सुनील यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली. त्याविरोधात त्यांनी सत्र न्यायालयात अपिल केल्यानंतर त्या न्यायालयाने ५ मार्च रोजी शिक्षा स्थगित केली होती. अखेरीस सत्र न्यायालयाने अपिलावर मंगळवारी अंतिम निर्णय देताना शिक्षा कायम ठेवली. परिणामी माणिकराव कोकाटे यांची आमदारकी व मंत्रीपदही धोक्यात आले. या पार्श्वभूमीवर, त्यांनी बुधवारी तातडीने ॲड. अनिकेत निकम यांच्यामार्फत उच्च न्यायालयात पुनर्विलोकन अर्ज दाखल केला.

'अर्जदार (माणिकराव) हे मंत्री असून सत्र न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांचे मंत्रिपद धोक्यात आले आहे. त्यामुळे तातडीने सुनावणी घेऊन अंतरिम संरक्षणाचा आदेश द्यावा', अशी विनंती निकम यांनी न्यायमूर्तींना केली. तर 'या सुनावणीत आम्हाला हस्तक्षेप करायचा असून गुणवत्तेवर सुनावणी होऊनच योग्य तो आदेश व्हायला हवा', असे म्हणणे मूळ तक्रारदार शरद शिंदे पाटील यांच्यातर्फे ॲड. इरा दुबेपाटील व ॲड. आशिष गभाले यांनी मांडले. त्यानंतर न्यायमूर्तींनी याप्रश्नी शुक्रवारी सुनावणी ठेवली.

दरम्यान, शिक्षा कायम केल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. एम. बदर यांनी बुधवारी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात वॉरंट जारी केले आणि पुढील कारवाई करण्याचे निर्देश न्यायदंडाधिकारी न्यायालयाला दिले. दुसरीकडे उच्च न्यायालयाकडून त्यांना कोणतेही अंतरिम संरक्षण मिळालेले नाही. त्यामुळे कोकाटे यांच्याविरोधात अटकेची टांगती तलवारही आहे.

### घटनाक्रम

- मुख्यमंत्री कोट्यातील सदनिकेसाठी ११ सप्टेंबर १९८९ रोजी बनावट कागदपत्रांसह अर्ज
- फसवणुकीच्या आरोपाखाली १२ डिसेंबर १९९५ रोजी एफआयआर
- न्यायदंडाधिकारी न्यायालयाकडून जवळपास तीन दशकांनंतर (२० फेब्रुवारी २०२५) कोकाटे बंधूंना शिक्षा
- सत्र न्यायालयाकडून १६ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षेचा निर्णय कायम
- माणिकराव कोकाटेंची १७ डिसेंबर २०२५ रोजी उच्च न्यायालयात धाव

### मंत्री कोकाटेंचा युक्तिवाद असा...

'मी सदनिकेसाठी ११ सप्टेंबर १९८९ रोजी अर्ज केला होता आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्या तारखेप्रमाणे माझी आर्थिक पात्रता निश्चित केली होती. प्रत्यक्षात सदनिकेचे वितरण ५ ऑक्टोबर १९९४ रोजी झाले. त्यावेळी प्रशासनाने माझ्या मिळकतीचे कोणतेही कागदपत्र मागितले नव्हते. त्यामुळे मी खोटी कागदपत्रे दिली, असा निष्कर्ष काढणे चुकीचे व विसंगत आहे. अर्ज केल्याची तारीख आणि वितरण झाल्याची तारीख यामध्ये दीर्घ कालावधी असला तरी संबंधित अर्जदार हा त्याच उत्पन्न गटात असायला हवा, असा उद्देश राज्याच्या कल्याणकारी योजनेचा असू शकत नाही. अन्यथा अनेक पात्र व्यक्ती गृहयोजनेपासून वंचित राहतील. न्यायदंडाधिकारी न्यायालय व सत्र न्यायालयानेही या परिस्थितीचा चुकीचा अन्वयार्थ लावून निर्णय दिले आहेत आणि मला चुकीच्या पद्धतीने दोषी ठरवले आहे', असा युक्तिवाद मंत्री कोकाटे यांनी पुनर्विलोकन अर्जात मांडला आहे. तसेच दोन्ही न्यायालयांचे निर्णय बेकायदा ठरवून आपली शिक्षा रद्द करण्याची विनंती उच्च न्यायालयाला केली आहे.

# पाच भरारी पथकांचा गैरप्रकारांवर 'वॉच'

## मनपा आयुक्तांच्या उपस्थितीत आज बैठक




**मतसंग्राम**

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक**

महापालिका निवडणुकांची घोषणा होताच, प्रशासन 'ॲक्शन मोड'वर आले असून, शहरातील राजकीय पक्षांचे बॅनर्स आणि पोस्टर हटविण्याच्या कारवाईला वेग दिला आहे. निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली जाईल. यासंदर्भात महापालिका आयुक्तांच्या दालनात पोलिस, उत्पादन शुल्क व प्राप्तिकर विभागातील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आज, गुरुवारी (दि.१८) बोलावली असून, पाच भरारी पथकांची स्थापना केली जाणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी प्रशासकीय पातळीवरही जय्यत तयारी सुरू झाली आहे. प्रभागरचना, आरक्षण निश्चिती आणि प्रभागनिहाय मतदारयाद्या जाहीर केल्यानंतर निवडणुकीच्या तारखांची घोषणा झाली. आता आदर्श आचारसंहितेची अंलबजावणी केली जाईल. यासाठी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यासाठी महापलिका आयुक्त मनीषा खत्री यांनी गुरुवारी पोलिस, उत्पादन शुल्क, प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावली आहे. या बैठकीत भरारी पथकांची नियुक्ती, आचारसंहितेच्या अंमलबजावणीत घ्यायची काळजी आदी विषयांवर चर्चा केली जाईल. या पथकांकडून उमेदवार, राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या सर्व जाहीर सभा, रॅली यांच्यावर लक्ष ठेवले जाईल.

### ...या पथकांची स्थापना

या बैठकीत पाच भरारी पथकांची निर्मिती केली जाणार आहे. त्यात भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हीएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हीव्हीटी), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी) आदी पथकांची नियुक्ती केली जाईल. या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही करणे आदी कामे केली जातील.

# टेलिकॉम सेवेसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

## कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून आढावा

टेलिकॉम सेवा पुरवठादारांना, ऑप्टिकल फायबर चोरी, मोबाइल टॉवरमधील इलेक्ट्रॉनिक्स वस्तू चोरी, फायबर तोडल्या जाणे याबाबत पोलिस विभागाकडून योग्य त्या पातळीवरील सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली. पोलिस विभागाकडून प्रकरणात टेलिकॉम सेवा पुरवठादारांच्या अडीअडचणीबाबत स्वतंत्र नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली जाईल, असे आश्वासन कुंभमेळा आयुक्तांकडे आयोजित बैठकीत पोलिस अधिकाऱ्यांनी दिले.

सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर प्राधिकरणाने बुधवारी (दि.१७) नाशिक जिल्हा व शेजारील जिल्ह्यांमधील टेलिकॉम सेवा पुरवठादारांसमवेत बैठकीचे घेतली. यात टेलिकॉम सेवा पुरवठादारांनी पायाभूत सुविधा निर्माण करताना ज्या शासकीय यंत्रणांचा सहभाग आहे, त्याठिकाणी पायाभूत सुविधा द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. त्याअनुषंगाने संबंधित विभागांकडील अद्ययावत डिजिटल नकाशांची पूर्तता केली जाईल, असे प्राधिकरणाने




आश्वासित केले. साधुग्राम, घाट परिसर, पार्किंग, रिंगरोड, महापालिका, सार्वजनिक बांधकाम, शासकीय मुख्य इमारती यांची माहितीही टेलिकॉम सेवा पुरवठादारांना दिली जाईल, त्याबाबत एकाच पातळीवर पुढील कारवाई केली जाईल, असे आश्वासन प्राधिकरणाने दिले. टेलिकॉम सेवांच्या सेवा वृद्धिंगत करताना आवश्यक विद्युत पुरवठ्यासंदर्भात आवश्यक सेवांमध्ये वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून सहकार्य केले जाईल, असे प्रतिनिधींनी टेलिकॉम सेवा पुरवठादारांना सांगितले. आवश्यक त्या यंत्रणांची उपलब्धता होण्यासाठी प्राधिकरण मदत करेल, पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी सर्व संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले.

### सर्व विभागांना सहकार्याचे निर्देश

सिंहस्थातील अमृतपर्व व पर्वणी काळातील गर्दीचे नियोजन, त्याचा मोबाइल नेटवर्क सेवांवर येणारा ताण निरसण करण्यासाठी तात्पुरत्या मोबाइल नेटवर्कची गरज, त्यासाठीच्या लागणाऱ्या परवानग्या, जागा निश्चितीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने आयुक्तांनी सर्व संबंधित विभागांना, टेलिकॉम सेवा पुरवठादार आस्थापनांना मदत करण्याचे निर्देश दिले.

# मालेगावी सज्जता

## निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती; तीन प्रभागांत एक अधिकारी



**म. टा. वृत्तसेवा, मालेगाव**

येथील महानगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आल्याने निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज झाली आहे. यात राजकीय पक्षांबरोबर प्रशासकीय हालचाली गतिमान झाल्या आहेत. या निवडणुकीसाठी आठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य निवडणुक आयोगाने २९ महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून, शहरात त्यासाठी सोमवारपासून (दि. १५) आचारसंहित्ता लागली आहे. निवडणूक पारदर्शीपणे पार पडावी यासाठी आठ अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे सर्व उपविभागीय किंवा तत्सम दर्जाचे अधिकारी असून, सात अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी १, २ व ३ अशा क्रमांकाचे प्रत्येकी तीन सहाय्यक निवडणूक अधिकारी देण्यात आले आहेत. तर, आठव्या अधिकाऱ्याकडे निवडणूक आचारसंहितेच्या अंमलबजावणीचे काम असल्याने त्यांच्या मदतीला एक अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे.

**उमेदवारी अर्ज स्विकारण्यासाठी ७ जागा निश्चित**

येथील मनपात ८४ सदस्यसंख्या असून, त्यासाठी २३ ते ३० डिसेंबर यादरम्यान उमेदवारी अर्ज विक्री व स्वीकारण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर अर्ज विक्री व स्वीकारण्यासाठी मोठी गर्दी होऊन गोंधळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही गर्दी टाळण्यासाठी मनपाने अर्जविक्री व दाखल करण्यासाठी सात जागा निश्चित केल्या असून, त्यात मनपाच्या चार प्रभाग समिती कार्यालयांचा समावेश आहे. त्यामुळे इच्छुकांना अर्ज खरेदी व दाखल करताना कोणतीही अडचण येणार नाही.

**मतसंग्राम**

### एका अधिकाऱ्याला प्रत्येकी तीन प्रभाग

मालेगाव महापालिकेचे एकूण २१ प्रभाग असून, त्यातून ८४ नगरसेवक निवडून द्यावयाचे आहेत. या नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांपैकी सात अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष प्रभागांचे काम देण्यात आले असून, एक अधिकारी आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आला आहे. त्यातही या सात अधिकाऱ्यांकडे प्रत्येकी तीन प्रभाग देण्यात आले असून, त्यांना नेमून दिलेल्या प्रभागातील उमेदवारी अर्ज वाटपापासून स्वीकारणे आदी काम पाहावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयाच्या, पर्यायाने बसण्याच्या जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

### निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी व ठिकाण

- नितीन सदगीर, संदीप ढाकणे, ज्योती भगत पाटील व सचिन महाले : प्रभाग १ प्रभाग अधिकारी - नवीन तहसील कार्यालय - प्रभाग क्र. २, ११, १२
- बाबासाहेब गाढवे, रोहिदास वारुळे, तुषार आहेर व महेश गांगुर्डे - आयएमए हॉल, कॅम्परोड- प्रभाग क्र. १, ९, १०
- दत्तात्रय शेजुळ, कैलास चावडे, शेषराव चौधरी व मोहम्मद इरफान मोहम्मद अश्रफ- प्रभाग समिती २ कार्यालय - ३, ६ व ७.
- बंडू कापसे, सुनील सैंदाणे, नागेश येवले व सचिन माळवाळ, दिलावर हॉल - ४, ५ व ८.
- कैलास कडलग, अनिल चव्हाण, दिनेश सिनारे व श्याम बुरकुल - महापालिका जुनी इमारत - १३, १५, व १७.
- दीपक पाटील, विशाल सोनवणे, श्यामकांत जाधव व संतोष गायकवाड- वाडिया दवाखाना- १४, १६ व १९.
- शिवकुमार आवळकंठे, ज्योती देवरे, प्रमोद दोरसकर व शांताराम चौरे - उर्दू घर -१८,२०,२१.
- महेश शेलार, बाळू धोंडगे - आचार संहिता कक्ष मनपा मुख्यालय.

# जि. प. निवडणूक लांबणार?

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

राज्यातील आरक्षणाचा पेच नसणाऱ्या सुमारे २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका आयोजनासाठी निवडणूक आयोगाची तयारी सुरू आहे. मात्र, उत्तर महाराष्ट्रात नाशिकसह धुळे, नंदुरबार व जळगाव या जिल्ह्यांत जिल्हा परिषदांनी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. या जिल्ह्यांमधील जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे चित्र न्यायालयाच्या पुढील सुनावणीनंतरच स्पष्ट होईल.

नाशिक जिल्हा परिषदेत ७१ टक्के, आदिवासीबहुल नंदुरबार १०० टक्के, धुळे जिल्हा परिषद ७३ टक्के, तर जळगाव जिल्हा परिषदेत ५४ टक्के आरक्षण पडले आहे. महापालिका निवडणुका जाहीर झाल्यानंतर आता ग्रामीण भागास जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीच्या आत राज्यातील केवळ १४ जिल्हा परिषदांचीच निवडणूक होणे सद्यस्थितीत शक्य दिसते आहे. यामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, छत्रपती संभाजीनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जालना, बीड, परभणी, धाराशिव व अहिल्यानगर येथे निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा आहे.

# 'लॉजिस्टिक्स पार्क' अद्याप कागदावरच!

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

नाशिकच्या औद्योगिक, कृषी आणि निर्यात क्षेत्राला चालना देणारा मल्टिमोडल लॉजिस्टिक्स पार्क प्रकल्प अद्याप मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे स्पष्ट होताच, खासदार राजाभाऊ वाजे यांनी लोकसभेत केंद्र सरकारला जाब विचारला. ८५० कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प अद्याप 'अॅप्रिझल स्टेज'वर अडकला असून, प्रत्यक्ष कामकाज कधी सुरू होणार, याबाबत सरकारकडे ठोस उत्तर नसल्याचे समोर आले आहे.

नाशिक हे मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, प्रमुख राष्ट्रीय महामार्ग, देशाला जोडणारे रेल्वे मार्ग, तसेच 'जेएनपीटी' बंदरापासून सुमारे २२० किमी अंतरावर असलेले महत्त्वाचे ठिकाण आहे. शिवाय द्राक्षे, कांदा,

## खासदार राजाभाऊ वाजे यांचा प्रश्न; केंद्राची कबुली



डाळिंब, भाजीपाला अशा कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी नाशिक देशातील आघाडीचा जिल्हा मानला जातो. असे असतानाही या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत होत असलेल्या विलंबाबात खासदार वाजे यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला. नाशिकसारख्या जिल्ह्यासाठी प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाचा रोजगारनिर्मिती, वाहतूक खर्चात कपात आणि स्थानिक उद्योगांवरील परिणाम याबाबत कोणताही स्वतंत्र अभ्यास अद्याप करण्यात आलेला नाही, असेही मंत्रालयाच्या उत्तरातून स्पष्ट झाले. चेन्नई, बेंगळुरू, नागपूर व इंदूर येथील प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच असा अभ्यास केला जाईल, असे सरकारने सांगितले. एकीकडे 'पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन' अंतर्गत लॉजिस्टिक्स सुधारण्याची घोषणा केली जाते, दुसरीकडे नाशिकचा प्रकल्प वर्षानुवर्षे रखडतो, असा जाब त्यांनी विचारला, त्याला वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी उत्तर दिले.

### 'मंजुरीनंतर तीन वर्षे लागणार'

'लॉजिस्टिक्स खर्चात वाढ, काढणीपश्चात होणारे प्रचंड नुकसान आणि शेतकरी संकट लक्षात घेता, लॉजिस्टिक पार्क पूर्ण होईपर्यंत कोणतीही तात्पुरती लॉजिस्टिक्स किंवा 'कोल्ड चेन' व्यवस्था सरकारने का उभी केली नाही?' असे महत्त्वपूर्ण प्रश्न खासदार वाजेंनी उपस्थित केले. नाशिकमध्ये मल्टिमोडल लॉजिस्टिक्स पार्क प्रस्तावित असल्याची कबुली मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. हा प्रकल्प अद्याप मंजूर झालेला नाही. मंजुरीनंतर पहिला टप्पा पूर्ण होण्यासाठी किमान तीन वर्षांचा कालावधी लागणार असल्याचे सरकारने मान्य केले.



# महसूल अधिकाऱ्यांचे उद्यापासून 'काम बंद'

**तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या संपात सहभागी**

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी सोमवार (दि. १५)पासून सुरू केलेल्या बेमुदत संपात आता तहसीलदार, नायब तहसीलदार व उपजिल्हाधिकारी श्रेणीतील अधिकारीही सहभागी होणार आहेत. शुक्रवार (दि. १९)पासून हे अधिकारी बेमुदत काम बंद आंदोलन पुकारणार असून, त्यामुळे महसूल विभागाचे कामकाज ठप्प होण्याची भीती आहे.

जिल्ह्यातील सर्व नायब तहसीलदार, तहसीलदार व उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यासंदर्भात बुधवारी (दि. १७) जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना या निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मात्र, राज्य संघटनेच्या आदेशानुसार आंदोलन करणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. विधिमंडळात विनाचौकशी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या होणाऱ्या निलंबनामुळे महसूल विभागाची प्रतिमा खालावत आहे. महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांना मानसिक तणावाखाली काम करावे लागत आहे. १२ डिसेंबरला विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी पूर्वसूचना न देता, कोणत्याही चौकशी समितीचा अहवाल नसताना, विधिमंडळात कोणी मागणी केलेली नसताना चार तहसीलदार, चार मंडळ अधिकारी व दोन तलाठ्यांना निलंबित करण्याची घोषणा केली. १३ डिसेंबरला पवनी (जि. भंडारा) येथील उपविभागीय अधिकाऱ्यांचे निलंबन व तहसीलदारांवर फौजदारी कारवाई करण्याचे सभागृहात जाहीर करण्यात आले. पालघर जिल्ह्यातील मंडळ अधिकारी व तलाठ्यालाही अन्यायकारक पद्धतीने निलंबित करण्यात आले. हे आदेश तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावेत, अशी मागणी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी निवेदनातून केली आहे.

अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय आवारात एकत्र येऊन आंदोलनाची दिशा निश्चित केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, उपजिल्हाधिकारी शरद घोरपडे, तहसीलदार ज्योती देवरे, महसूल तहसीलदार आबासाहेब तांबे, नाशिक जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तुषार जाधव, जीवन आहेर, अरुण तांबे, तलाठी महासंघाचे निळकंठ उगले आदी उपस्थित होते.

### ..या मागण्यांचाही समावेश

निलंबनाच्या कार्यवाहीबाबत आदर्श कार्यप्रणाली निश्चित करण्यात यावी, सुधारित वेतन श्रेणी लागू करावी, राज्यातील महसूल सेवक संवर्गाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या मंजूर कराव्यात, महसूल विभागाचे सर्व संवर्ग कार्यालयांचे सुधारित आकृतिबंध मंजूर करावेत, पोलिसांच्या धर्तीवर नायब तहसीलदार पदासाठी महसूल खात्याअंतर्गत परीक्षा घेण्यात यावी आदी मागण्याही अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मांडल्या आहेत.

# ‘होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो’चा आज प्रारंभ

## डोंगरे वसतिगृह मैदानावर चार दिवस गृह प्रदर्शन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



नरेडको नाशिकच्या वतीने आयोजित होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो या गृह प्रदर्शनाचे आज, गुरुवारी (दि. १८) सायंकाळी ५.३० वाजता डोंगरे वसतिगृह मैदानावर उद्‌घाटन होणार आहे. पुढील चार दिवस हे प्रदर्शन सुरू राहणार असून, नागरिकांना एकाच छताखाली पाचशेहून अधिक प्रकल्प पाहता येणार आहेत.

दि. १८ ते २१ डिसेंबरदरम्यान सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांना पाहण्यासाठी खुले राहणार आहे. त्याची सर्व तयारी पूर्ण झाली असून, भव्य डोम, स्टॉल्स आणि नामांकित बांधकाम व्यावसायिकांची उपस्थिती अशी प्रदर्शनाची वैशिष्ट्ये आहेत. प्रदर्शन पाहण्यासाठी कोणतीही प्रवेश फी आकारली जाणार नाही. घर खरेदी, प्लॉट गुंतवणूक, व्यावसायिक मालमत्ता तसेच रिअल इस्टेटमधील नव्या कलांची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी मिळणार असल्याचे ‘होमेथॉन’चे मुख्य समन्वयक जयेश ठक्कर यांनी सांगितले.

आजच्या उद्‌घाटन सोहळ्याला सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त मनीषा खत्री, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, नाशिक महानगर विकास प्राधिकरण आयुक्त जलद शर्मा, ‘बीएसएनएल’चे महाप्रबंधक सारंग मांडवीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

प्रदर्शन यशस्वीतेसाठी समन्वयक जयेश ठक्कर, अध्यक्ष सुनील गवादे, सहसमन्वयक उदय शाह, मर्जियान पटेल, अभय नेरकर, अभय तातेड, सचिव शंतनू देशपांडे, खजिनदार भूषण महाजन, भाविक ठक्कर, पुरुषोत्तम देशपांडे, हर्षल धांडे, प्रसन्न सायखेडकर, प्रशांत पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

एक्सपोज | जिल्हा रुग्णालयात औषध खरेदी घोटाळा


# टेंडर क्रमांकांमध्ये अफरातफर; चार कोटींचा नियमबाह्य ठेका

गौरव अहिरे | नाशिक

जिल्हा शासकीय रुग्णालयात नियम पायदळी तुडवून चार कोटी रुपयांची औषध खरेदी झाली आहे. जिल्हा रुग्णालयाच्या वतीने प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसाठी वेगळ्या क्रमांकाच्या निविदा दाखवल्या, तर पुरवठादारास दुसऱ्या निविदा क्रमांकाचा संदर्भ देत औषध पुरवठा करण्याचे आदेश दिले गेल्याचे समोर आले आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत शासकीय रुग्णालयाच्या वतीने ४ कोटी रुपयांची औषध खरेदी प्रक्रिया राबवण्यात आली. मात्र, प्रशासकीय आदेशानंतर निविदा प्रक्रिया न राबविताच जुन्या निविदांच्या आधारे औषध खरेदी प्रक्रिया राबवल्याचे 'दिव्य मराठी'ने समोर आणले आहे.

## 'दिव्य मराठी'ने शोधून काढले पुरावे...

**1** २५ मार्च २०२५ : तांत्रिक मान्यतेसाठी दिले वेगळे टेंडर क्रमांक




GeM/२०२४/B/२६८७८३२, GeM/२०२४/B/२६८७८३२ व GeM/२०२४/B/५७८८८३३

**2** २८ मार्च २०२५ : औषध पुरवठ्याच्या आदेशात दुसराच टेंडर क्रमांक




GeM/२०२५/B/५७१७२०१

## अशी शोधली पळवाट

1. नियमाप्रमाणे, तांत्रिक व त्यानंतर प्रशासकीय मान्यता घेणे क्रमप्राप्त
2. प्रत्यक्षात, २२ ला प्रशासकीय तर २६ ला तांत्रिक मान्यता घेतली
3. औषध खरेदीच्या मान्यतेसाठी वेगळेच निविदा क्रमांक दाखवले

## असा झाला घोटाळा

1. प्रशासकीय आदेशापूर्वीच खरेदी प्रक्रिया राबवली
2. तत्कालिन अधिकाऱ्यांनी टिपणीत आक्षेप नोंदवूनही दुर्लक्ष
3. एकाच कंपनीकडून केली सर्वाधिक औषधांची खरेदी

## चौकशी करून कारवाई



ही प्रक्रिया तत्कालीन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तरी चौकशी करून कारवाई करू. - डॉ. चारुदत्त शिंदे, सीएस

**संताप** • कुंभमेळा मंत्री महाजन यांच्या नावाने ठेकेदाराच्या रहिवाशांना धमक्या

# एसटीपीसाठी माती वाहणारे डंपर थेट रहिवाशांच्या अंगावर नेल्याचा आरोप

## संतप्त नागरिकांनी रस्ता खोदत काम पाडले बंद, काम रद्दची मागणी

प्रतिनिधी | नाशिक

कुंभमेळ्याच्या कामासाठी तपोवन व टाकळी परिसरात एसटीपी उभारले जात आहे. तपोवनातील प्लांट येथून टाकळीतील प्लांट परिसरात डंपरद्वारे माती वाहून नेली जाते. मात्र ही माती वाहून नेणारे हे डंपर वेगाने जातात तसेच या प्रकारामुळे मोठी धूळ उडत असल्याने याबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी विचारणा केली होती. मात्र हे काम मुख्यमंत्री, मंत्री गिरीश महाजन यांच्या मर्जीने सुरु असून डंपरला विरोध करणाऱ्या नागरिकांच्या थेट अंगावर घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला.

संतप्त नागरिकांनी जुना नाशिक-सायखेडा रस्ता थेट जेसीबीद्वारे खोदत कोणत्याही परिस्थितीत या रस्त्यावरुन डंपर जावू देणार नाही अशी भूमिका घेत काम बंद पाडले. डंपरचे काम देण्यात आलेल्या ठेकेदाराचे काम तातडीने रद्द करण्याची मागणी केली.



जुना सायखेडा रोड येथील एसटीपीच्या डंपरचा त्रास होत असल्याने रहिवाशांनी रस्त्यावर खोदकाम करून निषेध केला.

### पालिकेची नव्हे तर खासगी जागा

एसटीपीसाठी सुरू असलेल्या कामासाठी रहिवाशांनी खासगी जागेतून रस्ता दिला आहे. मात्र ठेकेदारांकडून या प्रकारे अरेरावी केली जात असल्याने या पुढे आमच्या परिसरातून या कामासाठी रस्ता दिला जाणार नाही अशी भूमिका परिसरातील रहिवाशांनी घेतली आहे.

**दिव्य मराठी इनसाइड**

### एसटीपीच्या मुद्द्यावरुन महापालिका अडचणीत

एसटीपीसाठी पालिकेकडून गुपचूप १२०८ वृक्ष तोडण्यात आले. या बदल्यात फाशीच्या डोंगरावर लावण्यात आलेले रोप जळून गेल्याने पालिकेवर कारभारावरच टिका पर्यावरणप्रेमींनी केली होती. आता रस्ता वापरू न देण्याची भूमिका परिसरातील नागरिकांनी घेतली आहे.

**डी. बी. स्टार एक्सपोज** सामाजिक उपक्रमाचा केवळ देखावा; पालिकेची उदासीनता अधोरेखित

# नंदिनीकाठी लावलेली रोपे करपली

## ५० पेक्षा अधिक वृक्ष लागवड-सुशोभीकरणाचे काम पाण्यात, जाळ्यांची दुरवस्था

**प्रतिनिधी** | नाशिक

शहरात महापालिका आणि विविध सामाजिक संस्थांकडून वृक्षारोपणाचा देखावा सुरू आहे. नंदिनी नदीकिनारी मुंबईनाका, भारतनगर परिसरातील जागेत सामाजिक संस्थांकडून १०० हून अधिक रोपे लावण्यात आली. परंतु, फोटोसेशनचे सोपस्कार पार पाडून पालिकेसह संस्था प्रतिनिधींचेही येथील वृक्षांच्या संगोपनाकडे दुर्लक्षच झाले. परिणामी, येथे लावलेली सर्व रोपे पाण्याअभावी करपून गेली आहेत. संरक्षक जाळ्यांचेही नुकसान झाले आहे. पालिकेच्या या उदासीन कारभारावर 'डी. बी. स्टार'चा हा प्रकाशझोत...

तपोवनातील वृक्षतोडीवरून नाशिकमध्ये वातावरण तापले आहे. पर्यावरणप्रेमींविरुद्ध महापालिका असा जोरदार संघर्ष गेल्या महिनाभरापासून सुरू आहे. नंदिनी नदीकिनारीदेखील मागील १५ दिवसांपूर्वी १०० हून अधिक रोपे लावण्यात आली. परंतु, या रोपट्यांकडे पुन्हा लक्षच दिले गेले नाही. संगोपनाकडे दुर्लक्ष झाल्याने सर्व रोपे जळून गेल्याचे धक्कादायक चित्र 'डी. बी. स्टार'च्या पाहणीत दिसून आले आहे. जाळ्या लावण्यात आल्या. परंतु त्याही तकलादू असल्याने अल्पावधीतच त्यांची दुरवस्था झाली आहे. काही ठिकाणी जाळ्या तुटल्या आहेत, तर अनेक ठिकाणी कोलमडल्या आहेत. भविष्यात झाडे वाचलीच, तरी ती रस्ता रुंदीकरणाला अडथळा ठरतील आणि त्यावर कुऱ्हाड चालवावी लागेल. कोणत्याही नियोजनाअभावी केवळ वृक्षारोपणाचा घाट घातला जात असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया नाशिककर व्यक्त करत आहेत.





संरक्षणासाठी प्लास्टिकच्या जाळ्या लावण्यात आल्या. परंतु त्याही तकलादू असल्याने अल्पावधीतच त्यांची दुरवस्था झाली आहे. १५ दिवसांपूर्वी ही झाडे लावण्यात आली असून त्याठिकाणी सुकलेली झाडे आणि नुकसान झालेल्या संरक्षक जाळ्या.

### फोटोसेशन सोडून संवर्धनाचे नियोजन केल्यास वाढेल वृक्षसंपदा, अपेक्षेप्रमाणे वृक्षच नाही

अनेक औद्योगिक संघटना, कंपन्या व इतर संस्था कर सवलत प्राप्त व्हावी यासाठी किंवा प्रतिमा उंचावण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रम राबवतात. मात्र, त्यानंतर संगोपन व संवर्धन याकडे दुर्लक्ष करतात. किमान तीन वर्षे तरी त्यांनी संगोपन केले पाहिजे. परंतु, तसे होत नसून वृक्षारोपण मोहीम नुसती देखाव्यासाठी ठरत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्याचा शहराला कोणताही फायदा होताना दिसून येत नाही. म्हणून वृक्षांची संख्या अद्यापही अपेक्षेप्रमाणे वाढलेली दिसत नाही.

### थेट प्रश्न

**सचिन देवरे, उद्यान निरीक्षक, नाशिक पूर्व विभाग, महानगरपालिका**

**प्रश्न : नंदिनीकिनारी मुंबई नाक्याकडे झाडे कोणी लावली?**

- काही खासगी संस्था व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे.

**प्रश्न : रोपे करपली आहेत, त्यांच्या संगोपनाची जबाबदारी कोणाची?**

- वृक्ष संगोपनाची जबाबदारी काही वृक्षप्रेमींवर दिली आहे. ते या ठिकाणी पाणी देणे व आवश्यक देखभाल ठेवतील.

**प्रश्न : आम्ही केलेल्या पाहणीत येथे लावलेली सर्व रोपे जळून गेले आहे.**

- रोपे करपू नयेत, यासाठी टँकर उपलब्ध करून देणार आहोत.

### रोपे वाचवण्यासाठी उद्यान विभाग टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देणार

### वृक्षलागवडीचा नुसता देखावा नको, निगा राखावी

*नंदिनी नदीकिनारी लावलेली रोपे करपली आहेत. त्यांची कोणतीही निगा राखण्यात आली नाही. पावसाळ्यात वृक्षारोपण समजू शकतो. परंतु, आता हिवाळा सुरू आहे. कधीही देखाव्यासाठी केवळ वृक्ष लावून फोटोसेशनचे प्रकार सुरू आहेत. हे थांबले पाहिजे. वृक्षलागवडीनंतर किमान त्याचे संवर्धन होणे आवश्यक आहे.*

*- ओमकार परदेशी, नागरिक*

### वृक्ष लावणाऱ्यांनी देखावा न करता घ्यावा पुढाकार

*अनेक संस्था केवळ काही सवलती मिळाव्यात, म्हणून वृक्ष लावण्याचा देखावा करतात. नंतर त्याकडे दुर्लक्ष करतात. अशांवर महापालिकेने कारवाई करावी. वृक्ष जगवण्यासाठी पालिकेने जबाबदारी घ्यावी. तरच हरित नाशिक संकल्पना प्रत्यक्षात उतरेल. मुळात कोणत्या संस्थेकडून हे वृक्ष लावण्यात आले त्याची माहिती घेऊन त्यांना संवर्धन करण्याचे प्रशासनाकडून सांगण्यात यावे.*

*- रत्नदीप देशपांडे, पर्यावरणप्रेमी*

# कुंभनिमित्त जेम पोर्टल, ई टेंडरिंगचे उद्यापासून तीन दिवस प्रशिक्षण

## इच्छुकांना टेंडरिंग करण्यास मदत, योजनांसह विविध विषयांवर मार्गदर्शन

**प्रतिनिधी** | नाशिक

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, नाशिक यांच्यामार्फत सिंहस्थ कुंभमेळा निमित्ताने १९ ते २१ डिसेंबर असे ३ दिवसीय जेम पोर्टल व ई-टेंडरिंग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र इच्छुकांनी या प्रशिक्षणात सहभागी होत कुंभमेळ्यात होणाऱ्या विकास कामांचे इ-टेंडर भरण्याचा योग्य अभ्यास अन् सराव करुन रोजगार मिळविता येणार आहे.

तीन दिवसीय प्रशिक्षणात ई-टेंडर बघणे व भरणे, बीओक्यू प्रक्रिया, ई-टेंडर डाऊनलोड करणे, टेंडरची वेबसाईटवर नोंदणी, आवश्यक सॉफ्टवेअर, डिजिटल स्वाक्षरी, एल-१ टेंडर प्रक्रिया, विक्रेता वेंडर नोंदणी, आवश्यक कागदपत्रे, शासकीय ठेकेदार होण्यासाठी मार्गदर्शन, आयात व निर्यात परवाना, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र नोंदणी, उद्यम नोंदणी, दुकान कायदा परवाना, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कामगार विमा योजना, आयकर, जीएसटी, टिडीएस, जेम पोर्टल या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रशिक्षणानंतर इच्छुकांना टेंडरिंग करण्यास मदत होणार आहे.

**दिव्य मराठी एक्सप्लेनर**

### ७ वी पास उत्तीर्णांना संधी, प्रशिक्षणानंतर प्रमाणपत्र

प्रशिक्षणास सहभागासाठी व्यवसाय करण्यास इच्छुक उमदेवार किमान इयत्ता ७ वी उत्तीर्ण असावा, वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे, फोटो व आधारकार्ड आवश्यक आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, ११ उद्योग भवन, शासकीय आयटीआय जवळ, त्र्यंबकरोड, सातपूर, नाशिक येथे अथवा आयटीआय संस्थेतील मोबाइल क्रमांक ९१६८६६७९६५, ९१६८६६७९६७, ८७६६७३८३१८ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन प्रकल्प अधिकारी यांच्याकडून करण्यात आले आहे.

**महापालिका निवडणूक • प्रती पृष्ठ दोन रुपये दर; दोन दिवसात ४० याद्यांची विक्री**

# मतदार याद्यांसाठी मोजावे लागतील ८3,300 ₹

प्रतिनिधी | मालेगाव

महापालिकेचा निवडणूक कार्यक्रम व प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या जाहीर झाल्याने इच्छुकांकडून याद्यांची खरेदी केली जात आहे. राज्य निवडणूक आयोगाने यंदा याद्यांची प्रती पृष्ठ दोन रुपये दराने विक्रीचे आदेश दिले होते. गत पंचवार्षिकला हा दर प्रती पृष्ठ पाच रुपये होता. २१ प्रभागांच्या याद्या खरेदीसाठी तब्बल ८३,३०० रुपये मोजावे लागत आहे. दोन दिवसात ४० याद्यांची विक्री झाली आहे.

महापालिकेतून मतदार याद्यांची विक्री सुरु झाली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार पक्षाचे प्रतिनिधी, नागरिकांना केंद्रनिहाय याद्या प्रती पृष्ठ दोन रुपये आकारुन जेवढे पृष्ठ होतील त्यानुसार रक्कम घेवून दिल्या जात आहेत. निवडणूक शाखेने २१ प्रभागांच्या याद्यांची पृष्ठ संख्या व किंमत फलकावर लावली आहे.

**प्रभागनिहाय याद्यांची पृष्ठ संख्या व दर**

| प्रभाग | पृष्ठ संख्या | यादी किमत | प्रभाग | पृष्ठ संख्या | यादी किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९७ | ३९९४ | १२ | १५४३ | ३०८६ |
| २ | १७७९ | ३५५८ | १३ | १७७९ | ३५५८ |
| ३ | २५६३ | ५१२६ | १४ | १६८८ | ३३७६ |
| ४ | २१३४ | ४२६८ | १५ | १९३१ | ३८६२ |
| ५ | १९२७ | ३८५४ | १६ | १६४६ | ३२९२ |
| ६ | ३००६ | ६०१२ | १७ | २३९१ | ४७८२ |
| ७ | २०८८ | ४१७६ | १८ | २०९१ | ४१८२ |
| ८ | १९६३ | ३९२६ | १९ | १८३१ | ३६६२ |
| ९ | २१३५ | ४२७० | २० | २०८८ | ४१७६ |
| १० | १७४३ | ३४८६ | २१ | १७७८ | ३५७६ |
| ११ | २०३९ | ४०७८ | मतदार याद्यांची संख्या व किमंत अशी | | |

**इनसाइड**

**खर्चात समावेश नाही**

प्रत्येक उमेदवारास दहा याद्यांची गरज भासते. त्या खरेदीसाठी किमान ४० ते ५० हजाराचा खर्च अपेक्षित आहे. हा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होत नाही. उमेदवारी अर्ज भरल्यानंतरच निवडणूक खर्च सुरू होतो. एका प्रभागातून चार उमेदवार निवडून जाणार आहेत. पॅनलमधील उमेदवारांमध्ये याद्यांचा खर्च विभागाला जावू शकतो. मात्र, अपक्ष उमेदवारांना हा खर्च पेलावाच लागेल.

**सर्वपक्षीय सहविचार सभा** • जनआंदोलनाची भूमिका ठरवण्यासाठी उद्या मेळावा

# सिन्नर, संगमनेरमार्गेच व्हावा नाशिक ते पुणे रेल्वेमार्ग, सिन्नरचे नागरिक ठाम

**प्रतिनिधी** | सिन्नर

नाशिक-पुणे रेल्वे मार्ग सिन्नर-संगमनेरमार्गेच व्हावा, अशी ठाम भूमिका येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या सर्वपक्षीय सहविचार सभेत मांडण्यात आली. सिन्नरकरांनी आक्रमक भूमिका घेत जनआंदोलनाची पुढील भूमिका ठरविण्यासाठी शुक्रवारी (दि. १९) सिन्नर येथे मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. मातोश्री नर्मदा लॉन्स येथे दुपारी ४ वाजता होणाऱ्या या मेळाव्यात सिन्नरकरांच्या मागणीसाठी व्यापक जन आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे.

मुंबई-पुणे-नाशिक या महत्त्वाच्या त्रिकोणात सिन्नरचा समावेश आहे. पूर्वीचा नियोजित नाशिक-पुणे रेल्वे मार्ग सिन्नर-संगमनेर मार्गे जाणार होता. तशी अधिसूचना काढून संबंधित जमिनींचे संपादनही करण्यात आले होते. असे असताना अहिल्यानगर जिल्ह्यातील विशिष्ट घटकांच्या फायद्यासाठी हा रेल्वे मार्ग बदलण्यात आल्याचा आरोप सर्वपक्षीय सहविचार सभेत करण्यात आला. जुना मार्ग बदलून पुणतांबा, शिर्डी मार्गे पुणे असा प्रस्तावित नवीन मार्ग करण्यात आल्याने सिन्नरकरांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. हा रेल्वे मार्ग सिन्नर-संगमनेर मार्गे झाल्यास सिन्नर तालुक्याच्या शैक्षणिक, व्यावसायिक, औद्योगिक, कृषी व कृषीपूरक व्यवसायांना चालना मिळणार आहे. दळणवळण, व्यापार, उद्योग व नोकरदारवर्गास हा मार्ग महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले.

## तालुक्यासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत



सर्वपक्षीय सहविचार सभेत भूमिका मांडताना बाजार समितीचे सभापती श्रीकृष्ण घुमरे.

### संगमनेरमार्गे जुना रेल्वे मार्ग




### शिर्डीमार्गे नवीन प्रस्तावित मार्ग




## एक्सप्लेनर

### जुना व नवीन रेल्वे मार्ग असा...

- **पूर्वीचा मार्ग**: नाशिकरोड, सिन्नर, संगमनेर, आंभोरे, साकुर, आळे फाटा, नारायणगाव, चाकण, हडपसर, पुणे.
- **नवीन प्रस्तावित मार्ग**: नाशिकरोड, सिन्नर, दोडी, साईनगर -शिर्डी रेल्वेस्थानक.

## नॉलेज

### जुन्या मार्गाने नाशिकला होणार असा फायदा

संगमनेरमार्गे रेल्वे मार्ग झाल्यास सिन्नर आणि चाकण एमआयडीसी या थेट नाशिकशी जोडल्या जातील. तसेच कृषीमाल पुण्याला पाठविण्यासाठी शेतकऱ्यांना सोयीचे ठरेल. शिर्डी व नाशिक हा रेल्वे मार्ग अगोदरच धार्मिक स्थळासाठी प्रस्तावित होता. त्यामुळे नाशिकहून पुण्यासाठी हायस्पीड रेल्वे मार्ग करायचा असल्यास तो संगमनेरमार्गे केल्यास उद्योजक, शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायद्याचे ठरणार आहे. नाशिक व पुणे या दोन महत्त्वाच्या औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेली दोन शहरे थेट रेल्वेने जोडावीत ही अनेक दशकांपासूनची मागणी निर्णायक टप्प्यात आली असताना केवळ नारायणगाव येथील जीएमआरटी संवेदनशील क्षेत्र टाळण्यासाठी मार्ग बदलला जात आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा हेतूच आणि प्रवासाचा कालावधी या बदल होत आहे, अशी भावना नाशिककर व्यक्त करत आहेत.

### आंदोलनाचा नागरिकांनी दिला इशारा

सभेनंतर तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांना नाशिक-पुणे रेल्वेमार्ग सिन्नर- संगमनेरमार्गेच व्हावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला. यावेळी माजी नगराध्यक्ष विठ्ठल उगले, सिन्नर बाजार समितीचे सभापती कृष्णा घुमरे, उदय गोळेसर, राजाराम मुंगसे, भाऊसाहेब शिंदे, बबन वाजे यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते, उद्योजक, व्यापारी यांच्यासह सिन्नरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै.साईमत दि.१८ डिसेंबर,२०२५

साईमत

# त्र्यंबकेश्वर दर्शनपथ आता स्टेट बँकेपासुन सुरु होणार  शासकीय उपजिल्हा रुग्णालय वगळले

## दर्शनपथाची लांबी झाली आता २१० मी. वरुन १०५ मीटर्सपर्यंत

त्र्यंबकेश्वर। प्रतिनिधी।

**त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तिर्थक्षेत्र विकास निधीतून करावयाची प्रमुख चार कामे महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहेत. यात त्र्यंबककरांना नवीन असलेले कॉरिडॉर तथा दर्शनपथाचे आकर्षण आहे. चार प्रमुख कामांच्या एजन्सी निश्चित झाल्या आहेत. त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य यावेळेस दर्शनपथ (कॉरिडॉर) होणार याचे त्र्यंबकेश्वरकरांना औत्सुक्य आहे. कॉरिडॉर अगोदर जव्हारफाटा (श्री गजानन महाराज चौक) पासन नियोजन करण्यात आले होते.**

मात्र यात तोडफोड मोठ्या प्रमाणात होउन एस्टीमेट देखील वाढणार होते. त्यात माहेश्वरी भक्तनिवास, तहसिलदार कार्यालय, होउ घातलेले पंचायत समिती कार्यालय, नगरपरिषदेची प्रसुतीगृहाची इमारत, उपजिल्हा रुग्णालय आदी पक्क्या बांधकामाच्या मोठ्या इमारती पाडाव्या लागणार होत्या. या इमारतींचे पुनर्वसन त्यासाठी लागणारी ७ ते ८ एकर जागा. त्यात हे सर्व करायचे तर वेळ कमी व बजेट जास्त यामुळे शासनाला हा बेत रहित करावा लागला. त्यानंतर डॉ.बाबासाहेब चौकापासुन ते त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या पुर्व दरवाजापर्यंत २१० मी. करण्याचे निश्चित करण्यात आले. तरीही शेवटी उपजिल्हा रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित झाला. आज असलेली सर्व सोयी युक्त दुमजली इमारत तोडण्यापुर्वी रुग्णांची सोय करणे गरजेचे होते. ही सर्व बाब खर्चिक आणि वेळ जाणारी असल्याने सर्वच गैरसोय झाली असती. हे सर्व टाळण्यासाठी शेवटी भारतीय स्टेट बँक ते देवस्थान पुर्व गेटपर्यंत १०५ मी. करण्या साठी निविदा यापुर्वीच काढण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाने एजन्सी देखील निश्चित केली आहे. शेवटी २१० मी. वरुन १०५ मीटरचा कॉरिडॉर होणार आहे.

त्र्यंबकेश्वर तिर्थक्षेत्राला अ वर्ग दर्जा प्राप्त झाल्यानंतर



तिर्थक्षेत्र विकासासाठी रु. २७५ कोटी निधी यापुर्वीच मंजुर झाला होता. सिंहस्थपुर्व करावयाची प्रमुख कामे कोणती करायची? याबाबत विभागिय आयुक्त डॉ.प्रविण गेडाम यांनी त्र्यंबक नगरपरिषदेला सुचविले होते. त्या नुसार त्र्यंबक नगरपरिषदेने चार प्रमुख कामांचे प्रस्ताव पाठविले होते. सदर कामे पुढीलप्रमाणे..

दर्शन पथ (कॉरिडॉर) - रु. ६८ कोटी, स्वागतकक्ष परिसर विकास (व्यापार संकुल, भाजी मार्केट व वाहनतळ या कामांसाठी - रु. ९५ कोटी, नवीन डीपीरोड (भूसंपादन मोबदलासह) रु. १८२ कोटी. तर सार्वजनिक शौचालय (एकुण संख्या २०) बांधकाम रु. १० कोटी, अशा एकूण रु. २७५/- कोटी कामांचा समावेश या तिर्थक्षेत्र विकास निधीतून साकार होणार आहे. हि कामे एमएसआयडीसी (MAHARASHTRA STATE INFRASTRUCTUR DEVOLOPMENT CORPORATION) कडे सोपविण्यात आली आहेत. त्यामुळे आता सिंहस्थाची प्रमुख चार कामे यापुर्वीच मार्गी लागणे अपेक्षित होते पण निधीअभावी प्रमुख कामे सुरु झाली नव्हती. ती आता सुरु करण्यात येत आहेत. कॉरिडॉर होण्यासाठी त्र्यंबक पंचायत समिती कार्यालयीन इमारतीचे काम थांबविण्यात आले होते. या इमारत कामाला निधी मंजूर आहे. एजन्सी निश्चित झाली आहे.जागेचा भूमीपूजन सोहळा यापुर्वीच झाला आहे. कंत्राटदाराने बांधकामासाठी जागा देखील साफ केली होती. एव्हाना बरेचसे काम झाले असते. तथापि कॉरिडॉरच्या घोळात काम थांबविण्यात आले. ते अजुनही थांबविले आहे. वास्तविक काम सुरु करण्यास आता काही हरकत नाही. कारण त्र्यंबकेश्वर पंचायत समितीचे सर्वच विभाग दाटी वाटीत अडचण सहन करुन काम करत असतात. काही विभाग तर इगतपुरीला आहेत. ते त्र्यंबकला एक दिवस देतात. पुढच्या वर्षी ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सिंहस्थ ध्वजारोहण होत आहे.

Nashik Edition
Dec 17, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com

दै.नवभारत दि.१८ डिसेंबर,२०२५

ePaper
नवभारत Nashik | 17 December 2025 | Page 4

# 1,450 करोड़ का 'शुद्धिकरण प्रोजेक्ट'!

## गोदावरी को साफ करने के लिए 4 नए STP बनाएगी मनपा, BOD लेवल को 5 तक लाने का दावा

■ **नाशिक, ब्यूरो.** 2027 में होने वाले सिंहस्थ कुंभ मेले में भक्तों को रामकुंड में स्नान के लिए साफ पानी सुनिश्चित करने के लिए, नाशिक महानगरपालिका (मनपा) ने गोदावरी नदी के प्रदूषण को रोकने की दिशा में एक बड़ा कदम उठाया है. 1,450 करोड़ रुपये के गोदावरी शुद्धिकरण प्रोजेक्ट के तहत चार नए सीवेज ट्रीटमेंट प्लांट (STP) बनाने का काम शुरू कर दिया गया है. मनपा का लक्ष्य इन चारों प्रोजेक्ट्स को जून 2027 तक पूरा करना है.

**प्रदूषण और समाधान :** वर्तमान समस्या गोदावरी नाशिक शहर के बीच से गुजरती है, लेकिन सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स की



क्षमता कम होने और लगभग 21 नालों से बिना ट्रीटमेंट के सीवेज सीधे गोदावरी में छोड़े जाने के कारण नदी अत्यधिक प्रदूषित हो गई है. पिछले सिंहस्थ में भी हाई कोर्ट ने सीधे सीवेज छोड़ने पर रोक लगाने का आदेश दिया था.

**416** MLD क्षमता के प्लांट का लक्ष्य सिंहस्थ 2027 से पहले

**समाधान:** मनपा ने 10 पुराने STP पर खर्च करने के बजाय, पूरी तरह से तैयार और लेटेस्ट सीवेज ट्रीटमेंट प्लांट लगाने का फैसला किया है.

**BOD लेवल में सुधार:** वर्तमान में पुराने STP से ट्रीट किए गए पानी का बायोलॉजिकल ऑक्सीजन डिमांड (BOD) लेवल 25 से 30 के बीच है, जबकि प्रदूषण कंट्रोल बोर्ड का मानक 10 के अंदर है. मनपा का दावा है कि इन मॉडर्न STP की वजह से गोदावरी में छोड़े जाने वाले पानी का BOD 5 के अंदर होगा.

### प्रोजेक्ट के प्रमुख आंकड़े

| STP का स्थान, | क्षमता (MLD) |
|---|---|
| तपोवन | 180 MLD |
| अगरटाकली | 97 MLD |
| चेहेडी | 64 MLD |
| पंचक | 75 MLD |
| कुल क्षमता | 416 MLD |

### नए STP और क्षमता

मनपा चार जगहों पर हर दिन 416 MLD (यानी लगभग 15 दलघफू) पानी ट्रीट करने की क्षमता वाले नए सीवेज ट्रीटमेंट प्लांट बना रही है:

### प्रोजेक्ट का दायरा

- इस प्रोजेक्ट में 10 सीवेज लिफ्टिंग स्टेशन और 21 नालों से सीवेज को नए STP में मोड़ने के लिए नई सीवेज पाइपलाइन बिछाना भी शामिल है.
- चारों STP का निर्माण कार्य लगभग 30 प्रतिशत पूरा हो चुका है.
- मनपा का दावा है कि ये नए प्रोजेक्ट्स पर्यावरणीय नियमों का पूरी तरह पालन करेंगे और गोदावरी के पानी की गुणवत्ता में काफी सुधार लाएँगे.

# जिल्हा अहिल्यानगर

नवीं आशा नवीं दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
18 Dec 2025 - Page 03

# गर्भलिंग निदान रॅकेटविरोधात राहाता तालुक्यात संतापाचा वणवा

## दोषींच्या मुसक्या आवळून परवाने रद्द करण्याची मागणी; वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक संघटना आक्रमक

**राहाता (प्रतिनिधी)–** दैनिक सार्वमतमध्ये गर्भलिंग निदान रॅकेटबाबतचे वृत्त प्रसिद्ध होताच, राहाता तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या खळबळजनक वृत्ताने केवळ सामान्य नागरिकच नव्हे, तर वैद्यकीय क्षेत्रातील प्रामाणिक डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, महिला संघटना आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींना पुरते हादरवून सोडले आहे. 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' सारख्या राष्ट्रीय मोहिमेच्या मुळावर घाव घालणाऱ्या या अमानुष प्रकारांवर आता कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

हे वृत्त प्रसिद्ध होताच सकाळपासूनच नागरिकांनी 'सार्वमत' कार्यालय आणि प्रशासकीय यंत्रणेशी संपर्क साधून आपला रोष व्यक्त केला. हे प्रकार खरे असतील, तर ही केवळ कायद्याची नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची हार आहे, अशी भावना एका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्याने व्यक्त केली. वारंवार अशा घटना समोर येत असल्याने आतापर्यंत झालेल्या कारवाया केवळ नावापुरत्याच होत्या का? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.



महिला संघटनांनी या प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. शासकीय पातळीवर जनजागृतीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, मग तरीही अशा रॅकेटला मोकळे रान मिळतेच कसे? असा सवाल महिला पदाधिकाऱ्यांनी विचारला आहे. त्यांनी संबंधित संशयित केंद्रांचे परवाने तातडीने रद्द करून दोषींना कठोर शासन करण्याची मागणी केली आहे. या प्रकारांमुळे प्रामाणिक सेवा देणाऱ्या डॉक्टरांमध्येही नाराजी आहे. एका नामांकित डॉक्टरांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, अशा बेकायदेशीर कृत्यांमुळे संपूर्ण डॉक्टर वर्ग बदनाम होतो आणि समाज आमच्याकडे संशयाने पाहू लागतो. वैद्यकीय व्यवसायाची विश्वासार्हता टिकवण्यासाठी या 'ब्लॅक शीप्स'वर कारवाई होणे गरजेचे आहे.

स्थानिक नागरिकांनी थेट प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर हे रॅकेट सुरू असताना आरोग्य विभाग, पोलीस आणि दक्षता समित्या झोपल्या होत्या का? असा सवाल नागरिक विचारत आहेत. यामागे केवळ हलगर्जीपणा आहे की कुणाचे वरदहस्त लाभले आहेत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी आता होत आहे.

राजकीय वर्तुळातूनही यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. कोणत्याही परिस्थितीत दोषींना पाठीशी घातले जाणार नाही, अशी भूमिका स्थानिक नेत्यांनी घेतली असून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी केली आहे. दरम्यान नागरिकांनी आता केवळ नोटीसबाजी नको, तर संयुक्त कृतीदल स्थापन करून प्रत्यक्ष स्टिंग ऑपरेशन आणि धडक कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे. एकूणच सार्वमतच्या या वृत्ताने समाजाच्या विविध थरांना एकत्र आणले असून, आता प्रशासन यावर काय ठोस पावले उचलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे डोळे लागले आहेत.



▶ ज्या हातांमध्ये देवाने 'जीवन' देण्याचं वरदान दिलं, तेच हात आज रक्ताने माखले आहेत, हे पाहून माणुसकीलाही लाज वाटत आहे. पांढरा कोट घालून देवदूत बनलेले राहात्यातील काही डॉक्टर आज पैशाच्या हव्यासापोटी कसाई बनले आहेत. गर्भातील त्या चिमुकल्या जिवाला हे जग पाहण्याचा अधिकार आहे, पण केवळ 'मुलगी' आहे म्हणून तिची गर्भातच निर्घृण हत्या केली जात आहे. ज्या क्लिनिकमध्ये हा पापाचा बाजार मांडला जातो, तिथे कायद्याचा बडगा असा बसला पाहिजे की पुन्हा कोणाचंही धाडस होता कामा नये. प्रशासनाने आता फक्त नोटिसा पाठवून शांत बसू नये. अशा कसाई डॉक्टरांचे परवाने कायमचे रद्द करून त्यांना जेलच्या गजाआड धाडावे, तरच या समाजातील ही घाण साफ होईल. स्त्री भ्रूणहत्या हे एक महापाप आहे आणि हे पाप करणाऱ्यांना तसेच त्याला साथ देणाऱ्यांना आता समाजात जागा उरता कामा नये.

**–कैलास बापू कोते**, माजी नगराध्यक्ष, शिर्डी



▶ स्त्री भ्रूण हत्येबाबत समाजात जागृती निर्माण झाली असली, तरी उच्चभ्रू समाजात हे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे. हे रोखण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून नागरिकांनी स्वतः सतर्क राहून अशा प्रवृत्तींचा बिमोड करणे काळाची गरज आहे. स्त्री भ्रूणहत्या कमी झाल्याचा समज खोटा ठरवणारी अनेक प्रकरणे शहरात समोर येत आहेत. विशेषतः शिकलेल्या 'व्हाईट कॉलर' वर्गाकडून असे गुन्हे घडत आहेत. जनजागृती आणि सामूहिक प्रतिकार हाच यावरचा खरा उपाय आहे. स्त्री भ्रूणहत्येची समस्या आता शहरांमध्ये आणि उच्चभ्रू वस्त्यांमध्ये अधिक तीव्रतेने दिसतेय. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी समाजाने सतर्क राहून प्रशासनाला साथ दिली पाहिजे.

**–हेरंब कुलकर्णी**, सामाजिक कार्यकर्ते



▶ गर्भलिंग निदान आणि स्त्री भ्रूणहत्येची बातमी वाचून मन सुन्न झाले आहे. शिर्डीपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या राहाता शहरात डॉक्टरांनी केलेले हे कृत्य राक्षसी आहे. राहाता शहरात जो प्रकार समोर आला आहे, तो मानवतेला काळिमा फासणारा आहे. गर्भलिंग निदान करून भ्रूणहत्या करणाऱ्या डॉक्टरांवर कठोरात कठोर कारवाई झालीच पाहिजे. अशा गुन्हेगारांना समाजात स्थान नाही.

**–श्रीमती मिनालताई रेड्डी**, भारतीय लहुजी सेना

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
18 Dec 2025 - Page 07

# बिबट्याचा बंदोबस्त करा, अन्यथा पारनेर बंद करू

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)**– पारनेर शहर परिसरात तसेच वाड्या वस्त्यावर दहशत निर्माण करणारा व नागरिकांवर हल्ला करणाऱ्या बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अन्यथा येत्या दहा दिवसनंतर पारनेर शहर बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पारनेरमधील युवकांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

पारनेर शहर व परिसरात बिबट्याची दहशत सुरूच असून दोन दिवसांत दोन महिलांवर बिबट्याने हल्ले केले आहेत. याकडे वन विभागाने याकडे दुर्लक्ष केले असून पारनेर शहरातील व परिसरात तातडीने पिंजरे लावावे, ट्रप कॅमेरा लावावे, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, पिंजरे आणण्यासाठी लोकांना पैसे मागणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, तालुक्यातील वन कर्मचारी यांची यादी व मोबाईल नंबर जाहीर करावे, पारनेर तालुका नियंत्रण कक्ष तयार करून त्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची डयुटी लावावी, या मागणीसाठी पारनेरमधील युवकांच्या वतीने बुधवारी सकाळी आंदोलन करण्यात आले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे यांनी पिंजरा लावण्यासाठी नागपूरहून परवानगी लागती, पिंजरा आणण्यासाठी निधी नाही, बाकी गावातील सरपंच मदत करतात तुम्ही वाहनांचे सहकार्य करा असे सांगितले. त्यावर माजी नगरसेवक विशाल शिंदे, भाजपचे मंडल सरचिटणीस कल्याण थोरात, खादी ग्रामोद्योग संघाचे संचालक सतिश म्हस्के, आण्णा सोबले, अशोक औटी, बबलू दावभट, किशोर आढाव यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख निलेश खोडदे, वकील गणेश कावरे यांनीही बिबट्याचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी वन विभागाची असल्याचे सांगितले. यावेळी संतप्त आंदोलकांनी दहा दिवसांत बिबट्याचा बंदोबस्त करा, अन्यथा पारनेर शहर बंद ठेवण्याचा इशारा दिला. यावेळी अधिकारी धाडे यांनी पारनेरमधील पारनेर पब्लिक स्कूलजवळील शेतात, सेनापती बापट तलाव, समर्थ नगर येथे पिंजरे लावले असल्याची माहिती दिली. आणखी पिंजरे लावण्यात येतील असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. पारनेर नगरपंचायतने परिसरात पिंजरे लावण्यासाठी ठराव वन विभागाला दिल्याचे नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, पाणी पुरवठा सभापती योगेश मते, अर्जुन भालेकर यांनी सांगितले. कल्याण थोरात, विशाल शिंदे, इंद्रजित देशमुख, विजय दावभट, किशोर आढाव, महेंद्र बोरूडे, अण्णा सोबले, तुकाराम बोरुडे, श्रीकृष्ण औटी, अनिस शेख, खादी ग्रामोद्योग संघाचे संचालक सतिश म्हस्के, नितीन दावभट, शेखर हांडे गणेश भगवान औटी, तुकाराम बोरूडे, समीर शेख, योगेश औटी, गणेश पोपट औटी, अशोक औटी, विष्णू भिसे, संतोष वाटमारे, इंद्रजित देशमुख,अमित जाधव, सतोष औटी, बबन औटी, प्रदीप औटी, आदी उपस्थित होते

पारनेर वन विभागाच्या वतीने नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा, त्यात दररोज एका व्यक्तीची नेमणूक करून बिबट्या बाबतीत येणारी माहिती घेऊन उपाययोजना करावी. निधी बाबतीत प्रश्न वनमंत्री गणेश नाईक, आ. काशिनाथ दाते यांच्याकडे निधीची मागणी करणार असल्याचे कल्याण थोरात यांनी सांगितले.

## युवकांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना इशारा



### पत्रासाठी चार दिवस फिरवले

- पारनेर शहरातील तहसील कार्यालय व वन विभाग कार्यालय जवळील समर्थ नगर परिसरात दररोज बिबट्या येत असून तेथे पिंजरे लावण्यासाठी आम्हाला नगरपंचायतचे पत्र आणायला लावून चार दिवस पिंजरा लावला नाही ही शोकांतिका असल्याची तीव्र भावना बबलू दावभट, किशोर आढाव, महेंद्र बोरूडे यांनी व्यक्त केली.

- पारनेर परिसरात पिंजरा लावण्याबरोबरच पिंजरातभक्ष ठेवण्याची जबाबदारी वन विभागाने घ्यावी. वन कर्मचारी ऐनवेळी फोन उचलत नाही, त्यांनी फोन उचलावेत, अशी मागणी गायत्री प्रतिष्ठानचे इंद्रजित देशमुख यांनी केली.

## बिबट्या हल्ला पिडितीला २५ लाखांची मदत



**पारनेर (तालुका प्रतिनिधी)**– किन्ही येथे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भागूबाई खोडदे यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या वतीने २५ लाख रुपयांची आर्थिक मदत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत सुपूर्द करण्यात आली. या मदतीमध्ये १० लाख रुपयांचा धनादेश व १५ लाख रुपये एफडी स्वरूपात विश्वनाथ लक्ष्मण खोडदे यांचे नावे देण्यात आले.

यावेळी आ. दाते यांनी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करत शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. बिबट्यांच्या वाढत्या संचारामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतात व मोकळ्या परिसरात काम करणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, रात्रीच्या वेळी अनावश्यक बाहेर जाणे टाळावे आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रसंगी अशोक सावंत, वसंत चेडे, वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे, के. एस. साबळे, एन. व्ही. बडे, भाळवणी वनरक्षक बी. एस. दवणे, चालक दिगंबर विरोळे यांच्यासह स्थानिकनागरिक उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
18 Dec 2025 - Page 05

# राहाता तालुक्यात शेतकऱ्यांची लुटमार!

## ■ युरियाच्या नावाखाली नको असलेली औषधे गळ्यात मारण्याचा धंदा तेजीत

**एकरूखे (वार्ताहर)**- रब्बी हंगामातील गहू, मका आणि ऊस या पिकांच्या जोमदार वाढीसाठी सध्या युरिया खताची नितांत गरज असताना राहाता तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी शेतकऱ्यांची अडवणूक सुरू केली आहे. युरिया हवा असेल तर सुपर फॉस्फेट किंवा विक्री न होणारी कीटकनाशके घ्यावेच लागेल, अशी अट घालत शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

तालुक्यातील अनेक कृषी सेवा केंद्रांकडे खताचा साठा उपलब्ध असूनही जाणीवपूर्वक तुटवडा असल्याचे भासवले जात आहे. ज्या कंपन्यांची कीटकनाशके किंवा औषधे बाजारात चालत नाहीत, असा माल खपवण्यासाठी दुकानदार युरियाचा आधार घेत आहेत. युरियाच्या एका गोणीसाठी शेतकऱ्यांना नाहक १००० ते १२०० रुपयांचे जास्तीचे साहित्य खरेदी करावे लागत आहे. आधीच संकटात असलेला शेतकरी हतबल होऊन ही लूट सहन करत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुकानात खताचा ट्रक येण्यापूर्वीच दुकानदार आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या किंवा ओळखीच्या लोकांच्या नावावर बोगस बिले फाडून ठेवतात. त्यानंतर सर्वसामान्य शेतकरी खत मागायला आल्यावर साठा संपला आहे असे उत्तर देऊन त्याची बोळवण केली जाते. क्वालिटी कंट्रोल विभागाकडे कोणत्या दुकानात किती साठा आहे याची इत्थंभूत माहिती असते, तरी शेतकरी पुढे यायला धजावत नाहीत. कारण भविष्यात त्याच दुकानदाराकडून खते आणि औषधे घ्यावी लागणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाच्या या ढिलाईचा फायदा घेत कृषी सेवा केंद्र चालक मालामाल होत असून शेतकरी मात्र कंगाल होत आहे.

युरियासोबत १०००-१२०० रुपयांची अनावश्यक औषधे घेण्याची सक्ती केली जाते. साठा असतानाही शेतकऱ्यांना 'नाही' म्हणून परत पाठविले जाते. आता राहाता तालुक्यातील या कृषी केंद्र चालकांच्या मुजोरीला कृषी विभाग लगाम घालणार की शेतकऱ्यांची ही पिळवणूक अशीच सुरू राहणार? असा सवाल उपस्थित होत आहे.



▸ राहाता तालुक्यात युरिया खताचा मुबलक साठा उपलब्ध आहे. सध्या तालुक्यातील ९० कृषी सेवा केंद्रांकडे एकूण २७ हजार २९३ युरिया गोण्यांचा साठा शिल्लक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. मात्र जे दुकानदार युरिया खतासोबत इतर खतांची किंवा औषधांची लिंकिंग (सक्ती) करतील, त्यांच्याविरुद्ध लेखी तक्रार प्राप्त झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

– **विनया बनसोडे**, कृषी अधिकारी (क्वालिटी कंट्रोल राहाता)

▸ गव्हाला सध्या युरियाची अत्यंत गरज आहे. पण दुकानदार म्हणतात औषध घेतल्याशिवाय युरिया मिळणार नाही. ही सरळ सरळ लूट आहे. कृषी विभाग नुसतीच नावे मागण्यापेक्षा स्वतः दुकानांमध्ये जाऊन तपासणी का करत नाही?

– **निलेश वाघे**, शेतकरी खडकेवाके

**पारनेर नगरपंचायत, पारनेर**
ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
दूरध्वनी क्र. (०२४८८)-२२१११८ E-mail.ID :coud.parner@maharashtra.gov.in
जा.क्र./पान./कर/कवि/जाक/१४०४/२०२५ दि.१६/१२/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना**

मा. मुख्याधिकारी, पारनेर नगरपंचायत वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून पारनेर नगरपंचायत कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे पुरवणी/ वार्षिक कर आकारणी अंतर्गत प्रत्येक मिळकतीला विशिष्ट क्रमांक नोंदविणे, मोजमाप घेणे, कर मुल्यांकन करणे व तत्सम कामाकरिता या कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहे. इच्छुक निविदा धारकांनी आपली ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरणा करून संपूर्ण अर्हता दस्ताऐवजांसह विहित मुदतीत सादर करावी. अधिकची माहिती नगरपंचायत कार्यालयात व Online उपलब्ध आहे.

(प्रियांका शिंदे) मुख्याधिकारी, पारनेर नगरपंचायत, पारनेर
(सुप्रिया शिंदे) उपनगराध्यक्षा, पारनेर नगरपंचायत, पारनेर
(डॉ. विद्या कावरे) अध्यक्षा, पारनेर नगरपंचायत, पारनेर

**जाहीर निविदा नोटीस**

ग्रामपंचायत कार्यालय, माळणी/वाळेवाडी, ता. जि.अहिल्यानगर यांच्याकडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत माळणी/वाळेवाडी, ता. जि.अहिल्यानगर अंतर्गत खालील काम करण्यासाठी सीलबंद लिफाफ्यात ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा विक्री रक्कम | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | योजनेचे नाव | कंत्राटदार वर्ग | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे माळणी, ता.अहिल्यानगर येथे ग्रामपंचायत [illegible] परिसर सुधारणा करणे | ५९०/- | ०.०० | [illegible] | जन सुविधा विशेष अनुदान सन २०२५-२६ | सु. बे. अभियंता (स्थापत्य) | ०६ महिने |

निविदा फॉर्म व कामाच्या अटी व शर्ती बाबत ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात दि. १८/१२/२०२५ ते २५/१२/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. [illegible]

**दै.सकाळ** **दि.१८ डिसेंबर,२०२५**

सकाळ

# कुकाणे-घोडेगाव रस्त्यावर खड्ड्यांची मालिका

**कुकाणे, ता. १७ :** कुकाणे-घोडेगाव रस्ता देवगाव व चांदे ते घोडेगावपर्यंत खड्डेमय झाला आहे. या खड्ड्यांत वाहन आदळून अनेकदा अपघात होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विलास देशमुख यांनी केली आहे.

कुकाणे ते देवगाव अंतर अवघे सहा किलोमीटर आहे. परंतु हेच अंतर कापण्यास चारचाकी वाहनांना अर्धा तास वेळ लागतो. या रस्त्यावर दोन वर्षांत तीन वेळा खड्डे दुरुस्त करण्यासाठी लाखो रुपये खर्च झाले. प्रत्यक्षात मात्र खड्डे जैसे थेच आहेत. सध्या हा संपूर्ण रस्ताच उखडून त्यावर धुळीचे साम्राज्य पसरलेले आहे. या रस्त्यावरून वाहन चालवणं म्हणजे हाडे खिळखिळी करून घेणं, असा अनुभव वाहनचालकांना येत आहे. रस्त्याची बिकट परिस्थिती असूनही लोकप्रतिनिधी व संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालकांतून संताप व्यक्त होत आहे.

गंगथडीपट्ट्यातील गावांसह कुकाणे परिसरातील गावांना अहिल्यानगरला जाण्या-येण्यासाठी कुकाणे ते घोडेगाव २३ किलोमीटरचा जवळचा रस्ता आहे. मात्र, तो खड्डेमय बनल्याने वाहनचालकांचे व प्रवाशांचे हाल होत आहेत. रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे. कुकाणे-देवगाव या सहा किलोमीटर डांबरी रस्त्यावर आता खड्ड्यांची साखळी तयार झाली आहे. हे अंतर पार करताना वाहनचालकांची दमछाक होत आहे. पुढे देवगाव ते फत्तेपूर, कौठा ते चांदे हा डांबरी रस्ताही ठिकठिकाणी उखडला आहे. पुढे चांदे ते घोडेगाव या पाच किलोमीटर रस्त्याची स्थिती देखील कुकाणे-देवगाव सारखीच झाली असल्याने या रस्त्यावर प्रवास नको झाला असून, त्याची दुरुस्ती त्वरित करण्याची मागणी होत आहे.



**कुकाणे :** कुकाणे-घोडेगाव रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे.

(छायाचित्र : रवींद्र सरोदे)

> “ या रस्त्यावर दोन वर्षांत तीन वेळा प्रशासनाकडून खड्डे बुजविण्यात आले आहेत. त्यामुळे खड्डे जैसे थेच असल्याने लाखो रुपये खर्च नेमका केला कशावर, असा प्रश्न आहे. लोकप्रतिनिधीही बघ्याची भूमिका घेतात. नेमका याचा अर्थ काय घ्यावा? त्यामुळे संबंधित अधिकारी, ठेकेदारांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी.
>
> **- संदीप देशमुख,** सरपंच, अंतरवाली

सकाळ

# मरणानंतरही अकोलेकरांच्या नशिबी नरकयातना

## शवविच्छेदनगृह नसल्याने नातेवाईकांना सहन करावा लागतोय मनस्ताप

■ शांताराम काळे : सकाळ वृत्तसेवा

**अकोले, ता. १७ : अकोले शहरातील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनगृह नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बालिकेचा मृतदेह हातावर घेऊन नातेवाईकांना कोतूळ येथे दारोदारी भटकावे लागले. एकुलत्या एक लेकीचा मृत देह हातावर घेऊन तो चाळीस किलोमीटर नेताना या कुटुंबाला किती यातना सहन कराव्या लागल्या असतील, हे प्रशासनास कधी कळणार? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.**



अकोले तालुक्याचे ठिकाण असल्याने प्रशासकीय आणि विविध कामांसाठी आणि उपचारासाठी ग्रामस्थ येथे येत असतात. मात्र, येथे आरोग्य सुविधांची वानवा असल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन कक्ष नसल्याने मृतदेह राजूर किंवा कोतूळ येथे न्यावा लागतो. शारीरिक तपासणी अहवाल महत्त्वाचा असल्याने तो मिळविण्यासाठी मृतदेह पंचवीस ते चाळीस किलोमीटर न्यावा लागतो. त्यातच संबंधित ठिकाणी वैद्यकीय अधिकारी नसेल, तर मृतांच्या नातेवाईकांना थांबावे लागते. वैद्यकीय अधिकारी उपस्थित असले, तर शवविच्छेदन करणारा कर्मचारी उपलब्ध नसतो. त्यामुळे नातेवाईकांना तात्कळत थांबावे लागते.

तालुक्यात २००० कोटी रुपये विकासकामांसाठी आले, असे सांगितले जाते. मात्र, शवविच्छेदनासाठी मृतांच्या नातेवाईकांना दारोदार भटकावे लागत असेल, या कोटीच्या कोटी उड्डाणांचा काय फायदा? असा सवाल केला जात आहे.

अकोले ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब मेहेत्रे यांच्या काळात २०० पर्यंत असलेली ओपीडी आज १५ वर आली आहे. रुग्णालय सुगाव येथे हलविण्यात आले आहे. सात किलोमीटरवर जाण्यास कोण धजावत नाही, तर अपघात घडल्यावर अकोले परिसरातील नागरिक अकोलेऐवजी संगमनेर गाठतात. सिव्हिल सर्जन यांनी याबाबत पावले उचलून अकोले येथे शवविच्छेदनगृह सुरू करण्याची मागणी होत आहे.

### कर्मचाऱ्यांची कमतरता

■ अकोले रुग्णालयाच्या इमारतीचे काम सुरू असून, कर्मचारीही कमी आहेत. सरकारी दवाखान्याची जुनी इमारत पडली असून, आरोग्य विभागाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्याचा त्रास रुग्णांना सहन करावा लागत आहे.

“नव्याने उपजिल्हा रुग्णालयाची इमारत बांधकाम सुरू झाले असून, दीड वर्षात हे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर शवविच्छेदनगृह होईल. तोपर्यंत राजूर किंवा कोतूळ येथेच शवविच्छेदन करावे लागणार आहे. अकोले ग्रामीण रुग्णालय तात्पुरते सुगाव येथे रुग्णांच्या तपासणीची सोय केली आहे.

\- **डॉ. बाळासाहेब मेहेत्रे**, वैद्यकीय अधिकारी, अकोले ग्रामीण रुग्णालय

**दै.प्रभात** **दि.१८ डिसेंबर,२०२५**

प्रभात

# दहा दिवसांत बिबट्यांचा बंदोबस्त करा

## वन अधिकाऱ्यांना तंबी; पारनेरच्या युवकांचे वनविभागात आंदोलन

**पारनेर, दि. १७ (प्रतिनिधी)** - पारनेर शहर परिसरात वाढत्या वस्त्यांवर दहशत निर्माण करणारे व महिलांवर हल्ले करणाऱ्या बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अन्यथा पुढील दहा दिवसानंतर पारनेर शहर बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पारनेरमधील युवकांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिला.

पारनेर शहर व परिसरात बिबट्याची दहशत सुरूच असून दोन दिवसांत दोन महिलांवर हल्ले केले आहेत. तरी वनविभागाने याकडे दुर्लक्ष केले असून पारनेर शहरातील व परिसरात तातडीने पिंजरे लावावे, ट्रॅप कॅमेरा लावावे, वनविभागाच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, पिंजरे आणण्यासाठी लोकांना पैसे मागणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, तालुक्यातील सर्व वन कर्मचारी यांची यादी व मोबाईल नंबर जाहीर करावे, पारनेर तालुका नियंत्रण कक्ष तयार करून त्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची ड्युटी लावावी, यासाठी तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी पारनेरमधील युवकांचे वतीने बुधवारी सकाळी आंदोलन करण्यात आले.

**..अन्यथा पारनेर शहर बंद**



यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे यांनी पिंजरा लावण्यासाठी नागपूरहून परवानगी लागते, पिंजरा आणण्यासाठी आम्हाला पैसे नाहीत, निधी नाही. बाकी गावातील सरपंच मदत करतात, तुम्ही वाहनांचे सहकार्य करा, असे सांगितले. माजी नगरसेवक विशाल शिंदे, भाजपचे मंडल सरचिटणीस कल्याण थोरात, खादी ग्रामोद्योग संघाचे संचालक सतिश म्हस्के, अण्णा सोबले, अशोक औटी, बबलू दावभट, किशोर आढाव यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. वन अधिकारी धाडे यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केला. यावेळी धाडे निरुत्तर झाले. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख निलेश खोडदे, वकील गणेश कावरे यांनीही बिबट्याचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी वनविभागाची असल्याचे सांगितले. यावेळी संतप्त आंदोलकांनी दहा दिवसांत बिबट्याचा बंदोबस्त करा, अन्यथा पारनेर शहर बंद ठेवण्याचा इशारा दिला. यावेळी अधिकारी धाडे यांनी पारनेरमधील पारनेर पब्लिक स्कूलजवळील शेतात, सेनापती बापट तलाव, समर्थनगर येथे पिंजरे लावले असल्याची माहिती दिली. आणखी पिंजरे लावण्यात येतील, असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

पारनेर नगरपंचायतने परिसरात पिंजरे लावण्यासाठी ठराव वनविभागाला दिल्याचे नगराध्यक्षा डॉ.विद्या कावरे, पाणीपुरवठा सभापती योगेश मते, अर्जुन भालेकर यांनी सांगितले. यावेळी विजय दावभट, महेंद्र बोरुडे, तुकाराम बोरुडे, श्रीकृष्ण औटी, अनिस शेख, नितीन दावभट, शेखर हांडे, गणेश औटी, तुकाराम बोरुडे, समीर शेख, योगेश औटी, गणेश पोपट औटी, विष्णू भिसे, संतोष वाटमारे, इंद्रजित देशमुख, अमित जाधव, बबन औटी, प्रदीप औटी उपस्थित होते.

### आ.दाते यांनी दिल्या सूचना

पारनेर वनविभागात आंदोलन सुरू असताना आ.काशिनाथ दाते यांनी आंदोलनाची माहिती घेतली व पारनेरमध्ये तातडीने पिंजरे उपलब्ध करून देण्याच्या सूचना वन अधिकारी यांना केल्या.

पारनेर वनविभागाच्या वतीने नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा, त्यात प्रत्येकी एकाची नेमणूक करून बिबट्या बाबतीत येणारी माहिती घेऊन उपाययोजना करावी. निधी बाबतीत प्रश्न वनमंत्री गणेश नाईक, आ.काशिनाथ दाते, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे यांच्याकडे उपस्थित करू.

**कल्याण थोरात**, भाजपा पारनेर तालुका मंडल चिटणीस.

पारनेर शहरातील अनेक भागात मोठ्या प्रमाणावर बिबट्यांची दहशत सुरू असताना वन विभागाने दुर्लक्ष का केले? उपाययोजना का केल्या नाहीत? आम्ही वरिष्ठ पातळीवर जाऊन हे प्रश्न मांडणार आहे.

**निलेश खोडदे,** शिवसेना उपजिल्हाप्रमुख.

Ahilyanagar Edition
Dec 18, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com

दै.दिव्य मराठी दि.१८ डिसेंबर,२०२५

**लालफितशाही** लॅपटॉप, प्रिंटरसाठी तलाठ्यांचा कामावर बहिष्कार, 3 दिवसांत ६3 हजार लाभार्थींना फटका

# ९ वर्षांपूर्वीच्या 'लॅपटॉप'मुळे फेरफार, सातबारा कामांना ब्रेक

प्रतिनिधी | अहिल्यानगर

नवीन लॅपटॉप, प्रिंटर द्यावेत या मागणीसाठी जिल्ह्यातील तलाठ्यांनी सोमवारपासून (१५ डिसेंबर) ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार घातला. त्यामुळे गेल्या ३ दिवसांत ऑनलाईन सातबारा, फेरफार न मिळाल्याने जिल्ह्यातील ६३ हजार लाभार्थींना त्याचा फटका बसला. ग्रामीण भागात सातबारा, फेरफार न मिळाल्याने जमिनीसंबंधी व्यवहार ठप्प झाले. तलाठ्यांकडे सध्या ऑनलाइन सातबारा नोंदणी, फेरफार, डिजिटल सातबारा, ई-पीक पाहणी, नुकसानीचे पंचनामे, विविध योजनांची अंमलबजावणी हे कामे आहेत. मात्र कालबाह्य झालेल्या लॅपटॉपवर त्यांना ही कामे करावी लागतात.त्यामुळे लाभार्थींना वेळेत सातबारा, फेरफार देण्यास दिरंगाई होते. त्यामुळे नवीन लॅपटॉपसाठी हे आंदोलन सुरू केले आहे. उर्वरित पान ४

**दिव्य मराठी एक्सपर्ट**

संकेत शाह , संगणक तज्ज्ञ

## सॉफ्टवेअरप्रमाणे हार्डवेअरही अपग्रेड असावे

२०१७ च्या तुलनेत आताच्या लॅपटॉप आणि संगणकांत प्रचंड अपग्रेडेशन झाले आहे. आय-३, आय-५, आय-७, आय-९ असे प्रोसेसर आहेत. या प्रोसेसरमध्ये १३ वी जनरेशन सुरू आहे. तलाठ्यांना मिळालेल्या लॅपटॉपमध्ये सॉफ्टवेअरचे अपग्रेडेशन झाले. पण हार्डवेअरचे अपग्रेडेशन झाले नसल्याने सिस्टिम सॉफ्टवेअरला सपोर्ट करत नसावी. अशावेळी लॅपटॉपची गती कमी होण्याचे प्रमाण वाढू शकते. यात सॉफ्टवेअरप्रमाणे सपोर्ट सिस्टिमही अपग्रेड असणे आवश्यक असते.

## लॅपटॉपची गॅरंटी तीन वर्षांपूर्वीच संपली

*राज्य सरकारने २०१७ मध्ये तलाठ्यांसाठी लॅपटॉप दिले. आता २०२५ वर्ष उजाडत आहे. ज्या कंपनीचे हे लॅपटॉप देण्यात आले होते ते देखील निकृष्ट दर्जाचे होते. त्या 'लॅपटॉप'चा वेग अत्यंत कमी असल्यामुळे कामकाजात व्यत्यय येत आहे. लॅपटॉपची पाच वर्षांची गॅरंटी होती. गॅरंटी उलटूनही ३ वर्षे झाली. दुरुस्तीसाठी दुकानात गेल्यानंतर ते दुरुस्त होणार नसल्याचे सांगितले जाते.*

– **प्रशांत हासे,** जिल्हाध्यक्ष, तलाठी संघटना, अहिल्यानगर.

## ८८५ तलाठी, मंडलाधिकाऱ्यांकडे फक्त 300 लॅपटॉप

जिल्ह्यात नवीन व जुने असे ७५० तलाठी आहेत. तर १३५ मंडलाधिकारी आहेत. ८८५ तलाठी, मंडलाधिकाऱ्यांकडे केवळ ३०० लॅपटॉप आहेत. अनेकदा तातडीने शेतकऱ्यांना गहाण खत करण्यासाठी फेरफार लागतो. मात्र अनेकदा 'लॅपटॉप' वरील कामाचा वेग मंदावलेला असतो, त्यातच अनेकदा प्रिंटर सुरू होत नाही. त्यामुळे नाईलाजाने आम्हाला त्या शेतकऱ्यांना नंतर या असे उत्तर द्यावे लागते.

**इनसाइड स्टोरी**

## खरेदीचे धोरण काही ठरेना

तलाठ्यांनी निवडणुकीचे व ऑफलाइन काम सुरू ठेवले आहे. मात्र पुढच्या दोन दिवसात सरकारने लॅपटॉप देण्याबाबत निर्णय घेतल्यास संपूर्ण काम बंद आंदोलन केले जाईल, असा इशारा दिला आहे. बहिष्कार आंदोलनासाठी डीएसपी (डिजिटल स्वाक्षरी) चे डोंगलदेखील तलाठ्यांनी प्रशासनाकडे जमा केले. तलाठ्यांकडून एक सातबारा, किंवा फेरफार दिल्यानंतर संबंधित व्यक्ती १५ रुपये जमा करते, त्यातील ५ रुपये ही रक्कम जमाबंदी आयुक्तांच्या खात्यात जमा होते. त्यामुळे हे लॅपटॉप खरेदी कुठल्या यंत्रणेकडून करायचे याचर काही ठरत नसल्याने नवीन लॅपटॉप खरेदी मागे पडली आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री
E-pepar - 18 Dec 2025 - Page 7

# श्रीगोंद्यात पनीरच नाही, तूप-खवा-मावाही भेसळयुक्त !

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** :तालुक्यातील विविध ठिकाणी भेसळीचे साम्राज्य माजले असून त्यात दुग्धजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात अग्रेसर आहेत .त्यामुळे श्रीगोंद्यात चवीने खाणाऱ्याच्या विमानाला मात्र भेसळीचे इंधन असल्याचे खुलेआम बोलले जात आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील विविध ठिकाणी दुग्धजन्य पदार्थ बनविले जात आहेत श्रीगोंदा तालुक्यासह शहरात शुद्धतेचा बाजार म्हणायचा आणि हातात येते ती भेसळ अशीच अवस्था सध्या दुग्धजन्य पदार्थांची झाली आहे. पनीरपासून तूप, खवा, मावा पण भेसळ कायम! ग्राहकांच्या ताटात पोषणाऐवजी संशय उतरतोय, ही वस्तुस्थिती.जुन्या काळी गावात दूध म्हणजे विश्वास, खवा म्हणजे परंपरा. आज मात्र केमिकलचा स्वाद, कृत्रिम रंग आणि साठवणुकीचा घातक खेळ सर्रास सुरू आहे. चव ठीक आहे इतक्यावर समाधान मानायचे दिवस गेले; आता प्रश्न थेट आरोग्याचा आहे. लहान मुलं, वृद्ध, रुग्ण सगळ्यांच्याच तब्येतीशी हा उघड उघड जुगार.प्रशासनाची तपासणी कागदावर, कारवाई घोषणांपुरती; बाजारात मात्र भेसळ निर्धास्त. ग्राहक फसतोय, व्यापारी मोकाट हा समीकरण बदलणार कोण? अन्न व औषध प्रशासनाने अचानक नमुना तपासणी, दोषींवर कडक दंड आणि परवाने रद्द हे शब्द नव्हे, कृती हवी.सरळ सांगायचं तर, श्रीगोंद्याला शुद्धतेची मोहीम हवी. परंपरेचा मान राखत आधुनिक तपासणी, पारदर्शक कारवाई आणि ग्राहक जागृती हे तिन्ही चाके एकत्र फिरली, तरच तूप तूप राहील, खवा खवाच राहील. नाहीतर नाव बदलतील, भेसळ मात्र कायम राहील.त्यामुळे श्रीगोंदयात चवीने खाणाऱ्याच्या विमानाला मात्र भेसळीचे इंधन असल्याचे खुलेआम बोलले जात आहे. रेस्ट हाऊसला बनवला जातोय खवा मावा तूप श्रीगोंदा तालुक्यात राजधानीशी निगडीत असलेल्या एका नेत्याच्या अतिथी गृहात बिहारी कर्मचारी बनावट तूप, खवा ,मावा यासारखे अनेक पदार्थ बनविले जात असल्याची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे मात्र राजकिय आश्रय असल्यामुळे कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे.

**बनावट पनीरचे साहित्य येते कोठून ?**

बनावट पनीर तयार करण्यासाठी दूध पावडर पाम तेल चीज यासारख्या अनेक वस्तू शेजारील राज्यातून आयात केले जात असून त्याचा पुरवठादार राजकीय नेत्याशी संलग्न असल्याची माहिती मिळत असल्यामुळे नेत्याच्या आशीर्वादानेच जनतेच्या जीवाशी खेळ सुरु आहे कि काय ? असा प्रश्न उपस्थित केला आहे

**अन्न औषध विभाग करतोय काय ?**

नागरिकांना अन्न सुरक्षा विभाग अन्नाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि उपलब्धता सुनिश्चित करण्याचे काम करतो ज्यात अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण, विक्री आणि आयातीसाठी मानके ठरवणे, कायद्यांची अंमलबजावणी करणे, नियमन करणे आणि 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा' अंतर्गत लोकांना अनुदानित धान्याचा पुरवठा करणे यांचा समावेश होतो, जेणेकरून प्रत्येक नागरिकाला पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न मिळेल. मात्र हे सर्व कागदावरच राहिले आहे असे म्हणणारे वावगे ठरणार नाही.

लोकमत

# शेतकऱ्यांकडून खर्डा उपकेंद्राला टाळे

लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : येथील ३३ केव्ही सबस्टेशनमधील शेतीला वीजपुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर १७ दिवसांपूर्वी नादुरुस्त झाल्याने परिसरातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाणी देता येत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी बुधवारी (दि.१७) खर्डा सबस्टेशनवर मोर्चा काढून कार्यालयाला टाळे ठोकले. परिणामी, खर्डा शहराचाही वीजपुरवठा काही काळासाठी बंद पडला.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे म्हणाले, ट्रान्सफॉर्मर जळाल्यापासून वारंवार वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नवीन ट्रान्सफॉर्मरची मागणी करण्यात आली होती. मात्र, अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. तब्बल १७ दिवस उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही.

'ग्रीन व्हॅली' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खैरी मध्यम प्रकल्प व गोपाळवाडा तलाव परिसरातील खर्डा, सातेफळ, बाळगव्हाण, वाकी, लोणी, वंजारवाडी या लाभक्षेत्रातील वीजपुरवठा पूर्णतः खंडित आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, ऊस व फळबागांना पाणी देण्याची वेळ असताना, वीज नसल्याने पिके सुकण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. परिसरातील प्रमुख पीक उत्पादक हे ऊसधारक आहेत. यावर्षी पाण्याची उपलब्धता असूनही केवळ वीजपुरवठ्याअभावी शेती धोक्यात आली आहे. संतप्त आंदोलक सबस्टेशनवर आले असता, कोणतेही अधिकारी उपस्थित नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांनी कार्यालयालाच टाळे ठोकले. त्यानंतर वीज वितरण कंपनीने पोलिसांची मदत घेतली. दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करून रस्त्यावर उतरण्याचा इशारा सुनील लोंढे यांनी दिला आहे. आंदोलनात बाळगव्हाणचे सरपंच सचिन शिकारे, सातेफळचे सरपंच आश्रु खुपसे, दादा पाटील, बाळासाहेब धोत्रे, कैलास शिकारे, सुनील मिरगे, संदीप शिकारे, दत्ता भुते, शेषराव भोसले, सुरज लोंढे, सुनील ढेरे, कालिदास भांडवलकर, हनू कोळेकर आदी उपस्थित होते.

**यावर्षी पाण्याची उपलब्धता असूनही केवळ वीजपुरवठ्याअभावी शेती धोक्यात आली आहे.**

## पोलिसांच्या मध्यस्थीने चर्चा

खर्डा पोलिस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल संभाजी शेंडे व कॉन्स्टेबल बाळासाहेब खाडे यांच्या मध्यस्थीने चर्चा झाली. अडीच तासांच्या खंडित वीजपुरवठ्यानंतर सहाय्यक अभियंता प्रशांत शिंदे यांनी दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर कार्यालयाचे टाळे उघडण्यात आले.

# जिल्हा धुळे

सकाळ



पिंपळनेर : पोलिस ठाण्याच्या परिसरात नागरिकांनी केलेली गर्दी.

# पोलिसांच्या ताब्यातून संशयित फरारी

## पिंपळनेरमध्ये नागरिकांच्या संतापाचा उद्रेक

■ सकाळ वृत्तसेवा

**पिंपळनेर, ता. १७ : शहरात विद्यार्थिनींच्या छेडछाडप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यातील दोन संशयित आरोपी पोलिसांच्या ताब्यातून फरारी झाल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ बल्हाणे गावातील पालक, महिला, युवकांनी पिंपळनेर पोलिस ठाण्याला घेराव घालत पोलिस प्रशासनाला जाब विचारला.**

विद्यार्थिनींच्या छेडछाडप्रकरणी संशयित आरोपी विशाल अर्जुन भामरे व सुधीर जयसिंग पवार हे दोघे पोलिसांच्या ताब्यात होते. मात्र, संशयित त्यांच्या चारचाकी व दुचाकी वाहनांसह फरारी झाल्याची माहिती समोर आली. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. संशयित आरोपी ताब्यात असताना कसे काय पळून गेले, असा प्रश्न उपस्थित करीत पालकांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. दरम्यान, गेल्या तीन दिवसांपासून पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक किरण बर्गे रजेवर असल्याने निजामपूर येथील प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक भामरे व साक्रीचे पोलिस निरीक्षक दीपक वळवी यांनी परिस्थिती हाताळली. नागरिकांना समजावून सांगताना त्यांनी संशयित आरोपींच्या शोधासाठी तीन स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली असून, लवकरच त्यांना बेड्या ठोकल्या जातील, असा विश्वास त्यांनी दिला.

या प्रकरणात विशाल अर्जुन भामरे, सुधीर जयसिंग पवार, चंद्रकांत विजय निकुंभ यांच्यासह राहुल भामरे व गणेश सुपेकर या पाच जणांविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोक्सोसारखा गंभीर गुन्हा दाखल होऊनही आरोपी फरारी झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

■ **शहरात वाढत्या रोडरोमिओंच्या घटनांमुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दामिनी पथकाच्या निष्क्रियतेवरही पालकांनी प्रश्न उपस्थित करीत शाळा व कॉलेज परिसरात कायमस्वरूपी पोलिस गस्त, तातडीची अटक व ठोस कारवाईची मागणी केली आहे. विद्यार्थिनींची सुरक्षितता ही केवळ आश्वासनांपुरती न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिसावी, अशी ठाम भूमिका नागरिकांनी व्यक्त केली.**

Dhule, Dhule-Today
18/12/2025 Page No. 4

सकाळ

# बिबट्याच्या हल्ल्यात तीन शेळ्या ठार

## शेवाळीतील कांदाचाळीत घुसून हल्ला; वन विभागाकडून पंचनामा

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. १७ : शेवाळी (दा.) (ता. साक्री) येथील साक्री- धुळे रस्त्यालगतच्या शांतिवान शाळेच्या मागील परिसरात बिबट्याने धुमाकूळ घालत तीन शेळ्या फस्त केल्याची घट ना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी होत आहे.

शेवाळी येथील शेतकरी संभाजी लक्ष्मण साळुंके हे आपल्या परिवारासह शेतातच वास्तव्यास आहेत. मंगळवारी रात्री त्यांनी आपल्या शेळ्या नेहमीप्रमाणे कांदा चाळीत बांधल्या होत्या. मध्यरात्री बिबट्याने चाळीचे लोखंडी तार उचकटून आत प्रवेश केला असण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. या वेळी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दोन शेळ्या जागीच ठार झाल्या, तर एक शेळी बिबट्या ओढून घेऊन गेला.



बुधवारी (ता. १७) सकाळी श्री. साळुंके चाळीकडे गेले असता हा प्रकार दिसून आला. या घटनेची माहिती त्यांनी तत्काळ वन विभागाला दिली असता वर्धाने व महिर येथील वनपालांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या परिसरात अनेक शेतकरी कुटुंबांसह वास्तव्यास असून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे सावट आहे. वनविभागाने या ठिकाणी तातडीने पिंजरा लावून नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी श्री. साळुंके यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

सकाळ



**धुळे** : मागण्यांसाठी अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांना निवेदन देताना महसूल कर्मचारी संघटनांचे शिष्टमंडळ.

# बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

## प्रलंबित मागण्यांप्रश्नी जिल्ह्यातील महसूल कर्मचारी संघटित

■ **सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. १७ : महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघाने १९ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन केले जाईल. तसे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे बुधवारी (ता. १७) जिल्हा प्रशासनाला देण्यात आले.

महसूलमंत्री हे अधिकारी आणि कर्मचारी यांचे विनाचौकशी निलंबन करत आहेत. तसेच महसूल विभागाच्या दीर्घकालीन प्रलंबित असलेल्या आर्थिक व सेवाविषयक मागण्यांचा निपटारा झालेला नाही. यामुळे महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर हे कामबंद आंदोलन होत आहे.

आंदोलनात जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी सहभागी होतील. निवडणूक व जनगणना संबंधित कामकाज वगळता इतर सर्व कामकाज ठप्प राहणार आहे, अशी माहिती जिल्हा महसूल सेवक संघटनेचे अध्यक्ष समाधान सूर्यवंशी, जिल्हा तलाठी संघटनेच्या अध्यक्ष स्वाती वाघ, जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुरेश पाईकराव यांनी दिली. संजय पवार, आर.के. मगर, विश्वनाथ चौधरी, नितीन भोजने, बसंती पाडवी, एन.व्ही. पाटील, आर. पी. सोनवणे, दीपक हटकर, अविनाश सोनकांबळे, संजय शिंदे, मनोज पाटील उपस्थित होते.

Dhule, Dhule-Today
18/12/2025 Page No. 1

दै.लोकमत                                                                                    दि.१८ डिसेंबर,२०२५

लोकमत
जळगाव, गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५

# धुळ्यातील मोहाडी रेल्वे बोगदा ठरतोय 'पांढरा हत्ती'

## चुकीच्या आराखड्यामुळे रेल्वेचे लाखो रुपये पाण्यात? गुडघाभर साचलेल्या पाण्यामुळे वाहतूक ठप्प, केदार सिटी बोगद्यातही तशीच आहे परिस्थिती

लोकमत घटनास्थळी

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : भुसावळ रेल्वे प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका पुन्हा एकदा धुळेकर नागरिकांना बसत आहे. मोहाडी येथील रेल्वे फाटक बंद करून त्या ठिकाणी दोन वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला भुयारी बोगदा आता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरला आहे. तसाच प्रकार केदार सिटी भुयार बोगद्यातही निर्माण होत आहे. जमिनीतून होणाऱ्या पाण्याच्या पाझरामुळे या बोगद्यात सतत गुडघाभर पाणी साचत असून, यामुळे वाहतुकीवर परिणाम होत आहे. रेल्वेच्या चुकीच्या आराखड्यामुळे हा प्रकल्प केवळ 'पैशांचा अपव्यय' ठरत असल्याची संतप्त भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

दोन वर्षांपूर्वी रेल्वे प्रशासनाने मोहाडी रेल्वे फाटक सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद केले आणि त्याऐवजी भुयारी मार्गिका तयार केली. मात्र, या बोगद्याच्या निर्मितीवेळी भौगोलिक परिस्थितीचा आणि जमिनीखालील पाण्याच्या पातळीचा विचारच केला नसल्याचे समोर येत आहे. सद्य:स्थितीत जमिनीतून मोठ्या प्रमाणावर पाणी पाझरत असल्याने बोगद्यात तळे साचत आहे. हे पाणी काढण्यासाठी रेल्वे प्रशासनाला दरमहा डिझेल पंपांचा आधार घ्यावा लागत असून, त्यावर लाखो रुपयांचा खर्च होत आहे.

विशेष म्हणजे पाणी काढण्यासाठी नियुक्त केलेला ठेकेदार वेळेवर हातपंप लावत नसल्यामुळे, मंगळवारी सायंकाळी येथील वाहतूक ठप्प झाल्याचा प्रकार घडला.

दरम्यान, दोन वर्षांपासून या त्रासाबाबत अनेकदा रेल्वे प्रशासनासह शहरातील लोकप्रतिनिधींकडे तक्रार करण्यात आल्या. मात्र, कुणालाही या समस्येशी काही घेणे-देणे नाही. अशा प्रकार समस्येकडे दुर्लक्ष झाले असल्याची खंत या नागरिकांनी बोलून दाखविली.



मोहाडी उपनगराकडे जाणाऱ्या भुयारी बोगद्यात तुंबलेले पाणी. छाया : विजय डोंगरे

केदार सिटीकडे जाणाऱ्या बोगद्यात तुंबलेले पाणी. इन्सेट : बोगद्याच्या भिंतींतून पाझरत असलेले पाणी.

### केदार सिटी बोगद्यातील वाहतूक मंगळवारी बंद

१ रेल्वे स्टेशनच्या बाजूकडील मिल परिसरात व केदार सिटीकडे जाण्यासाठी रेल्वे प्रशासनाने या ठिकाणीदेखील भुयारी बोगदा बांधला आहे. मात्र, या ठिकाणीदेखील बोगद्यात जमिनीतील पाणी पाझरत आहे.

२ मंगळवारी सायंकाळी संबंधित ठेकेदाराने बोगद्यातील तुंबलेले पाणी डिझेलपंपद्वारे बाहेर काढले. त्यामुळे गुडघ्यापर्यंत पाणी तुंबल्यामुळे या ठिकाणची वाहतुक ठप्प झाली होती. याबाबत धुळे रेल्वे स्टेशनचे प्रबंधक यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर रात्री अकरा बोगद्यातील पाणी बाहेर काढण्यात आले.

"या ठिकाणी सुरूवातीपासून बोगद्यात पाणी पाझरत असल्यामुळे, पाणी तुंबत असते. पाण्यामुळे प्रचंड शेवाळ तयार वाहने घसण्याचे प्रकारही घडत आहेत. चुकीच्या पद्धतीने काम केल्यामुळे, याचा त्रास वाहनधारकांना भोगावा लागत आहे. या कामाची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच या समस्येचा कायमस्वरूपी निपटारा होणे गरजेचे आहे.

**अमोल दुसाने,** स्थानिक रहिवाशी मोहाडी उपनगर

**१ लाख**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बोगद्यातील पाणी बाहेर काढण्यासाठी रेल्वे प्रशासन संबंधित ठेकेदाराला महिन्याला एक लाख रूपये डिझेलच्या खरेदीसाठी देत आहे. तर ठेकेदार रेल्वेकडून पैसे मिळाल्यावरच पाणी काढत आहे.

**बोगद्याच्या कामाची सखोल चौकशीची मागणी**

"

### वरिष्ठांना माहिती दिली

केदार सिटी बोगद्यातील तुंबलेले पाणी ठेकेदाराने वेळेत बाहेर न काढल्यामुळे मंगळवारी सायंकाळी बोगद्यात मोठ्या प्रमाणावर पाणी तुंबले होते. त्यामुळे वाहतूक ठप्प झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून आल्या होत्या. याबाबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर, रात्री पाणी बाहेर काढण्यात आले.

**संतोष जाधव,** स्टेशन प्रबंधक, धुळे

### रहिवाशी नागरिकांना दीड किलोमीटरचा पडतो फेरा

बोगद्यात पाणी साचल्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहने येथून जाऊ शकत नाहीत. परिणामी, मोहाडी परिसरातील रहिवाशांना आपल्या कामासाठी शहरात येताना तब्बल दीड किलोमीटरचा वळसा घालून जावे लागत आहे. शाळेची मुले, नोकरदार आणि रुग्णवाहिका यांना याचा मोठा फटका बसत आहे.

"तांत्रिक बाबींच्या अपूर्णतेमुळे रेल्वेच्या भुयारी बोगद्यात पाणी पाझरण्याची शक्यता आहे. याबाबत मी अधिक माहिती घेऊन, त्यावर उपाययोजना करण्याच्या सुचना संबंधितांना देतो. लवकरच प्रश्न मार्गी लावला जाईल.

**पुनीत अग्रवाल,** विभागीय वाणिज्य प्रबंधक (डीआरएम), भुसावळ रेल्वे विभाग

### तर रेल्वे फाटक पुन्हा सुरू करा, रहिवाशांची मागणी

रेल्वे प्रशासनाने सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर रेल्वे फाटक बंद करून, या ठिकाणी भुयारी बोगदा तयार केला. मात्र, बोगदा तयार झाल्यानंतर सुरूवातीपासून या ठिकाणी पाण्याची समस्या आहे.

**जर तुंबलेले वेळेत काढले नाही. तर वाहतुक ठप्प होते. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने रेल्वे फाटक पुन्हा सुरू करावे, अशी मागणी या भागातील रहिवाशांनी स्टेशन प्रबंधकांकडे केली आहे.**

### तांत्रिक निकालाकडे पूर्णपणे दुर्लक्ष

नागरिकांच्या मते, हा बोगदा बांधताना तांत्रिक निकषांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. 'रेल्वेच्या इंजिनिअर्सनी चुकीचा आराखडा तयार केला आणि ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले, म्हणूनच ही वेळ आली आहे,' असा थेट आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. इतकेच नाही, तर साचलेले पाणी उपसण्याचे कामही ठेकेदाराकडून वेळेवर केले जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

### चौकशी करून कठोर कारवाई करण्याची होतेय मागणी

या संपूर्ण प्रकरणात सरकारी तिजोरीचे नुकसान करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि कामचुकार ठेकेदारावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना निलंबित करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मोहाडी परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

लोकमत

# अलाणे फाटा ठरतोय अपघातांचा केंद्रबिंदू

## रस्त्यावरील काटेरी झाडे काढण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिंदखेडा :** शिंदखेडा-चिमठाणे मुख्य रस्त्यावरील अलाने फाटा सध्या अपघातांचा स्पॉट बनला असून येथील रस्त्यांची भौगोलिक रचना वाहनधारकांसाठी धोकादायक ठरत आहे. एका बाजूला अलाने गावाकडे जाणारा रस्ता व समोर हातनूर रस्ता हे दोन्ही रस्ते खोल पातळीवर असून, तर चिमठाणे-शिंदखेडा मुख्य रस्ता उंचावर आहे. या उंच-खोल रस्त्यांच्या रचनेमुळे तसेच मोठ्या वळणामुळे समोरून येणारी वाहने वेळेत दिसत नाहीत.या दोन्ही फाट्याचे रस्ते ठेकेदाराने मुख्य रोड बरोबर करणे अपेक्षित होते मात्र ते न केल्याने येथे दररोज अपघात होत आहेत

या चौफुलीच्या दुतर्फा काटेरी व मोठ्या झाडांची घनदाट वाढ झाल्याने दृश्यता पूर्णपणे मर्यादित झाली आहे. अलाने व हातनूरकडून येणाऱ्या वाहनचालकांना मुख्य रस्त्यावरील वाहतूक दिसत नाही, तसेच शिंदखेडा-चिमठाणे मार्गावरील वाहनधारकांनाही समोरून येणारी वाहने अंदाजानेच पार करावी लागत आहेत. परिणामी येथे वारंवार अपघात होत असून हा चौफुला अत्यंत धोकादायक ठरला आहे.



## रस्त्यावर असते दिवसभर वाहनांची वर्दळ

या चौफुलीवर दिवसभरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, दुचाकीस्वार, अवजड वाहने तसेच पेडकाई देवीवर जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर होतो व प्रवासी यांची सतत वर्दळ असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. येथे तात्काळ गतिरोधक बसवुन पांढरे पट्टे मारून मुख्य रस्त्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर काटेरी झाडांची छाटणी करणे, स्पष्ट सूचना फलक, रिफ्लेक्टर, रोड मार्किंग करणे अत्यावश्यक आहे.

**स्थानिक वाहनधारक व ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतूक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.**

लोकमत

मस्ट READ

# मका खरेदी केंद्राची मागणी, तहसीलदारांना घेराव

## तहसीलदार नितीनकुमार देवरे यांना दिले निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** शिंदखेडा तालुक्यात मका खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे, प्रशासनाने तत्काळ केंद्र सुरू करावे, यामागणीसाठी तहसील नितीन देवरे यांना उद्धवसेनेने घेराव घातला.

सीसीआय कापूस खरेदीसाठी ऑनलाइन स्लॉट नोंदणी सुरू होताच काही मिनिटांतच फुल दाखवले जात आहेत, ज्यामुळे सामान्य शेतकऱ्यांना स्लॉट मिळणे दुरापास्त झाले आहे. या प्रक्रियेत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जाणवणारी इंटरनेट समस्या, तांत्रिक अडचणी आणि डिजिटल अशिक्षण यामुळे शेतकरी पूर्णतः हतबल झाले आहेत. काही ठराविक एजंट आणि मध्यस्थांना प्राधान्य दिले जात असल्याच्या तक्रारी आहेत ते प्रश्न मार्गी लावा अशी मागणी जिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे, डॉ. कैलास ठाकरे, योगेश पाटील, चंद्रसिंह ठाकरे, प्रवीण पवार, परीक्षित देशमुख, कपिल ठाकूर, सागर देसले आदींनी केली. तत्काळ प्रश्न सुटला नाहीत आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

प्रशासनाने शेतकऱ्यांचा हिताचा विचार करून तत्काळ प्रश्न सोडवा अशी मागणी आहे.



शिंदखेडा तहसीलदार नितीनकुमार देवरे यांच्याशी चर्चा करतांना जिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे, डॉ. कैलास ठाकरे, योगेश पाटील, चंद्रसिंह ठाकरे, प्रवीण पवार, परीक्षित देशमुख आदी.

लोकमत

मस्ट READ

# पैसे भरून पिकांचा विमा काढला, भरपाईचा रुपयाही नाही मिळाला; निकष बदलाने फटका

## सरासरीपेक्षा अधिक पाऊस; खरिपाचे अतोनात नुकसान

लोकमत न्यूज नेटवर्क



**शिरपूर** : नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना भरपाई मिळावी, म्हणून शासनाच्या वतीने प्रधानमंत्री पीकविमा योजना राबविण्यात आली. शिरपूर तालुक्यातील १५९ शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरून पीक संरक्षित केले. दरम्यान, अतिवृष्टी होऊन पिकांचे अतोनात नुकसान झाले. निकषाच्या कचाट्यामुळे मात्र, शेतकऱ्यांच्या हातात अद्यापही रुपयाही आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांतून संताप व्यक्त होत आहे.

**१५९**
शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरून पीक संरक्षित केले.

शिरपूर तालुक्यात गत खरीप हंगामात लवकर पाऊस झाल्याने खरिपाच्या वेळेवर पेरण्या झाल्या होत्या. कापूस पाठोपाठ हरबरा पिकाचा सर्वाधिक पेरा होता. त्यापाठोपाठ मका, तूर, मूग, उडीद पेरा होता. कुठलीही नैसर्गिक आपत्ती कोसळल्यास त्यातून होणाऱ्या नुकसानीची भरपाई मिळावी, म्हणून शासनाच्या वतीने प्रधानमंत्री पीकविमा योजना राबविण्यात आली. दरम्यान, बोगस पीकविमा उतरविण्याचे प्रकार काही ठिकाणी उघडकीस आल्याने शासनाने शेतकऱ्यांच्या हिश्शापोटीची विमा हप्त्याची रक्कम पूर्वीप्रमाणे ठेवली. शिवाय, निकषातही बदल केले. त्यामुळे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

### शेतकऱ्यांचे पैसे वाया ? :

प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत शिरपूर तालुक्यातील अर्जाद्वारे ३२०० हेक्टरवरील पीक संरक्षित केले होते. त्यासाठी लाखोंचा विमा हप्ता भरला होता. नुकसान होऊनही विमा न मिळाल्याने हप्त्याची रक्कम वाया जाणार, अशी भीती आहे.

### खरिपातील बाधित शेतकऱ्यांना दिलासा नाही :

शिरपूर तालुक्यात वार्षिक सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. परिणामी, अतिवृष्टीमुळे तालुक्यात जवळपास १७,४४९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील निकष बदलल्याने नुकसानीपोटी भरपाई मिळाली नाही.

### जुनी योजना लागू करण्याची मागणी :

पूर्वीप्रमाणे एक रुपयात पीकविमा भरण्याची जुनी पीकविमा योजना सुरू करण्यात यावी. त्याचबरोबर पूर्वीप्रमाणे निकष ठेवण्यात यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांतून सातत्याने करण्यात येत आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा आहे.

### पीक कापणी प्रयोगाच्या निकषाने शेतकऱ्यांचा घात केला

नैसर्गिक आपत्ती कोसळली तरी भरपाईसाठी पीक कापणी प्रयोग हा एकमेव निकष शासनाने ठेवला आहे. त्यामुळे पीक काढणीपूर्वी नुकसान होऊनही शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नाही. परिणामी, पीक कापणी प्रयोगाच्या निकषाने शेतकऱ्यांचा घात केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त होत आहे. विशेषत: यंदापासून राज्य शासनाने १ रुपयांत पीकविमा योजना बंद केली आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणे हप्ता भरावा लागला आहे.

दिव्य मराठी, धुळे. गुर

आंदोलन • कापूस खरेदी स्लॉटमधील गैरप्रकार थांबवण्याची मागणी

# सीसीआय कापूस खरेदीत गोंधळ; शिवसेनेने तहसीलवर दिली धडक

प्रतिनिधी | शिंदखेडा

तालुक्यात सीसीआय मार्फत सुरू असलेल्या कापूस खरेदी प्रक्रियेतील ऑनलाइन स्लॉट बुकिंगमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होत असून, मका खरेदी केंद्र नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना आक्रमक निवेदन देण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

स्लॉट बुकिंगमध्ये 'डिजिटल' अडथळा आणि एजंटांचा सुळसुळाट निवेदनात म्हटले आहे की, सीसीआयच्या पोर्टलवर कापूस विक्रीसाठीचे ऑनलाईन स्लॉट उघडताच काही मिनिटांत 'फुल' होतात. इंटरनेटची समस्या आणि तांत्रिक माहितीचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी नोंदणी करू शकत नाही. मात्र, काही ठराविक एजंट आणि मध्यस्थांचे स्लॉट सहज बुक होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा कापूस शेतात किंवा उघड्यावर पडून असून त्याचे वजन व दर्जा घटत असल्याने मोठे आर्थिक नुकसान होत आहे.



तहसीलदार नितीनकुमार देवरे यांना निवेदन देताना शिवसेना पदाधिकारी.

### मका उत्पादक शेतकरी वाऱ्यावर, नाराजीचा सूर

कापसाप्रमाणेच मका उत्पादक शेतकऱ्यांची अवस्थाही बिकट आहे. तालुक्यात अद्याप स्वतंत्र मका खरेदी केंद्र सुरू झालेले नाही. तसेच नोंदणीसाठी दिलेली मुदत अत्यंत अपुरी असल्याने हजारो शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहिले आहेत. शासनाने तात्काळ स्वतंत्र केंद्र सुरू करून नोंदणीला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली आहे.

### शिवसेनेने केलेल्या प्रमुख मागण्या

कापूस खरेदीतील स्लॉट प्रक्रियेची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन किंवा थेट कापूस खरेदी व्यवस्था लागू करावी. शिंदखेडा येथे स्वतंत्र मका खरेदी केंद्र तात्काळ कार्यान्वित करावे. तहसील स्तरावर शेतकरी मदत केंद्र सुरू करून दलालांचा बंदोबस्त करावा.

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा दिला इशारा

प्रशासनाला आंदोलनाचा इशारा यावेळी शानाभाऊ सोनवणे यांच्यासह डॉ. कैलास ठाकरे, योगेश पाटील, चंद्रसिंह ठाकरे, प्रवीण पवार, परीक्षित देशमुख, कपिल ठाकूर, सागर देसले, योगेंद्र गिरासे आदी उपस्थित होते. प्रशासनाने या मागण्यांची तात्काळ दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शानाभाऊ सोनवणे यांनी दिला.

देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
18 Dec 2025 - Page 7

# बल्हाणे ग्रामस्थांचा पिंपळनेर पोलीस ठाण्यात ठिय्या

## फरार आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी; आणखी दोघांसह इतरांवर गुन्हा: २ अटकेत

■ पिंपळनेर । वार्ताहर

येथे टवाळखोरांनी महाविद्यालयीन तरुणीची छेड काढल्याच्या गंभीर घटनेचे तीव्र पडसाद मंगळवारी उमटले. बल्हाणे गावातील महिला, पुरुष व युवकांनी पिंपळनेर पोलीस ठाण्याला घेराव घातला. जोपर्यंत या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत पोलीस ठाणे सोडणार नाही, असा ठाम पवित्रा नागरिकांनी घेतला होता. दरम्यान याप्रकरणी पिंपळनेर पोलिसात टवाळखोरांसह आणखी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे.



या प्रकरणात संशयीत आरोपी पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या ताब्यात असताना तसेच घटनेत वापरलेली वाहने पोलीस ठाण्यात जमा असतानाही आरोपी फरार झाल्याने नागरिक प्रचंड संतप्त झाले होते. विशेष म्हणजे, आरोपी ज्या खोलीतून पसार झाले त्या ठिकाणी पोलीस ठाण्याचा सीसीटीव्ही कॅमेरा कार्यान्वित असतानाही आरोपी कसे फरार झाले, असा गंभीर प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. फरार आरोपींनी पुन्हा संबंधित विद्यार्थिनींचा पाठलाग करत एका वाहनाने कट मारून धमकी दिली. आम्ही पोलीस ठाण्याला हमा देतो, आम्ही बघून घेऊ, अशी दहशत निर्माण करणारी धमकी दिल्याचा आरोप यावेळी नागरिकांकडून करण्यात आला. तसेच विद्यार्थिनींच्या नातेवाईकांना व्हॉट्सपवरून जीवे ठार मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचेही पालकांनी पिंपळनेरचे प्र.एपीआय भामरे यांच्यासमोर कथन केले.

यावेळी एपीआय भामरे यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला असून वाहनाने कट मारून धमकी दिल्याचा तसेच मोबाईलवरून धमकी दिल्याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करून आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच या प्रकरणात कोणताही पोलीस कर्मचारी दोषी आढळल्यास त्यालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे स्पष्ट केले.

दरम्यान, आंदोलनस्थळी साक्री पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिपक वळवी यांनी भेट देत, या गुन्ह्यातील सर्व आरोपी, त्यांचे पाठीराखे व मुख्य सूत्रधार यांच्यासह जर कोणतेही पोलिस कर्मचारी सहभागी आढळले तर त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन नागरिकांना दिले.

दरम्यान याप्रकरणी संशयीत विशाल अर्जुन भामरे, चंद्रकांत विजय निकुंभ, सुधीर जयसिंग पवार यांच्यावर विनयभंगासह पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे. तर आज राहुल भामरे व गणेश सुपेकर व त्यांच्या सोबत इतर दोन ते तीन अज्ञात मुलांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी चंद्रकांत निकुंभ व राहुल भामरे या संशयीतांना अटक केली आहे. फरार आरोपींनाही जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# जिल्हा जळगाव

दै.लोकमत दि.१८ डिसेंबर,२०२५

लोकमत

# बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गावर नवीन बांधकामे करण्यास मनाई

## शासनाकडून अधिसूचना जारी, कामाला मिळाली गती

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जिल्ह्यातील यावल तालुक्यातून जाणाऱ्या बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्ग एनएच-७५३बी (तळोदा ते बुऱ्हाणपूर)च्या महत्त्वाकांक्षी चौपदरीकरण प्रकल्पाच्या कामाला आता गती मिळाली आहे. रस्ते विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, भूमी संपादन अधिनियम २०१३ च्या कलम ३(अ) अंतर्गत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. त्यामुळे या महामार्गावर नवीन बांधकाम करण्यास मनाई करण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे तालुक्यासह संपूर्ण परिसरातील दळणवळण सुलभ होणार असून, उद्योग, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. एनएच-७५३बी महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे यावल तालुक्यासह परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होणार आहे. बुऱ्हाणपूर, फैजपूर आणि तळोदा या औद्योगिक व व्यापारी केंद्रांशी संपर्क अधिक जलद आणि सुरक्षित होणार असल्याने यावल तालुक्याच्या विकासाला एक नवे दालन खुले होणार आहे.

## १३ गावांमध्ये जमीन संपादन प्रस्तावित

फैजपूर विभागाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, तळोदा ते बुऱ्हाणपूर महामार्गाच्या विस्तारीकरणासाठी यावल तालुक्यातील १३ गावांमधील शेतजमीन व इतर क्षेत्र संपादित केले जाणार आहे.

## हक्कात बदल अशक्य

१. अधिसूचना दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजीच भारताच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यानुसार, अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या प्रस्तावित जमिनीवर कोणतेही नवीन बांधकाम करणे, झाडांची तोड करणे किंवा मालकी हक्कात कोणताही बदल करणे यावर प्रशासनाने तत्काळ निर्बंध लादले आहेत.

२. या जमिनी आता 'प्रस्तावित भूसंपादन' म्हणून घोषित करण्यात आल्या असून, पुढील आदेश येईपर्यंत नागरिकांनी व जमीनधारकांनी विशेष दक्षता घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

लोकमत

# शेतकऱ्यांची लूट; प्रशासनाला निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमळनेर :** येथील लामा जिनिंग येथे सुरू असलेल्या सीसीआय केंद्रावर शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी प्रांताधिकारी व तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन दिले आहे.

गेल्या ७ ते ८ वर्षापासून अमळनेर येथे सीसीआय केंद्र बंद होते. नुकतेच केंद्र सुरू झाल्यानंतर उद्घाटनाच्या दिवशी कापसाचे मोजमाप सुरळीत झाले. मात्र दुसऱ्याच दिवसापासून शेतकऱ्यांच्या कापसात कवडी, कचरा अथवा आर्द्रता जास्त असल्याची कारणे सांगून प्रतिक्विंटल ५ ते ६ किलो वजन कपात केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. हे निवेदन प्रा. सुभाष पाटील, सुरेश पाटील, धनगर पाटील, योगेंद्र पाटील, दिनेश पवार, संजय पाटील, रवींद्र देशमुख, महेश पाटील, प्रताप पाटील यांनी सादर केले.

लोकमत

# 'एकल' महिलांच्या सक्षमीकरणासाठी जि.प.चा पुढाकार, ६५५१ जणींची नोंद

## कागदपत्रांच्या पूर्ततेपासून ते रोजगारापर्यंत; सीईओ मीनल करनवाल यांची विशेष मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या विशेष सर्वेक्षणातून जिल्ह्यातील महिलांच्या सामाजिक स्थितीचे एक वास्तव समोर आले आहे. जिल्ह्यात तब्बल ६ हजार ५५१ एकल महिलांची नोंद झाली असून, यामध्ये भुसावळ आणि चाळीसगाव तालुक्यांत सर्वाधिक संख्या आढळली आहे.

या महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आता जिल्हा परिषद प्रशासनाकडून कागदपत्रांची पूर्तता करण्यासह रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. सर्वेक्षणाच्या प्राथमिक निष्कर्षानुसार, जळगाव जिल्ह्यामध्ये एकल महिलांचे प्रमाण विविध तालुक्यांमध्ये भिन्न आहे. भुसावळ आणि चाळीसगाव तालुक्यात सर्वाधिक एकल महिलांची नोंद झाली आहे.

### तालुकानिहाय एकल महिला व समूहाची संख्या

| तालुका | एकल महिला | समूह संख्या | बोदवड | ८७ | ० |
|---|---|---|---|---|---|
| अमळनेर | ३६४ | ० | चोपडा | २३२ | २ |
| यावल | २३८ | ० | रावेर | १९२ | ० |
| भडगाव | १४५ | ० | एरंडोल | २३६ | १४ |
| पाचोरा | ६३४ | १ | भुसावळ | १२६६ | ० |
| जामनेर | १६८ | ३ | मुक्ताईनगर | ११९ | ० |
| पारोळा | २४९ | ३ | जळगाव | १२० | ० |
| चाळीसगाव | ८३२ | १४ | धरणगाव | ३७५ | ५ |

### उमेद अभियानातून रोजगाराची संधी

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून 'उमेद' अभियानांतर्गत या महिलांचे सूक्ष्म सर्वेक्षण करण्यात आले आहे. केवळ कागदपत्रेच नव्हे, तर त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महिलांच्या व्यवसायाच्या शक्यतांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे.

यासह त्यांच्या कौशल्यानुसार लक्ष केंद्रित रोजगार कार्यक्रम राबविणे, उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी विशेष प्रशिक्षण आणि आर्थिक साहाय्य देण्यावर जि.प.चा भर राहणार आहे.

“

जिल्ह्यातील एकल महिलांना सन्मानाने जगता यावे यासाठी हे सर्वेक्षण एक महत्त्वाचे पाऊल आहे. केवळ कागदपत्रे उपलब्ध करून देणेच नव्हे, तर या महिलांना 'उमेद'च्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करणे आमचे ध्येय आहे. सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षणानंतर आता आम्ही त्यांच्या कौशल्य विकासावर आणि रोजगारावर विशेष लक्ष केंद्रित करत आहोत, जेणेकरून त्या स्वावलंबी होतील.

**मीनल करनवाल,** जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी

**एक महिलांच्या संख्येत पाचोरा आणि धरणगावही वर आहेत. या विशिष्ट तालुक्यांमध्येच ही संख्या अधिक का आहे ? याच्या कारणांचा शोध आता जिल्हा परिषदेकडून घेतला जात आहे.**

# धरणामुळे पाणी पातळी वाढली, तरीही तापी पुलाची सुरक्षा वाऱ्यावरच

## वर्षभरात ९ जणांनी केली आत्महत्या, पुलावर तातडीने कठडे आणि संरक्षक जाळी उभारण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**भुसावळ :** भुसावळ शहरालगत वाहणाऱ्या तापी नदीपात्रात अलीकडे अथांग पाणीसाठा दिसू लागला आहे. तब्बल पंचवीस ते अठ्ठावीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शेळगाव बॅरेज पूर्णत्वास आल्याचा हा थेट परिणाम आहे. बॅरेजमुळे तापीचे पाणी अडवले जाऊन त्याचे बॅकवॉटर थेट भुसावळ शहरापर्यंत येऊन पोहोचले आहे. विशेषतः भुसावळहून यावल आणि रावेर परिसराकडे जाणाऱ्या पुलाच्या खालील भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने पाण्याची पातळी कमालीची वाढली आहे.

आतापर्यंत या ठिकाणी पाणी अडवण्याची कोणतीही यंत्रणा नसल्याने तापीचे पाणी वाहून जात होते. मात्र, शेळगाव बॅरेज पूर्ण झाल्यानंतर नदीच्या प्रवाहात बदल होऊन बॅकवॉटर वाढले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित पुलावरील सध्याचे कठडे सुरक्षिततेच्या दृष्टीने अपुरे ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे.

इतर मोठ्या पुलांच्या तुलनेत या पुलावरील कठड्यांची उंची अत्यंत कमी असल्याने वाढलेल्या पाण्याच्या पातळीसमोर ते तोकडे भासत आहेत. पुलावर अत्याधुनिक आणि उंच सुरक्षा कठडे उभारावेत, तसेच आवश्यक खबरदारीची उपाययोजना तातडीने करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे



❝ शेळगाव बॅरेज पूर्ण झाल्यानंतर तापी नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे, याची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली आहे. भुसावळ–यावल पुलाच्या संरचनात्मक सुरक्षिततेबाबत प्राथमिक पाहणी करण्यात आली असून, सध्याच्या कठड्यांची उंची व मजबुती याचा तांत्रिक आढावा घेण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आवश्यक ठिकाणी उंच व अत्याधुनिक सुरक्षा कठडे उभारण्याबाबत वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव सादर केला जाईल.

**चंद्रशेखर तायडे,** विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, भुसावळ

**७ जणांनी** आत्महत्या केली आहे. या सात जणांची नोंद भुसावळ शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर उर्वरित दोघांची नोंद ही फैजपूरला झाली आहे.

**तापी पूल ठरतोय आत्महत्येचा 'स्पॉट'**

❝ नागरिकांनी सेल्फी काढताना किंवा पुलावर थांबत असताना स्वतःच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. पोलिस प्रशासनाकडून नियमित गस्त वाढविण्यात आली असून, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

**उद्धव डमाळे,** पोलिस निरीक्षक, शहर पोलीस ठाणे, भुसावळ

### हद्दीमुळे होतो संभ्रम

भुसावळ – यावल मार्गावरील तापी नदीवरील हा पूल प्रशासकीयदृष्ट्या दोन तालुक्यांच्या हद्दीत विभागलेला आहे. पुलाचा अर्धा भाग भुसावळ तालुक्याच्या हद्दीत येत असून तो भुसावळ शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट आहे, तर उर्वरित अर्धा भाग यावल तालुक्याच्या हद्दीत येत असल्याने तो फैजपूर पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे पुलाच्या मध्यभागी अपघात, आत्महत्येचा प्रयत्न किंवा अन्य घटना घडल्यास नेमकी हद्द कोणाची, यावरून अनेकदा संभ्रम व वाद निर्माण होतात.

### नऊ जणांनी केली आत्महत्या

गेल्या वर्षभरात या पुलावरून तापी नदीपात्रात उडी घेऊन आत्महत्या करण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. शहर पोलीस ठाण्याच्या नोंदीनुसार आतापर्यंत सात जणांनी या पुलावरून उडी घेऊन आत्महत्या केली आहे. तर पुलाचा अर्धा भाग फैजपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असून, त्या ठिकाणी दोन घटनांची नोंद आहे. एकूण नऊ जणांनी या पुलावरून नदीपात्रात उडी घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत.

### एकाने केली होती सेल्फी काढून आत्महत्या

याशिवाय गणेश विसर्जनाच्या वेळी किंवा नदीकाठी कपडे धुण्यासाठी आलेल्या नागरिकांचे पाय घसरून बुडाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. शहर पोलीस ठाण्यात अशा सहा घटनांची नोंद आहे. काही महिन्यांपूर्वी भुसावळ शहरातील एका तरुणाने आत्महत्येपूर्वी पुलावर सेल्फी काढून व व्हिडिओ तयार करून नदीत उडी घेतल्याची धक्कादायक घटना घडली होती.

देशदूत
शिल्पकार विकासाचा...
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
18 Dec 2025 - Page 5

## जळगाव शिक्षण विभागात

# 'गणवेश घोटाळ्या'नंतरही अधिकारी पदावरच?

### लाचखोरी, खोट्या चौकशा व दलालांचे जाळे उघड : तत्काळ निलंबनाची मागणी

**भुसावळ । प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून, गणवेश घोटाळ्यात निलंबित झाल्याचे आरोप असतानाही शिक्षणाधिकारी सौ.कल्पना चव्हाण व वेतन अधिक्षक ईजाज तडवी हे अधिकारी अद्याप पदावर कार्यरत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदार आ.किशोर आप्पा पाटील यांनी दि. १० डिसेंबर २०२५ रोजी शासनाकडे दाखल केलेल्या तक्रारीत, या दोन्ही अधिकाऱ्यांवर खोट्या चौकशा लावणे, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे पगार जाणूनबुजून थांबवणे, आर्थिक पिळवणूक करणे असे गंभीर आरोप केले आहेत. तक्रारीनुसार, या कथित गैरव्यवहारासाठी जळगाव जिल्ह्यातील स्वप्निल पाटील (जळगाव), पंकज पाटील (पाचोरा), सतिश पाटील तसेच शिक्षणाधिकारी सौ.चव्हाण यांचे पती बी.डी.धाडी (विस्तार अधिकारी, भुसावळ) यांच्यामार्फत दलालीचे जाळे उभे करून लाखो रुपयांची वसुली केली जात असल्याचा आरोप आहे. सौ.कल्पना चव्हाण यांनी भुसावळ येथे सुध्दा शिक्षण विभागात कार्य केलेले आहे.

मंत्र्यांनी तक्रारीची गंभीर दखल घेत शालेय शिक्षण मंत्री यांनी प्रमुख सचिव (शिक्षण) यांना तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार आता शासनाकडून पुढील कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आ.किशोर पाटील यांच्याकडून या प्रकरणात तात्काळ चौकशी, करून दोषी आढळल्यास निलंबन, किंवा किमान अधिकार काढून पदावनती (डिमोशन) करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या कथित प्रकारांमुळे जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण असून, कारवाई झाली नाही तर आंदोलनाचा इशारा दिला जात आहे. आता शासन यावर ठोस कारवाई करते की, प्रकरण फाईलपुरतेच मर्यादित राहते, याकडे संपूर्ण शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

#### 'गणवेश घोटाळा' पुन्हा चर्चेत

यापूर्वी गणवेश वितरणातील कथित घोटाळ्यामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली होती. परंतु हे अधिकारी न्यायालयात गेल्यामुळे कारवाईला स्टे मिळाला होता. मात्र आता शासनाच्या आदेशाने शासन विरूध्द न्यायालय असा लढा सुरू झाला आहे. त्यानंतरही ते जळगाव जिल्ह्यातच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाचा कारभार पाहत असल्याने शिक्षक संघटनांमध्ये तीव्र नाराजी आहे.

देशदूत
शिल्पकार विकासाचा...
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
18 Dec 2025 - Page 3

# करगाव ते खरजई रस्त्याचे काम कधी होणार?

## विधानसभेच्या निवडणुकीत भूमिपूजन, वर्षभरापासून काम रखडले



▸▸ चाळीसगाव । मनोहर कांडेकर

तालुक्यात आ.मंगेश चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात रस्त्याची कामे झाली आहेत, परंतू गेल्या वर्षभरापासून तालुक्यातील करगाव ते खरजई हा तब्बल ४४ कि.मी.च्या रस्त्याचे काम झालेच नसल्याचे दिसत आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात घाई-घाईत या रस्त्याच्या कामाचे भुमीपूजन करण्यात आले, परंतू शासनाकडे ठेकेदाराला देण्यासाठी पैसेच नसल्यामुळे या रस्त्याचे काम गेल्या वर्षभरापासून रखडल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. आकर्षक पद्धतीने बोर्ड लावलेल्या या रस्त्याचे काम कधी? होणार, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. तर कच्च या रस्त्यावरुन अवैद्यरित्या मुरुमाची सर्रासपणे वाहतुक होत असल्यामुळे आता हा रस्ता पूर्णत: खराब झाल्या असून ग्रामस्थांना पायी चालणे देखील मुश्कील झाले असून वाहतुकीसाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तालुक्यातील करगाव ते खरजई रस्ता मंजुर करण्यात आला आहे. यासाठी आ.मंगेश चव्हाण यांनी विशेष प्रयत्न केले आहेत, करगाव ते खरजई हा ४४ कि.मी.अंतराच्या रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून तब्बल दिड कोटी रुपये मंजुर करण्यात आले आहेत. रस्त्याचे काम निलेश इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले असून विधानसभेच्या निवडणुकीच्या तोडावर रस्त्याच्या कामाचे मोठ्या थाटा-माठात भुमीपूजन करण्यात आले. रस्त्याच्या कामाबाबत बोर्ड देखील लावण्यात आला, परंतू वर्ष झाले तरी प्रत्यक्षात त्या ठिकाणी नवीन रस्ताच झालेला दिसून येत नाही. संपूर्ण रस्त्याचे चित्रिकरण ग्रामस्थांनी केले असता, फक्त कच्चा मातीचा रस्ता व चिखल दिसून येत आहे. त्यामुळे हा रस्ता झाला की नाही, असा प्रश्न उपस्थित होत असून अख्खा रस्ताच ठेकेदाराने गायब केला का? अशी देखील चर्चा होत आहे. परंतू शासनाकडे ठेकेदाराला देण्यासाठी पैसेच नसल्यामुळे गेल्या वर्षभरापासून ह्या रस्त्याचे काम रखडले आहे, रस्त्याचे काम त्वरित व्हावे, यासाठी बांधकाम विभागाचे आधिकारी देखील वेळोवेळी पाठपुरावा करीत आहेत. दुसरीकडे या कच्चा रस्त्यावरुन मुरुमाची अवैद्यपणे उत्खनन करुन रात्र-दिवस वाहतुक केली जात आहे. त्यामुळे कच्चा रस्ता देखील प्रचंड खराब झाला आहे.

अवैद्य मुरुम वाहतुकीत माजी नगरसेवकांचा समावेश असल्यामुळे त्याच्यावर ठोस कारवाई होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणने आहे. त्यामुळे प्रथमत: अवैद्य मुरुम वाहतुकीवर त्वरित लगाम लावण्यात यावी अशी देखील मागणी होत आहे.

दै.दिव्य मराठी

दि.१८ डिसेंबर,२०२५

**चांगला निर्णय** • शहरातील ५५० कचरा स्पॉट्स बंद करण्याचे नियोजन

# कचरा स्पॉट बंद करण्यासाठी आता प्रभागनिहाय स्वच्छता दूत नेमणार

प्रतिनिधी | जळगाव

'माझे शहर, माझी जबाबदारी' या नागरिकोपयोगी उपक्रमाच्या स्मरणपत्राला अनुसरून महानगरपालिकेत आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक नुकतीच झाली. यात शहरातील वाढलेल्या कचरा स्पॉट्सवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्वच्छता दूत नेमण्याच्या महत्त्वाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रभागनिहाय स्वच्छता दूत नियुक्त केले जाणार आहेत.

शहरात सध्या सुमारे ५५० कचरा स्पॉट आहे. त्यापैकी मनपाने आतापर्यंत ७० स्पॉट बंद केले आहेत. शाहू नगरातील सर्वात मोठा कचरा स्पॉट ही बंद करण्यात मनपाला यश आले आहे. आता

## माझे शहर माझी जबाबदारी उपक्रमाचा मास्टर प्लॅन तयार

### काय असेल जबाबदारी

हे दूत त्यांच्या प्रभागाची पाहणी करतील आणि कुठे उघड्यावर कचरा टाकला जातो, याचा अहवाल मनपाला देतील. प्राप्त झालेल्या अहवालानुसार स्वच्छता दूत हे मनपामार्फत तातडीने कचरा उचलून नागरिकांमध्ये जनजागृती करतील. तसेच कचरा स्पॉट बंद करण्यासाठी त्या जागेवर वृक्षारोपण, रांगोळी काढणे किंवा इतर उपाययोजना करून ते स्पॉट कायमस्वरूपी बंद केले जातील. यासाठी स्वच्छता वॉक हा उपक्रमही राबविला जाणार आहे.

### स्वच्छता कारवाईत सातत्य ठेवा; आयुक्तांच्या सूचना

आयुक्तांनी सर्व विभागप्रमुखांना स्वच्छतेच्या कारवाईत सातत्य राखण्याचे आणि सर्व विभागांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या सूचना व तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देणे, प्रभागनिहाय देखरेख करणे, स्वच्छता दूतांच्या सहभागातून जनजागृती वाढवणे यावर त्यांनी विशेष भर देण्याचे सांगितले.

### आढावा बैठकीमध्ये 10 मुद्द्यांवर घेतला आढावा

बैठकीत स्वच्छतेच्या १० प्रमुख मुद्द्यांवर प्रशासनाने केलेल्या कारवाईचा आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने कचरा संकलन वेळेतील अनियमितता, ओला-सुका कचरा विभाजनाची सक्ती, बाजारपेठांची रात्रीची स्वच्छता, हॉकर्ससाठी विशेष कचरा व्यवस्थापन आणि सिंगल यूज प्लास्टिक बंदी अशा गंभीर समस्यांवर झालेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली.

'माझे शहर, माझी जबाबदारी' अंतर्गत प्रभागनिहाय स्वच्छता दूतांची नियुक्ती केली जाणार आहे. बैठकीला उपायुक्त निर्मला गायकवाड, सहा. उपायुक्त उदय पाटील, शहर अभियंता योगेश बोरोले, डॉ. लीना पाटील, डॉ. सोनाली महाजन, मुख्य स्वच्छता निरीक्षक रमेश कांबळे, बीव्हीजी कंपनीचे अधिकारी, स्वच्छता निरीक्षक आणि 'माझे शहर माझी जबाबदारी' टीम उपस्थित होती.

# ग्राहक सेवा केंद्रांकडून अवैध शुल्कआकारणी

## नागरिकांची लूट होत असल्याचा आरोप, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारींचा ओघ सुरूच...

### मुक्ताईनगरमध्ये ग्राहक सेवा केंद्रातील प्रकार




▶ **मुक्ताईनगर (वा.)** राष्ट्रीयकृत बँकांनी नागरिकांच्या सोयीसाठी सुरू केलेली ग्राहक सेवा केंद्रे (सीएससी) ही सुविधा सध्या मुक्ताईनगर शहरात वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता नागरिकांना बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही केंद्रे, प्रत्यक्षात मात्र ग्राहकांची दिशाभूल करून पैसे उकळत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

बँकिंग व्यवहार सुलभ व्हावेत, नागरिकांचा वेळ वाचावा आणि ग्रामीण तसेच तालुकास्तरावर सेवा मिळावी, यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी ग्राहक सेवा केंद्रांची स्थापना केली आहे. मात्र मुक्ताईनगर शहरात काही ग्राहक सेवा केंद्रे थेट बँकांच्या समोरच सुरू असून, तेथे पैसे काढणे, जमा करणे तसेच नवीन खाते उघडणे यासाठी बेकायदेशीररीत्या शुल्क आकारले जात असल्याचे समोर आले आहे.नियमानुसार कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे खाते उघडण्यासाठी ग्राहक सेवा केंद्रावर कोणतेही शुल्क आकारले जात नाही. ही सेवा पूर्णतः मोफत असतानादेखील काही केंद्रांकडून खाते उघडण्यासाठी तसेच रोख व्यवहारांसाठी ठराविक रक्कम घेतली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

### प्रशासन व केंद्रचालकांमध्ये संगनमताचा संशय...

विशेष म्हणजे राष्ट्रीयकृत बँकांच्या अगदी समोरच हेडगेवार कॉम्प्लेक्समध्ये काही ग्राहक सेवा केंद्रे जोरात सुरू असून, बँक प्रशासन आणि संबंधित केंद्र चालक यांच्यात संगनमत तर नाही ना, असा प्रश्न सुज्ञ नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकारामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून, बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे. त्यामुळे संबंधित वरिष्ठ बँक अधिकारी तसेच जिल्हास्तरीय प्रशासकीय यंत्रणेने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून नियमबाह्य काम करणारी ग्राहक सेवा केंद्रे बंद करावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# जिल्हा नंदुरबार

लोकमत

# कोकाटेंना भोवला सदनिका घोटाळा; आमदारकी गेली, खाते काढून घेतले

## बिनखात्याचे मंत्री; आधी पत्त्याच्या डावामुळे कृषी खाते गेले, आता घरांच्या मोहात 'क्रीडा' गमावले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सदनिका घोटाळा प्रकरणी नाशिकच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने क्रीडा व युवककल्याण, अल्पसंख्याक विकास व वक्फ खात्याचे मंत्री माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा दिली असल्याने त्यांची आमदारकीही तत्काळ प्रभावाने आपोआप रद्द झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटेंची खाती काढून ती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवा असे पत्र बुधवारी रात्री राज्यपालांना दिले. त्यानुसार राज्यपालांनी कार्यवाहीदेखील केली.

सध्या तरी कोकाटे यांची खाती काढली असली तरी लवकरच त्यांचा मंत्रिपदाचाही राजीनामा घेतला जाणार असल्याचे समजते. उच्च न्यायालयात याबाबत काय होते त्याची वाट बघितली जात असल्याचे सांगितले जात आहे.

शिक्षेला त्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्याची सुनावणी शुक्रवारी होईल. कोकाटे यांना उच्च न्यायालयात शिक्षेस व दोषसिद्धीच्या निकालास स्थगिती मिळवावी लागेल. तरच त्यांची आमदारकी पुनर्स्थापित होऊ शकेल. आज मात्र कोकाटे यांची आमदारकी आपोआप रद्द झाली आहे. त्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी त्यांची आमदारकी रद्द करण्याची आवश्यकता नाही. संबंधित आमदाराची आमदारकी रद्द झाल्यानंतर त्या ठिकाणी निवडणूक आयोगाला पोटनिवडणूक घेता यावी यासाठी विधानसभाध्यक्ष तशी अधिसूचना काढत असतात.



### लोकप्रतिनिधीत्व कायदा नेमके काय सांगतो?

❶ लोकप्रतिनिधीत्व कायदा; १९५० मधील तरतुदीनुसार वेगवेगळे गुन्ह्यांची यादी दिलेली असून या पैकी कोणत्याही गुन्ह्यासाठी सक्षम न्यायालयाकडून दोन वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधीसाठीची शिक्षा सुनावली गेली तर संबंधित व्यक्ती त्या पदावर (आमदार, खासदार) राहू शकत नाही किंवा त्या पदासाठीची निवडणूकदेखील लढू शकत नाही.

❷ **एवढे होऊनही कोकाटे यांच्या पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार हे कोकाटे यांचे मंत्रिपद सहा महिन्यांसाठी टिकवू शकतात. कारण, कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसतानाही सहा महिने मंत्रिपदावर राहता येते पण तसे अजित पवार यांनी केले तर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका होऊ शकते.**

❸ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही कोकाटे यांचा बचाव करण्याची शक्यता नाही. त्यामुळे कोकाटे यांना मंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागण्याची शक्यता दाट आहे. तसेही ते आजमितीस बिनखात्याचे मंत्री झाले आहेत.

### न्यायालयात काय घडले? मंगळवारी कुठे होतात?

अजित पवार गटाचे मंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळाप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी धरत दोन वर्षांची सक्तमजुरी व दहा हजारांचा दंड, अशी शिक्षा मंगळवारी सुनावली. लगेच दुसऱ्या दिवशी बुधवारी न्यायालयाने त्यांना अटक करण्यात यावी, असे वॉरंटही काढले.

**यावेळी त्यांच्या वतीने न्यायालयाला कोकाटे यांची प्रकृती बिघडलेली असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचा अर्ज वकिलाकडून दाखल करण्यात आला; मात्र न्यायालयाने त्यांना फटकारत रुग्णालयात भरती झाल्याबाबतचे अधिकृत लेखी पुरावे सादर करावेत, असे सांगितले. तसेच मंगळवारी अंतिम सुनावणीप्रसंगी गैरहजर का राहिलात, असा प्रश्नही विचारला अन् अर्ज फेटाळला.**

त्यानंतर कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली. परंतु न्यायालयाने शुक्रवारी सुनावणी ठेवली. दोषसिद्धी स्थगित करण्याच्या कोकाटे यांच्या मागणीवर शुक्रवारी विचार केला जाईल, असे एकलपीठाने स्पष्ट केले.

### लीलावती रुग्णालयात दाखल

मंत्री कोकाटे यांना उच्च रक्तदाब व श्वसनाचा त्रास झाल्याने बुधवारी दुपारी वांद्रे येथील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना श्वसन आणि हृदयाशी संबंधित त्रास जाणवत असल्याने डॉक्टरांनी त्यांना अतिदक्षता विभागात (आयसीयू) ठेवले.

### अजित पवारांकडे सोपविला कोकाटेंनी राजीनामा

कोकाटे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा अजित पवार यांच्याकडे दिला असल्याचे सूत्रांकडून समजते. पण हा राजीनामा स्वीकारण्याबाबत रात्री उशिरापर्यंत निर्णय झाला नव्हता.

### लगेच गाठीभेटींना वेग

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तातडीने भेट घेतली; तर मंत्रिमंडळात पुन्हा एंट्री करण्यासाठी आतुर असलेले धनंजय मुंडे यांनी दिल्लीत गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

### अजित पवार गटासाठी दुसरा मोठा धक्का

अजित पवार गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या अगोदर पक्षाला धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा लागला होता, तर विधिमंडळाच्या सभागृहात मोबाइलवर पत्ते खेळल्याप्रकरणी कोकाटेंचे खाते बदलण्यात आले होते.

### कोकाटेंना वेगळा न्याय का?

कोकाटे यांना सरकार वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला आहे.

**कोकाटेंनी नैतिकता म्हणून न्यायालयासमोर आत्मसमर्पण केले पाहिजे, अशी मागणी उद्धवसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी केली आहे.**

लोकमत

# 'मनरेगा'तून गांधीजींना वगळले - बरेच झाले!

**'मनरेगा' योजनेचे नाव बदलण्याचे आधी वाईट वाटले; पण झाले ते बरेच झाले. योजनेचा आत्माच हरवलेला असताना गांधीजींचे नुसते नाव राहून काय उपयोग?**



**योगेंद्र यादव**
राष्ट्रीय संयोजक, भारत जोडो अभियान, सदस्य, स्वराज इंडिया

'मनरेगा' योजनेचे नाव बदलण्याला विरोधी पक्षांचा जोरदार आक्षेप आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ऐतिहासिक योजनेतून महात्माजींचे नाव का वगळताय, असा त्यांचा प्रश्न आहे. सुरुवातीला मलाही थोडे वाईट वाटले होते. शिवाय 'विकसित भारत- रोजगार आणि आजीविका गॅरंटी मिशन ग्रामीण विधेयक' हे नवे नाव काहीसे बेढबही वाटते. परंतु हे सरकार मनरेगा कायद्याच्या जागी आणत असलेल्या नव्या कायद्याचा मसुदा पाहिल्यानंतर मात्र त्यातून महात्मा गांधींचं नाव हटवलं ते बरंच झालं, असं मला वाटलं. योजनेतील मूळ तरतुदी नष्ट करून तिचा आत्माच नाहीसा केलेला असताना गांधीजींचे नुसते नाव राहून काय उपयोग?

हा मनरेगा कायदा ऐतिहासिक कसा हे प्रथम पाहू. भारत सरकारने आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडण्याच्या दिशेने, स्वातंत्र्यानंतर साठेक वर्षांनी उचललेले हे पहिलेच पाऊल होते. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांतील ३९ (अ) आणि ४१ हे अनुच्छेद प्रत्येक व्यक्तीच्या उपजीविकेचा आणि रोजगाराचा हक्क सुरक्षित राखण्याचा निर्देश सरकारला देतात. सहा दशकांच्या दुर्लक्षानंतर, २००५मध्ये यूपीए सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम लोकसभेत मंजूर करून घेतला आणि देशातील शेवटच्या व्यक्तीला यासंदर्भात प्रथमच एक कायदेशीर हक्क दिला. हा कायदा काही सर्वार्थाने रोजगाराची हमी देत नव्हता, परंतु इतर सर्वसामान्य सरकारी योजनेपेक्षा यातील तरतुदी अपूर्व होत्या.

हा कायदा ग्रामीण भागातील प्रत्येकाला, सरकारकडे रोजगाराची मागणी करण्याचा हक्क देतो. मागणीनंतर, सरकारी अधिकाऱ्यांना सबबी सांगत टाळाटाळ करायला फारसा वावच या कायद्याने ठेवला नव्हता. योजनेचा लाभ झाडून सर्वांना विनाअट मिळू शकत होता. कोणताही खेडूत आपले जॉब कार्ड बनवून घेऊन योजनेचा लाभ घेऊ शकत असे.

मागणी आली की सरकारला दोन आठवड्यांच्या आत काम किंवा भरपाई द्यावीच लागे. या योजनेत एक अद्वितीय तरतूद होती. तिच्या खर्चाला कोणतीही अंदाजपत्रकीय मर्यादा नव्हती. कितीही लोकांनी मागणी केली तरी त्या सर्वांच्या मजुरीची तरतूद करणे सरकारला बंधनकारक होते. इतिहासात प्रथमच, अपुऱ्या प्रमाणात का होईना, काम मिळवण्याच्या अधिकाराला वैधता देण्याचा प्रयत्न या योजनेद्वारा केलेला होता. त्यामुळेच जगभर या योजनेचा मोठा गाजावाजा झाला.



प्रत्यक्षात केवळ पहिली काही वर्षेच या कायद्यामागील मूळ भावनेनुसार त्याची योग्य अंमलबजावणी झाली. मनरेगाची मजुरी अत्यंत तुटपुंजी होती आणि सरकारी निर्बंध बरेच होते. तरीही मनमोहन सरकारने ही योजना सर्वदूर अमलात आणली. यूपीए सरकार जाताच, पंतप्रधान मोदींनी 'यूपीएच्या अव्यवहार्य लहरीपणाचे एक म्युझियम म्हणून आपण ही योजना जपून ठेवू', अशा शब्दांत या योजनेची खिल्ली उडवली होती.

पहिली काही वर्षे मोदी सरकारने योजनेचा गळा घोटण्याचाच प्रयत्न केला होता, परंतु कोविड महामारीच्या काळात त्यांनाही याच योजनेचा आधार घ्यावा लागला. सरकारी हलगर्जीपणा, नोकरशाहीची दुष्टाई आणि स्थानिक भ्रष्टाचार- हे सारे आडवे येत राहूनही मनरेगा योजना भारतातील अतिवंचितांचा आधार बनली. गेल्या १५ वर्षांत या योजनेखाली ४००० कोटी रोजंदारी रोजगार देण्यात आले. ग्रामीण भारतात ९.५ कोटी कामे पूर्ण झाली. दरवर्षी सुमारे पाच कोटी कुटुंबांनी या योजनेचा लाभ घेतला. कोविडसारख्या राष्ट्रीय किंवा दुष्काळासारख्या स्थानिक संकटसमयी मनरेगाने लाखो कुटुंबांना उपासमारी आणि स्थलांतरापासून वाचवले.

परंतु आता मात्र मोदी सरकारने ही ऐतिहासिक योजना गाडून टाकण्याचा चंग बांधलाय. अशी योजना थेट बंदच केली तर राजकीय तोटा होऊ शकतो, हे भान आहेच. त्यामुळे ही योजना 'सुधारित' केली जात असल्याची घोषणा झालीय. यापुढे १०० नव्हे तर १२५ दिवसांचा रोजगार दिला जाईल, असा चकवाही दिला गेलाय. पण योजना लागू होईल तेव्हाच ही गणती सुरू होणार ना?

कोणत्या राज्यात आणि त्यातील कोणत्या प्रदेशात रोजगाराची संधी द्यायची हे आता केंद्र सरकार ठरवणार आहे. योजनेसाठी प्रत्येक राज्यातील आर्थिक तरतुदीची मर्यादाही यापुढे केंद्र सरकारच ठरवून देईल. शेतीतील मजुरीच्या हंगामात कोणत्या दोन महिन्यांसाठी ही योजना स्थगित ठेवायची, हे राज्य सरकार ठरवेल. स्थानिक स्तरावर कोणती कामे व्हावीत, याचा निर्णय यापुढे 'वरून' येणाऱ्या आदेशानुसार होईल.

आता या योजनेच्या खर्चात वाटा उचलण्याची मोठी जबाबदारी राज्यांवरही टाकण्यात आली आहे, ही सर्वांत धोकादायक बाब होय. यापूर्वी केंद्र सरकार ९० टक्के खर्च उचलत असे. आता ते फक्त ६० टक्के रक्कम देईल. रोजगार हमीची सर्वाधिक गरज असलेल्या अत्यंत गरीब प्रदेशात तेथील निर्धन सरकारांपाशी इतका निधी उपलब्धच नसेल. विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात एक तर ही योजना लागूच केली जाणार नाही आणि केलीच तर सोबत अत्यंत कडक अटी असतील. म्हणून वाटतं की या योजनेतून महात्मा गांधींचे नाव वगळले तेच उत्तम झाले!

yyopinion@gmail.com

लोकमत

# मुदतबाह्य मिठाई व बेकरी उत्पादनांची शहाद्यात विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा :** शहरातील पुरुषोत्तम मार्केट परिसरातील एका मिठाई विक्रीच्या दुकानात मुदत संपलेली मिठाई व बेकरी उत्पादने विक्री झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शहरातील एका ग्राहकाला मुदतबाह्य खाद्यपदार्थांची विक्री झाल्याचे समोर आल्यानंतर या प्रकाराचे गांभीर्य वाढले आहे.

सोमवारी (दि. १५ डिसेंबर) सायंकाळी शहरातील उद्योजक शशिकांत पाटील यांनी पुरुषोत्तम मार्केट परिसरातील दुकानातून खाद्यपदार्थांची खरेदी केली होती; परंतु यातील कप केक, नानकटाई तसेच इतर बेकरी व मिठाईही मुदतबाह्य झाल्याचे समोर आले होते.

## नागरिकांकडून नाराजी...

हे पदार्थ खाण्यास अयोग्य आणि अपायकारक असतानाही त्यांची खुलेपणाने विक्री होत असल्याचे पाहून त्यांनी ही बाब संबंधित विक्रेत्याच्या निदर्शनास आणून दिली. हे पदार्थ खाल्ल्याने नागरिकांना अपाय होण्याची भीती असतानाही त्यांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर शहाद्यातील नागरिकांनी येथे भेट देत नाराजी व्यक्त केली. याप्रकारामुळे अन्नसुरक्षा व मानक कायद्याचे उल्लंघन होत असल्याने अन्न व औषध प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित दुकानाची सखोल तपासणी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

लोकमत

# वीटभट्टींच्या महसुली वसुलीला गती देण्याबाबत उदासीनता

## अक्कलकुवा तालुक्यातील महसुली मंडळात अडचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अक्कलकुवा :** तालुक्यातील खापर महसूल मंडळात वीटभट्ट्या सुरू करण्यात आल्या आहेत. या वीटभट्टीसाठी लागणाऱ्या गौण खनिजाची रॉयल्टी भरण्याबाबत चालक व मालकांमध्ये उदासीनता असून महसूल विभागाकडून वसुलीस दिरंगाई करण्यात येत आहे. यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे.

अक्कलकुवा तालुक्यातील खापर आणि मोलगी मंडळात गेल्या अनेक वर्षांपासून शेकडोंच्या संख्येने वीटभट्ट्या लावल्या जातात. या वीटभट्ट्या चालविणारे व्यापारी परजिल्ह्यासह

### कोट्यवधींची उलाढाल

अक्कलकुवा तालुक्यातील दोन मंडळात अनेकांनी वीटभट्ट्या लावल्या आहेत. वीटभट्ट्यांच्या व्यवसायातून दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. या वीटभट्ट्या लावण्यासाठी वीटभट्टी मालक महसूल विभागाच्या गौण खनिज महसूल विभागात नाममात्र गौण खनिज रॉयल्टी भरून व्यवसाय थाटतात. परंतु त्यांच्याकडून रॉयल्टी भरण्यात येत नसल्याचे समोर आले आहे. शासनाने शंभर टक्के महसूल वसुलीसाठी निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनीही वसुलीबाबत अधिकाऱ्यांना निर्देश दिले असतानाही रॉयल्टी भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही

लोकमत

# थर्टी फर्स्ट जवळ आला; अद्याप हॉटेल्स 'फायर ऑडिट' विना !

## जिल्ह्यात फायर ऑडिट बंधनकारक : दुर्लक्ष केल्यास कायदेशीर कारवाई करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** गोव्यातील क्लबला लागलेल्या आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाल्यानंतर नंदुरबार जिल्ह्यातील हॉटेल, बार, रेस्टॉरंटसह मोठ्या आस्थापना, दुकाने, रुग्णालये, मॉल्सच्या फायर सेफ्टी ऑडिटवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ख्रिसमस, थर्टी फर्स्टसाठी हॉटेल्समध्ये गर्दी वाढणार आहे.

नंदुरबार शहर तसेच जिल्ह्यात पर्यटनासाठी बाहेर जिल्ह्यातून पर्यटक फिरायला येतात. ३१ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील तोरणमाळ, सातपुडा तसेच अन्य भागात अनेक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हॉटेल, बार, रेस्टॉरंट यांचे फायर ऑडिट करणे आवश्यक आहे. मात्र, जिल्ह्यात ते झाले नसल्याचे दृश्य सध्यातरी दिसून येत आहे.

याबाबत संबधित विभागांसह स्थानिक नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामपंचायतींनी संबधित बांधकामांचा आढावा घेत त्यांची तपासणी करणे गरजेचे आहे.



### हॉटेल्समध्ये गर्दी वाढणार

सातपुड्याच्या दुर्गम भागासह येथून जवळच केवडियाकडे जाणारा मार्ग आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध भागातील पर्यटक नंदुरबार मार्गाने प्रवास करतात. परिणामी जिल्ह्यात नेहमीच पर्यटक येतात. ख्रिसमस, ३१ डिसेंबरला नववर्षाच्या स्वागताला पर्यटक जिल्ह्यात येण्याची शक्यता आहे.

**३१**

डिसेंबर रोजी जिल्ह्यातील तोरणमाळ, सातपुडा तसेच अन्य भागात अनेक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात.

### फायर सेफ्टी ऑडिट काय ?

फायर सेफ्टी ऑडिट म्हणजे एखाद्या इमारत किंवा संस्थेतील आगीशी संबंधित धोके, अग्निसुरक्षा यंत्रणा (जसे की अलार्म, फायर एक्स्टिंग्विशर, एक्झिट) आणि आपत्कालीन तयारीची तपासणी व मूल्यांकन करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया आहे. ज्यामुळे संभाव्य धोके ओळखून ते टाळता येतात आणि कायद्याचे पालन होते. तसेच जीवित व वित्तहानी टाळता येते.

### जिल्ह्यात १० टक्केच आस्थापनांचे ऑडिट

नंदुरबार जिल्ह्यातील चार नगरपालिका व एक नगरपंचायतीच्या आस्थापनांपैकी फक्त १० टक्केच आस्थापनांनी फायर ऑडिट केले असल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित आस्थापनांचे फायर ऑडिट झाले नाही. जिल्ह्यातील बिअर बार, तसेच रेस्टॉरंटचे फायर ऑडिट करण्यात आलेले नाही.

### सर्वांसाठी बंधनकारक, कारवाईची काय तरतूद ?

सर्व इमारती, सोसायट्यांसाठी फायर सेफ्टी ऑडिट (अग्निसुरक्षा तपासणी) करणे बंधनकारक आहे, जे वर्षातून दोनदा (जानेवारी ते जुलै) तज्ज्ञांकडून करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा परवाना रद्द होणे, दंडात्मक कारवाई आणि शिक्षेची तरतूद आहे. नियमांचे पालन न केल्यास अग्निशमन दल नोटीस बजावून कारवाई करू शकते.

### जिल्ह्यात वर्षभरात आगीच्या अनेक घटना

जिल्ह्यात आगीच्या घटना घडत असतात. वर्षभरात काही दुकानांना, तसेच हॉटेल्सला किरकोळ आग लागल्याचे प्रकार समोर आले आहेत. बाजारपेठेतील या प्रतिष्ठानांचे फायर ऑडिट करण्याची सातत्याने मागणी होत आहे.

### अनेक बार, रेस्टॉरंट, हॉटेल्स फायर ऑडिटविना

वर्षातून जानेवारी आणि जुलै महिन्यात फायर ऑडिट तज्ज्ञांकडून करून घेणे आवश्यक आहे. मात्र, अनेक बार, हॉटेल व्यावसायिक याकडे कानाडोळा करतात. जिल्ह्यातही अनेक बार, हॉटेल्सही फायर ऑडिटविना सुरू आहेत.

**दै.पुण्यनगरी** **दि.१८ डिसेंबर,२०२५**

पुण्य नगरी

# गावात टॉवर उभा पण, नेटवर्क बेपत्ता

## वडाळी-कळंबू परिसरात जिओ नेटवर्क ठप्प: नागरिकांचा मनस्ताप तातडीच्या उपाययोजनांची मागणी



**वडाळी** : शहादा तालुक्यातील वडाळी व कळंबू परिसरात जिओ कंपनीचा टॉवर असूनही प्रत्यक्षात नेटवर्क नसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून मोबाईलचे नेटवर्क अचानक जाणे, फोन सुरू असताना कॉल कट होणे, इंटरनेट अत्यंत संथ गतीने चालणे अशा समस्यांमुळे मोबाईलधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. 'टॉवर आहे नावाला, पण रेंज नाही गावाला' अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

जिओ कंपनीने काही वर्षांपूर्वी या परिसरात टॉवर उभारला आहे. मात्र, टॉवरसाठी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर व पुरेशा वीज पुरवठ्याअभावी वारंवार नेटवर्कच्या समस्या उद्भवत आहेत. वीज गेली की टॉवरचे नेटवर्कही गायब होते. तसेच टॉवर क्षमतेपेक्षा जिओ ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने ४-जी, ५-जी च्या नावावर महागडे रिचार्ज करूनही ग्राहकांना २-जी सारखी सेवा मिळत असल्याची तक्रार आहे. परिणामी पैसे खर्च होऊनही अपेक्षित सेवा न मिळाल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

विशेष म्हणजे, केवळ जिओच नव्हे तर परिसरात कोणत्याच मोबाईल कंपनीची पुरेशी रेंज उपलब्ध नाही. त्यामुळे 'नेमकी कोणत्या कंपनीची सिम वापरावे?' असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. वडाळी हे मोठे बाजारपेठेचे गाव असून येथे शाळा, महाविद्यालये, विविध बँका, सायबर कॅफे आदी महत्त्वाच्या यंत्रणा आहेत. अशा ठिकाणी सातत्यपूर्ण व वेगवान नेटवर्क अत्यावश्यक असताना अनेक वेळा इंटरनेट अत्यंत हळू चालते किंवा पूर्णपणे बंद पडते. त्यामुळे नागरिकांना तसेच व्यावसायिकांना कामे थांबवावी लागत आहेत.

दरम्यान, त्रस्त नागरिकांनी जिओ कंपनीकडे टॉवरसाठी स्वतंत्र वीजव्यवस्था, जनरेटर तत्काळ कार्यान्वित करण्याची सुविधा व नेटवर्क क्षमतेत वाढ करण्याची मागणी केली आहे. अन्यथा ग्राहकांच्या असंतोषात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### नेटवर्कअभावी अडचणी

नेटवर्कच्या समस्येमुळे शाळेची अनेक ऑनलाईन कामे वेळेत पूर्ण होत नाहीत. तांत्रिक अडचणींमध्ये बराच वेळ वाया जातो. अनेक माहिती लोकेशन-आधारित असल्याने ती शाळेतच भरावी लागते. त्यामुळे ही समस्या तातडीने सोडवावी.

-राकेश पाटील

(शिक्षक, जि. प. मराठी शाळा, कळंबू)

### टॉवरची क्षमता वाढवावी

गावात जिओचा टॉवर असूनही काही भागात रेंज पोहोचत नाही. वडाळीसारख्या मोठ्या गावात नेटवर्क अत्यावश्यक आहे. तात्काळ टॉवरची क्षमता वाढवून रेंज सुधारावी.

-तुषार गोसावी (सामाजिक कार्यकर्ते, वडाळी)

Nandurbar Edition
Dec 18, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# सर्वेक्षणास तीन वर्षे उलटली; याहामोगीपाडा व खाकरपानीपाड्याला वीजेची प्रतिक्षा

## विद्युतीकरणाची मागणी ; शिवसेनेचे महावितरणला निवेदन



**शहादा :** तालुक्यातील कन्साई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या याहा मोगीपाडा व खाकरपानीपाडा येथे विद्युतीकरणासाठी करण्यात आलेल्या सर्वेला तीन वर्षे उलटली.तरीदेखील अद्याप विद्युतीकरण करण्यात आलेले नाही. यामुळे या पाड्यांवर तातडीने विद्युतीकरण करुन कायमस्वरूपी वीजेची सोय करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटातर्फे करण्यात आली आहे. शिवसेना शहादा तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्या नेतृत्वाखाली वीज वितरण कंपनीच्या शहादा विभागाचे उप कार्यकारी अभियंता अशोक पाटील, ज्ञानेश बागुल यांना निवेदन सादर करण्यात आले.

सदरच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कन्साई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या याहामोगीपाडा व खाकरपानीपाडा या दोन्ही पाड्यांमध्ये शंभर टक्के आदिवासी समाजाची वस्ती असून सुमारे शंभर घरे व एक हजार लोकसंख्या येथे वास्तव्यास आहे. सन २०२२-२०२३ मध्ये या पाड्यांच्या विद्युतीकरणासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. मात्र,आजतागायत प्रत्यक्ष विद्युतीकरण झालेले नसल्याने स्थानिक ग्रामस्थांना अद्याप वीजेचा लाभ मिळालेला नाही.विद्युत सुविधेअभावी या पाड्यांतील ग्रामस्थांना दैनंदिन जीवनात अनेक गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. बहुतांश ग्रामस्थ मोलमजूरी करून उदरनिर्वाह करतात. स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी नसल्याने त्यांना दररोज दिवसा बाहेरगावी कामासाठी जावे लागते. संध्याकाळी किंवा रात्री घरी परतल्यानंतर वीजेअभावी पिण्याच्या पाण्यासह पिठाची गिरणी नसल्याने दळणासाठी अंधारात दुसऱ्या पाड्यात जावे लागते. परिणामी महिलांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ग्रामस्थांकडे स्वतःची शेती असूनही विजेअभावी बारमाही पिके घेणे शक्य होत नाही. त्यामुळे नाईलाजाने रोजगारासाठी दररोज इतर गावांत भटकंती करावी लागत आहे. याशिवाय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही विजेअभावी अभ्यासात अडथळे निर्माण होत असून संपूर्ण पाड्यात दररोज रात्री अंधाराचे साम्राज्य असते. यामुळे याहामोगीपाडा व खाकरपानीपाडा येथे तात्काळ विद्युतीकरण करून विजेची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.निवेदनाची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्यासह शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुपडू खेडकर, गीना ठाकरे, जयसिंग ठाकरे, लक्ष्मण पवार, मनोज पाथरवट, भरत ठाकरे, हितेंद्र वर्मा, दाणक्या पाडवी, गुलाबसिंग वसावे, पिंटू खर्डे, योगेश शर्मा, राज्या डूमखेडे, जगदीश ठाकरे, लव लोहार, महेश पाटील, रोशन कोठारी, जुमा पटले, गोपाल कोळी, जयसिंग वळवी आदींच्या सह्या आहेत.

पुण्य नगरी

# बोरद प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज लसींचा तुटवडा

## पुरेसा साठा उपलब्ध करण्याची मागणी; जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन

**तळोदा** : तालुक्यातील बोरद प्राथमिक आरोग्य केंद्रात तातडीने रेबीज प्रतिबंधक इंजेक्शनचा पुरेसा साठा उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी पंचायत समिती तळोदा येथील उपसभापती विजयसिंग राणा यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदुरबार यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

बोरद परिसरात गेल्या महिन्याभरापासून पिसाळलेल्या कुत्र्यांचा धुमाकूळ सुरु असून कुत्र्याच्या चाव्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार आतापर्यंत सुमारे २० ते २५ नागरिकांना




कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. रेबीज हा अत्यंत जीवघेणा आजार असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बोरद प्राथमिक आरोग्य केंद्रात चावा घेतलेल्या रुग्णांना प्राथमिक उपचार व पहिला डोस दिला जात असला तरी पुढील डोस उपलब्ध नसल्याचे सांगून रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्याचा सल्ला दिला जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक खर्चासह वेळेचा अतिरिक्त त्रास सहन करावा लागत आहे.

स्थानिक स्तरावरच संपूर्ण रेबीज लसीकरणाची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास नागरिकांचा वेळ व पैसा वाचेल, तसेच भीतीचे वातावरण दूर होईल, असे विजय राणा यांनी निवेदनात नमूद केले आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

Nandurbar Edition
Dec 18, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# सेवा हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे नंदुरबारचा गौरव

## आयुक्त चित्रा कुलकर्णींकडून शाबासकीची थाप




**नंदुरबार :** अतिदुर्गम व आदिवासी बहुल जिल्ह्यांतील नागरिकांनाही विहित कालावधीत शासकीय सेवा मिळाव्यात, यासाठी राज्य लोकसेवा हक्क आयोग सातत्याने प्रयत्नशील असून नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आयोग सदैव कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन नाशिक विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी केले.

नाशिक येथील राज्य सेवा हक्क आयोग कार्यालयाच्या वर्धापनदिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी उपसचिव सुनिल जोशी, नायब तहसीलदार सचिन पोतदार, कक्ष अधिकारी उदय काण्णव, ध.र. पुराडउपाध्ये यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त श्रीमती कुलकर्णी यांनी सांगितले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाशिकसह राज्यातील सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी राज्य सेवा हक्क आयुक्तांची कार्यालये कार्यरत आहेत. या माध्यमातून नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीत नाशिक विभागातील सर्व जिल्हे राज्यात पहिल्या सहा क्रमांकांत आहेत, ही गेल्या चार वर्षांत केलेल्या कामकाजाची पावती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात नंदुरबार जिल्ह्यात सेवा हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची विशेष दखल घेण्यात आली. अतिदुर्गम भागातील नागरिकांना विहित कालावधीत अधिसूचित सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी, अक्राणी येथील तत्कालीन तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे, माहिती तंत्रज्ञान विभाग, नंदुरबारचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील तसेच आयोगाच्या कार्यालयातील महेंद्र गावित यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ.सेठी व तत्कालीन तहसीलदार श्री.सपकाळे यांच्यावतीने हे प्रशस्तीपत्र जिल्हा समन्वयक श्री.पाटील यांनी स्वीकारले.

शासनाच्या विविध विभागांकडून अधिसूचित करण्यात आलेल्या लोकोपयोगी सेवा व विविध दाखले ठराविक कालावधीत आणि माफक शुल्कात मिळावेत, यासाठी नागरिकांनी राज्य शासनाच्या 'आपले सरकार' या संकेतस्थळाचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहनही आयुक्त श्रीमती कुलकर्णी यांनी केले. यावेळी राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक कार्यालयाने सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत केलेल्या कामकाजाच्या कार्यवृत्तांताचे प्रकाशन आयुक्त श्रीमती कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

Nandurbar Edition
Dec 18, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# तंत्रज्ञानाच्या युगात लाकडी बैलगाडीचा व्यवसाय संकटात

## मागणी घटली; ग्राहक नसल्याने व्यावसायिकांचा हिरमोड

**वडाळी** : शहादा तालुक्यातील सारंगखेडा येथील श्री दत्त प्रभूंच्या ऐतिहासिक यात्रेत यंदा लाकडी बैलगाडी व्यवसायाला उतरती कळा लागल्याचे चित्र दिसून येत आहे. जवळपास चारशे वर्षांचा इतिहास असलेल्या या यात्रेला 'शेतकऱ्यांची यात्रा' म्हणून ओळखले जाते. आजही या यात्रेत बैलजोडी, बैलगाड्या, शेतीची अवजारे व साहित्य मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी येते. मात्र, आधुनिक यांत्रिकीकरणामुळे तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमुळे लाकडी गाडीचे महत्त्व कमी होत चालल्याचे दिसत आहे.यामुळे यंदा मागणीदेखील घटली असून परंपरागत व्यवसाय यामुळे संकटात येण्याची शक्यता आहे तर दुसऱ्या बाजूला मागणीच नसल्याने व्यावसायिकांचा हिरमोड झाला आहे.

यंदा सोयाबीन, कापूस, मका, केळी, पपई, मूग, उडीद आदी पिकांना अपेक्षित भाव मिळाला नाही. त्यातच काही भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. परिणामी शेतकऱ्यांनी लाकडी गाड्यांच्या खरेदीकडे पाठ फिरवल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.पूर्वी या यात्रेत चार पिढ्यांपासून व्यवसाय करणारे अनेक व्यापारी २५ ते ३० लाकडी बैलगाड्या विक्रीसाठी आणत असत. मात्र, यावर्षी केवळ पाच ते सहा व्यापारीच यात्रेत दाखल झाले असून त्यांनीही फक्त पाच ते सात लाकडी गाड्या विक्रीसाठी आणल्या आहेत. मात्र खरेदीदार नसल्याने त्यांना मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागत आहे.

पारोळा येथील रामदास चौधरी, कैलास आधार लोहार तसेच धुळे येथील ईश्वर लोहार हे मोजकेच व्यापारी यंदा लाकडी बैलगाड्यांसह यात्रेत आले आहेत. बैलगाड्यांसोबतच दांडा, जू, चाकजोड, मांजरी यांसारखे सुटे भागही विक्रीसाठी उपलब्ध आहेत. एका लाकडी गाडीला सुमारे २० ते २२ हजार रुपये खर्च येतो, मात्र ती केवळ २३ ते २५ हजार रुपयांपर्यंतच विकली जात असल्याने नफा नगण्य असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. विशेष म्हणजे या पारंपरिक व्यवसायासाठी लागणारे कठोर श्रम पाहता पुढील पिढी या व्यवसायाकडे वळण्यास तयार नसल्याचे चित्र आहे. ही पारंपरिक कला जोपासणाऱ्या सुतार समाजातील व्यावसायिकांना शासनाकडून मदत मिळाली नाही, तर हा व्यवसाय लवकरच नामशेष होईल, अशी भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.



व्यवसायावर मोठे संकट असून याचे मुख्य कारण म्हणजे यावर्षी नैसर्गिक आपत्ती. शेतमालाला भाव नसल्याने लाकडी गाडीला मागणी नाही. पुढील वर्षी लाकडी गाडी विक्रेता व्यावसायिक यात्रेत येण्याच्या मनःस्थितीत नाहीत. यावर्षी निम्मे व्यापारी सारंगखेडा यात्रेत दाखल झाले नाहीत.

-भरत लोहार (लाकडी गाडी व्यवसायिक, सोनगीर)

सकाळ

# 'लोकसेवा हक्क'मध्ये नाशिक आघाडीवर

## आयुक्त चित्रा कुलकर्णी यांची माहिती

नाशिक, ता. १७ : महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग कायद्याच्या अंमलबजावणीत नाशिक विभागातील सर्व जिल्हे पहिल्या सहा क्रमांकांवर आहेत. चार वर्षांतील केलेल्या कामकाजाची ही पावती आहे, असे प्रतिपादन नाशिक विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी केले.

नाशिक येथील कार्यालयाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. उपसचिव सुनील जोशी, नायब तहसीलदार सचिन पोतदार, कक्ष अधिकारी उदय काण्णव आदी उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाल्या, की महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाशिकसह राज्यभरात सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी आयुक्त सेवा हक्क कार्यालयांची स्थापना झाली आहे. या कार्यालयाद्वारे नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने सेवा प्रदान केली जात आहे. यासोबत नागरिकांच्या हक्कासाठी राज्य लोकसेवा हक्क आयोग नेहमी कटिबद्ध आहे. कायद्याच्या अंमलबजावणीत नाशिक विभागातील सर्व जिल्हे पहिल्या सहा क्रमांकांवर आहेत. शासनाच्या विविध विभागांकडून अधिसूचित केलेल्या लोकोपयोगी सेवा, विविध दाखले ठराविक व माफक शुल्क भरून प्राप्त करून घेण्याचा अधिकार सेवा हक्क कायद्यामुळे नागरिकांना प्राप्त झाला आहे. त्यासाठी राज्य शासनाचे 'आपले सरकार' या संकेतस्थळाला नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन आयुक्त कुलकर्णी यांनी केले. कायद्यातील तरतुदींच्या आधारे नंदुरबारच्या अतिदुर्गम भागातील नागरिकांना सेवा उपलब्ध होण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, अक्राणीतील तत्कालीन तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे, माहिती तंत्रज्ञान विभाग नंदुरबारचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील, आयोगाच्या कार्यालयातील महेंद्र गावित यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. त्यांच्यातर्फे जिल्हा समन्वयक पाटील यांनी प्रशस्तिपत्र स्वीकारले. राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक कार्यालयाने २०२३-२४ आणि २०२४-२५ वर्षांत पार पाडलेल्या कामकाजाच्या कार्यवृत्तांताचे प्रकाशन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

सकाळ

# महावितरणच्या सर्वेक्षणानंतरही अंधार कायम

## याहामोगीपाडा, खाकरपानीपाड्यातील नागरिक विजेच्या प्रतीक्षेत

सकाळ वृत्तसेवा

**शहादा, ता. १७ : कन्साई (ता. शहादा) ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या याहामोगीपाडा व खाकरपानीपाडा येथे त्वरित विद्युतीकरण करून वीजपुरवठा करण्याची मागणी शिवसेनेचे शहादा तालुकाप्रमुख मनलेश जायसवाल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केली. शिवसेनेतर्फे याबाबत महावितरणचे शहादा विभागाचे उपकार्यकारी अभियंता अशोक पाटील यांना निवेदन दिले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, शहादा तालुक्यातील कन्साई ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या १०० टक्के आदिवासी समाज वस्ती असणाऱ्या याहामोगीपाडा व खाकरपानीपाडा या दोन्ही पाड्यात सुमारे शंभर घरे असून, एक हजार लोकवस्ती असणारे गावपाडे आहेत. २०२२- २०२३ या वर्षात विद्युतीकरणासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. परंतु, आजपर्यंत विद्युतीकरण झालेले नसल्याने आजही आदिवासी समाजाच्या स्थानिक ग्रामस्थांना विजेचा लाभ मिळत नसल्याने अनेक समस्यांसह अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ग्रामस्थांना स्थानिक ठिकाणी रोजगार नसल्याने रोजगारासाठी दररोज दिवसा बाहेरगावी जावे लागते. त्यामुळे संध्याकाळी उशिरा घरी परतल्यावर पिण्याच्या पाण्यासह पिठाची गिरणी नसल्याने अंधारातच दुसऱ्या पाड्यावर जावे लागते. त्यामुळे ही समस्या तातडीने सोडविण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

या वेळी उपकार्यकारी अभियंता ज्ञानेश बागूल उपस्थित होते. निवेदनावर शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल, शिवसेना शहादा शहर प्रमुख जितेंद्र जमदाडे, शिवसेनेचे ज्येष्ठनेते सुपडू खेडकर, गोना ठाकरे, जयसिंग ठाकरे, लक्ष्मण पवार, मनोज पाथरवट, भरत ठाकरे, हितेंद्र वर्मा, दाणक्या पाडवी, गुलाबसिंग वसावे, पिंटू खर्डे, योगेश शर्मा, राज्या डुमखेडे, जगदीश ठाकरे, लव लोहार, महेश पाटील, रोशन कोठारी, जुमा पटले, गोपाल कोळी, जयसिंग वळवी यांच्या सह्या आहेत. दोन्ही पाड्यावरील ग्रामस्थांसह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शहादा : शिवसेनेतर्फे महावितरणच्या शहादा विभागाचे उपकार्यकारी अभियंता अशोक पाटील यांना निवेदन देताना शिवसैनिक.

### रोजगारासाठी भटकंती

स्थानिक ठिकाणी स्वतःची शेती असल्यावरही बारमाही पिके घेता येत नसल्याने नाईलाजास्तव रोजगारासाठी दररोज इतर गावात भटकंती करावी लागत आहे. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसह सर्वच ग्रामस्थांना विजेची सोय नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या दोन्ही पाड्यात अंधाराचे साम्राज्य असते. कन्साई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या याहामोगीपाडा व खाकरपानीपाडा येथे त्वरित विद्युतीकरण करून तात्काळ विजेची सोय उपलब्ध करून द्यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

Dhule, Nandurbar-Today
18/12/2025 Page No. 1

दै.दिव्य मराठी

दि.१८ डिसेंबर,२०२५

दिव्य मराठी धुळे सिटी 18-12-2025

जलजीवन मिशन • ६८० योजना पूर्ण; विहीर, पाइपलाइन अशा फक्त ७२ योजना

# तीन वर्षे उलटून ७४% योजना अपूर्ण; मुदतवाढ देण्याची ओढवली नामुष्की

जीवन पाटील | नंदुरबार

कधी टँकर.. कधी बोअरवेल तर कधी तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना करूनही गावे तहानलेली राहत असल्याने त्यावर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या केंद्र व राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेचा नंदुरबार जिल्ह्यात बोजवारा उडाला आहे. निधीचा अभाव, ठेकेदारांची उदासीनता, प्रशासनाच्या पाठपुराव्याअभावी तीन वर्षे उलटून देखील तब्बल ७४ टक्के कामे अपूर्णावस्थेतच आहे. काम करूनही बिल अदा करण्यात येत नसल्याने ठेकेदारांनी कामे अर्धवट सोडल्याने याचा मनस्ताप मात्र ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे. दरम्यान, योजनांच्या पूर्ततेसाठी निधी नसल्याने पुन्हा तीन वर्षांनी मुदतवाढ देण्याची नामुष्की शासनावर ओढवली आहे. यामुळे आता ही योजना सन २०२८ पर्यंत पूर्ण करावयाची असल्याने गाव, पाड्यांसाठी योजना प्रत्यक्षात मृगजळ ठरणार की काय? असाच सवाल उपस्थित होत आहे.

## योजनेच्या कामांचे घोडे नेमके अडले कुठे?

सन २०२१ मध्ये जिल्ह्यात तब्बल २६७४ योजनांना प्रत्यक्ष मंजुरी दिली. त्यासाठी ८९८ कोटींचा निधी मंजूर केला. महत्त्वाकांक्षी योजना असल्याने ठेकेदारांना काम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली. सुरुवातीला तांत्रिक बाबींमध्ये अडकलेल्या योजनांचा प्रवासच संथगतीने सुरू झाला. त्यानंतर ठेकेदारांची बिले प्रलंबित राहिली. परिणामी २६.११ टक्के योजनाच पूर्ण तर सुमारे ७६ टक्के योजना रखडल्या. कामासाठी निधी नसल्याने व ठेकेदारांनी कामे बंद पाडल्याने शासनाने योजनेसाठी २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली. निधी नसल्यानेच महत्त्वाकांक्षी योजनेच्या कामांना मुदत वाढीची नामुष्की शासनावर ओढवल्याची चर्चा सुरू आहे.



होळ येथे अपूर्णावस्थेत उभा जलकुंभ. नंदुरबार तालुकाभर असेच चित्र आहे.

## पुढे काय?

### मुदत वाढीसोबत निधी मिळाला तर कामे मार्गी

आतापर्यंत पूर्ण म्हणून दाखवलेल्या ६८० योजनांपैकी ६०८ योजना या वीजपुरवठ्याशी संबंधित आहेत. प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेल्या विहिरी, पाण्याच्या टाक्या व पाइपलाइन अशा फक्त ७२ योजनाच पूर्ण झाल्या आहेत. फॉरेस्ट व इतर कारणांनी धडगाव तालुक्यातील तिनसमाळ व गेंदामाळ तर शहादा तालुक्यातील मालपूर पाडा व शिरूड दिगर येथील योजना सुरूच होऊ शकलेल्या नाहीत. दरम्यान, योजनांसाठी निधी रखडला आहे. गेल्या तीन वर्षांत काम सुरू न झालेल्या व अपूर्णावस्थेतच एकूण १९२४ योजना असून निधी उपलब्ध होईल का, असा प्रश्न आहे.

जिल्ह्यातील सहा तालुक्यांत एकूण २ हजार ६०४ योजना मंजूर करण्यात आल्या. नियमानुसार दोन वर्षांत त्यांची कामे पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र या योजनांपैकी आज फक्त २६ टक्केच योजना पूर्ण झाल्या आहेत. एकूण योजनांसाठी ८९८ कोटी रुपयांचा निधी मंजूर असताना प्रत्यक्षात ६८० पूर्ण झालेल्या योजनांसाठी २६०.५७ कोटी रुपयांचा निधी वितरित झाला आहे. उर्वरित योजनांसाठी काम करणाऱ्या ठेकेदारांची बिले अडल्याने अनेक